विलेपार्ले

# आता मी पारल्यात रहात नाही....

VILE PARLE

लेखक : अरुण फडके

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# आता मी पारल्यात रहात नाही

लेखक

## अरुण फडके

# आता मी पारल्यात रहात नाही

## लेखक... अरुण फडके

पत्ता- अरुण फडके, १९, अमिता सोसायटी, चवथा मजला, कान्होजी आंग्रे मार्ग, कोलडोंगरी, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००६९.
M: 7400173637M: ७४००१७३६३७,
arunphadke7@gmail.com
मुखपृष्ठ: श्री शैलेश तेंडोलकर

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604


**प्रकाशन : ११ डिसेंबर २०२१ (मार्गशीर्ष शु. अष्टमी शके १९४३)**


©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अरुण फडके



**लेखन आणि लेखक परिचय:**

- गेली ३५ वर्षे इमारत दुरूस्ती आणि **Heritage Structure Rehabilitation & Restoration** या व्यवसाय - या विषयातील अनेक यंत्र-तंत्रांचा विशेषज्ञ.
- विलेपार्ल्यातील गेल्या ९० वर्षातील हौशी आणि बालनाट्य चळवळ, प्रायोगिक - व्यवसायिक नाट्य चळवळ याचा इतिहास आणि विलेपार्ल्यातील रंगकर्मी यांचा परीचय करून देणाऱ्या पुस्तकाचे संकलन-लेखन सुरु आहे.
- **फ्रीमेसनरी (Freemasonry)** या प्राचीन जागतिक संघटनेचे सदस्य आणि संघटनेच्या भारतातील इतिहासाचे अभ्यासक, **एक इंटरनॅशनल कॉफी टेबल बुक प्रकाशित.**
- **विस्मृतीत गेलेल्या मराठी म्हणी - वाक्प्रचार** याचे अभ्यासक. पुस्तक लवकरच प्रकाशित होईल.
- **सिंबॉल – सिंबॉलिझम — ॲलिगरी, अर्थात रूपकशास्त्र – प्रतीकशास्त्र -- चिन्ह – चिन्हसंकेत - चिन्हार्थ** या विषयाचे अभ्यासक. **चिह्न निमित्त – निमित्त चिह्न** या पुस्तकाचे लेखन पूर्ण. पुस्तक लवकरच प्रकाशित होईल.
- **विलेपारल्यातील बलुतेदार, भाग १** आणि **भाग २** अशी संकलित २४ लेखांची दोन ईपुस्तके प्रकाशित झाली आहेत.

- **नव दुर्गा प्राचीन संकल्पना – रुपके** आणि **मातृदेवता- प्राचीन भारतीय संकल्पना आणि रुपके,** ही स्त्री देवतांच्या प्रतीके आणि रुपके या अभ्यासावर आधारित दोन ईपुस्तके ईसाहित्य प्रतिष्ठानतर्फे प्रकाशित झाली आहेत.
- **आता मी पारल्यात रहात नाही** हे ईपुस्तक ११ डिसेंबर २०२१ या दिवशी ईसाहित्य प्रतिष्ठानतर्फे प्रकाशित होईल.
- **रंग बरसे – अद्भुत रंगसंस्कृति** हे रंग या विषयाच्या सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासावर आधारित ईपुस्तक, २५ डिसेंबर २०२१ या दिवशी ईसाहित्य प्रतिष्ठानतर्फे प्रकाशित होईल.

**अरुण फडके**


--००--

# आता मी पारल्यात रहात नाही

## अनुक्रमणिका


| क्र | शीर्षक | परिचय | पृष्ठ |
|---|---|---|---|
| | | | |
| १ | लेखकाचे मनोगत | अरुण फडके | |
| २ | प्रस्तावना | श्री राजीव जोशी | |
| ३ | अर्पणपत्रिका | अरुण फडके | |
| ४ | रेड कार्पेटवर चालताना | श्री राजेंद्र केळशीकर | |
| ५ | चंदेरी केसांचा उद्योजक | श्री लोकेश शेवडे | |
| ६ | ड्राफ्ट्समन ते क्राफ्ट्समन – एका उद्योजकाचा प्रवास | श्री अरुण आपटे | |
| ७ | पुण्यातील The Box Theatre अनोखे रंगअवकाश | श्री प्रदीप वैद्य | |
| ८ | नाना विद्या कळा सिद्धी I | डॉ विद्या देवधर | |
| ९ | चिंता करतो विश्वाची | श्री आनंद गानु | |
| १० | साहसे श्री प्रतिवसती | श्री ययाती बापट | |
| ११ | एक आधुनिक - उच्च शिक्षित शेतकरी | श्री सचिन पटवर्धन | |
| १२ | एका अदृश्य समाज परिवर्तनाची साक्षीदार | श्रीमती मंगला गोडबोले | |
| १३ | बंगलोर आयटी ते रोहा पोल्ट्री: एक भन्नाट प्रवास | श्री साहिल गणपुले | |
| १४ | ब्रिलीयन्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स | श्री अरुण जोशी | |
| १५ | पारल्यातली स्कॉलर ते कॅनडातली सायंटिस्ट एमेरिटस् | डॉ भारती बापट | |

# लेखकाचे मनोगत



विलेपारल्याचा ताजी भाजी आणि फळांचा मूळचा छोटा बाजार, आत्ता गावडे हॉस्पिटल ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी एकेकाळी होता. खरे म्हणजे फळे – भाज्या – वाणसामान – हार्डवेअर अशी दुकाने, या छानशा आखीव-रेखीव बाजारात होती. साधरण वर्ष १९६० पासून रेल्वे स्टेशनच्या परिसरात तो हळूहळू विकसित झाला. माझ्या आई+वडीलांचे बिऱ्हाड, या बाजारासमोर, विलेपारले पूर्वेच्या रेल्वे स्टेशनपासून अगदी हाकेच्या अंतरावर होते. आम्ही पारलेकर या बाजाराला **मार्केट** असे संबोधित असू.

आमच्या घरापासून अगदी जवळच, रेल्वे स्टेशन समोर, भाजी आणि फळांचे हे समृद्ध मार्केट पसरलेले होते. माझी आई, या मार्केटमधून रोज ताजी भाजी आणत असे. दिवसभरातील या खरदेसाठी होणारा रोख रकमेचा खर्च, नेमकेपणी लिहून ठेवण्याचा तिचा शिरस्ता होता. माझ्या वडिलांनी सुद्धा, लोकमान्य सेवा संघाच्या कार्याच्या संदर्भातिल त्यांच्या कामाच्या अनेक महत्वाच्या नोंदी वेळोवेळी करून ठेवल्या होत्या. माझ्या पालकांच्या पुण्याईने, अशा नोंदी करण्याची माझीही सहज प्रवृत्ती आहे.

पारले टिळक विद्यालय ही शाळा आणि लोकमान्य सेवा संघ, पारले ही सामाजिक संस्था यांच्या संस्कारांनी माझ्या वडीलांचे व्यक्तिमत्व समृद्ध झाले होते. आपल्या समाजातील सर्व वयोगटातील नागरिकांची गुणवत्ता ओळखायची आणि त्यांचे मनापासून कौतुक करायचे हा वारसा माझ्या वडिलांनी मला दिला. शाळा – महाविद्यालयात आणि पुढील उच्च शिक्षणांत – मैदानी क्रीडा आणि कला प्रकरांत यश मिळवणाऱ्या विलेपारल्यातील प्रत्येक मुला-मुलीचे कौतूक करण्यासाठी माझे वडील त्यांच्या कुटुंबाची भेट घेऊन स्वतः लिहिलेले कौतुकाचे पत्र त्यानां देत असंत. अशी पत्र ते एका डुप्लीकेट बुकांत लिहीत असंत. वडिलांच्या पश्चात त्यांनी

अनेक वर्षांपासून लिहिलेली अशी शंभर-सव्वाशे पत्र माझ्या संग्रहात आहेत. विलेपारल्यातील अशा गुणवत्तेची आणि कर्तृत्वाची नोंद घेऊन, त्या गुणवंत नागरिकांचे कौतुक करण्याचा, समाजाला त्याचा योग्य परिचय करून देण्याचा माझ्या वाडिलांचा वारसा, **आता मी पारल्यात रहात नाही** या **अभूतपूर्व पारले** या मासिकातिल लेखमालेतून, मी जपला आहे. माझे आई-वडील आणि माझ्या गावाच्या ऋणांतून उतराई होण्याचा हा नम्र प्रयत्न..!

हे लेख निव्वळ या कर्तृत्ववान महिला आणि पुरुषांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय अथवा फक्त त्याच्या यशाचा आलेख नाही. हा, एका व्यक्तीचे **Subjective** किंवा **व्यक्तिनिष्ठ** कौतुक करणारा लेखही नाही. **Objective** म्हणजेच **वस्तुनिष्ठ** दृष्टीने नोंदवलेली, मुंबई महानगरीतील विलेपारले या उपनगराच्या दीडशे वर्षांच्या इतिहासातील ही काही पाने आहेत. विलेपारल्यातील या प्रत्येक यशस्वी – कर्तुत्ववान व्यक्तिमत्वाचा परिचय.. .. त्यांच्या आधीच्या आणि नंतरच्या भवतालासह -- कुटुंब आणि शिक्षण – शैक्षणिक पार्श्वभूमीसह – काळानुरूप बदलणाऱ्या सामाजिक परिस्थितीसह येतो. आपल्या विलेपारल्यातील चतुर – व्यवहारी पूर्वसूरींनी, आधीच्या पिढीतील अनेक संदर्भाच्या अशा स्पष्ट नोंदी, विलेपारल्याच्या इतिहासाच्या स्मृतिग्रंथात करून ठेवल्या आहेत. हे बारा संकलित लेख, एकविसाव्या शतकातील, विलेपारले उपनगराच्या संस्कृतीच्या पुढच्या प्रगतीच्या नोंदी आहेत.

विलेपारले उपनगराचा, वर्ष १९०७ ते वर्ष १९८२ या पंच्याहत्तर वर्षांचा विस्ताराने लिहिलेला इतिहास आणि व्यक्ति परिचय, अशा या ग्रंथाचे प्रकाशन प्रा गंगाधर गाडगीळ याच्या हस्ते वर्ष १९८६ मध्ये झाले होते. त्यावेळी केलेल्या भाषणांत ते म्हणाले.. ..“ **विलेपारले हे मुंबईचे उपनगर खरे, पण त्याबरोबरच अनेक वर्षे ते एक छोटेसे गावही होते. माणसांचे संबंध घरगुती होते, रोजच्या जीवनात एक प्रकारचा स्वस्थपणा होता. जुन्या परंपरांचा पीळ बराचसा शाबूत होता. तिथल्या मराठी माणसांच्या जीवनाला थोडासा पुणेरी ढंग होता. टिळकांवरील निष्ठेने तो अधिक गडद झाला होता.**

पण त्याबरोबरच मुंबईचे अनेक गुण पारलेकरांच्या रक्तात कळत न कळत मुरले होते. मुंबईकरांची उपक्रमशीलता देखील पारलेकरांत विपुल प्रमाणात होती. त्यातल्या अनेकांनी

आपले स्वतंत्र व्यवसाय सुरू केले, कारखाने उभारले, व्यापार सुरू केला आणि वाढविला. आधुनिक विद्या आणि तंत्रज्ञान त्यांनी हस्तगत केले. सर्वांनी एकत्र येऊन संस्था उभारल्या. मुंबईकरांच्या कार्यक्षमतेने आणि व्यवहार कुशलतेने संस्था चालविल्या आणि वाढवल्या. मतभेद झाले तरी परकोटीला जाऊ दिले नाहीत. जुन्याचा अभिमान बाळगला, नव्या उपयुक्त आणि हितकारक गोष्टींचा स्वीकार केला आणि जुन्या नव्याचा खास पारलेकरी पद्धतीने मेळ घातला. मुंबईला भूषणवाह वाटावे, तिच्या संपन्नतेत भर घालणारे असे पुष्कळ निर्माण केले.

प्रा गंगाधर गाडगीळ या सिद्धहस्त लेखकाने, विलेपारले उपनगर आणि तिथल्या रहिवासी नागरिकांच्या व्यक्तिमत्वाचे हे विश्लेषण. यातली अनेक व्यक्तिवैशिष्ट्ये, विलेपारले हे उपनगर आणि तिथले रहिवासी नागरिक आजही जपून आहेत.

माझे महाविद्यालयीन स्नेही श्री राजीव जोशी यांनी या पुस्तकाची प्रस्तावना लिहिली आहे. बँकिंग विश्वातील घडामोडी – भारतीय अर्थकारणातील नवे प्रवाह – वार्षिक अंदाजपत्रक अशा विषयांवर श्री जोशी, अनेक आघाडीच्या वर्तमानपत्रातून नियमित स्थंभलेखन करतात. अनुभवी रंगकर्मी असलेले श्री जोशी नाट्य समीक्षक आहेत आणि नाट्यलेखनही करतात.

वर्ष २०२१ च्या बारा महिन्यात माझे हे लेख **अभूतपूर्व पारले** या मासिकात प्रकाशित झाले. **अभूतपूर्व पारले** या मासिकाचे मालक – संपादक, माझे स्नेही श्री अनिल हर्डीकर यांच्या जाणत्या चतुर व्यवहारी सहकाऱ्यासाठी त्यांना मनःपूर्वक धन्यवाद..!

अनुभवी ग्राफीक आर्टिस्ट, माझे स्नेही श्री शैलेश तेंडोलकर यांनी या पुस्तकाचे मुखपृष्ठ चित्रांकित केले आहे. ते स्वतः पारलेकर असल्याने, पुस्तकांतील आशय त्यांनी नेमकेपणाने मुखपृष्ठावर अंकित केला आहे. त्यांना मनःपूर्वक धन्यवाद..!

**ईसाहित्य प्रतिष्ठानतर्फे** प्रकाशित होणारे हे माझे पाचवे ईपुस्तक. स्नेही श्री सुनीळ सामंत आणि त्यांच्या सर्व सहकऱ्यांना त्यांच्या सहभागासाठी मनःपूर्वक धन्यवाद..!

अरुण फडके,
विलेपारले, मुंबई,
११ डिसेंबर, २०२१.

## प्रस्तावना
## श्री राजीव माधव जोशी



प्रिय स्नेही अरुण .. ..

तू मूळ पारलेकर आहेस मात्र तू आता पारल्यात रहात नाहीस .. म्हणून तू लिहिलेल्या **आता मी पारल्यात रहात नाही** या ईपुस्तकाचे महत्व अधिकच अधोरेखित होते आहे असे वाटते. तुझ्या पालकांची नाळ जशी पार्ले गावाशी जुळली गेली, तशीच तुझीही नाळ मुंबई महानगराच्या या प्रगत - आधुनिक तरीही सुसंस्कृत उपनगराशी जोडली गेली आहे हे जाणवते. त्यांचा वारसा तू समृद्धपणे जपल्याचे शब्दाशब्दांतून प्रतीत होते. *[**संदर्भ - तुझे मनोगत** - माझ्या वडिलांचा वारसा, मी लिहिलेल्या **अभूतपूर्व पारले** या मासिकातील लेखमालेतून जपला आहे. माझे वडील आणि माझ्या गावाच्या ऋणांतून उतराई होण्याचा हा नम्र प्रयत्न..!]*

मुळात या लेखमालेचे शीर्षकच अर्थबोधक व आकृष्ट करणारे असे आहे. **ती सध्या काय करते..!** किंवा **आई कुठे काय करते?** अशा लोकप्रिय अर्थवाही शीर्षकांप्रमाणेच आकर्षक आहे, ह्यातून अरुणची सृजनशीलता दिसते. आपले जन्मगाव असलेल्या ठिकाणी न राहता, आपले कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी किंवा उपजीविकेसाठी देशाच्याच नव्हे तर जगाच्या पाठीवर वसतीला जाणे हे आता कॉमनच झाले आहे. मग या लेखांचे अप्रूप ते काय? आजकाल कोणीही, कोठेही जातो नि सेटल होतो, नथिंग न्यू ! जगच आता ग्लोबल व्हिलेज झालेले आहे ! असे कोणीही म्हणू शकतो. पण तुम्ही आम्ही असे नाही म्हणू शकत कारण आपण आपल्या मातृभूमीशी, जन्मलेल्या गाव-शहराशी घट्ट जोडले गेलेलो असतो. आपले शिक्षण, बालपण जिथे घडले तिथल्या आठवणी आपल्या मनांत रुंजी घालत असतात. निदान संवेदनाशील

माणसांच्या मनांत तरी अशी जन्मग्रामाबाबतची ओढ, आपुलकीचा झरा वहात असतो. मग पार्ले आणि पार्लेकर अपवाद कसे असतील?

प्रस्तुत पुस्तकांत एकेकाळी पार्ल्यात राहिलेल्या *[म्हणजे आता पार्ल्यात वास्तव्य नसलेल्या]* अनेक नामवंतांच्या बद्दल लिहिले गेले आहे. तेही कसे ? तर नुसती औपचारिक माहिती नाही की निव्वळ जंत्री नाही. राजेंद्र केळशीकर ह्यांच्या पन्नास वर्षांच्या वाटचाली बद्दल लिहितांना त्यांनी न्यूनगंडावर केलेली मात व नंतरचे कर्तृत्व हे ठळकपणे जाणवते. इलेक्ट्रोप्लेटिंग - सिल्व्हर प्लेटिंग कारखाना असलेल्या लोकेश शेवडेच्या लेखाचे **चंदेरी केसांचा उद्योजक** हे शीर्षक नुसते कॅची नाही तर समर्पक  आहे हे पूर्ण लेख वाचल्यावर जाणवते. **रोज नव्याने विकसित होत गेलो**  आणि वाटचालीत तिघांचा प्रभाव, **आई - वडील आणि पार्ले** असे शेवडे ह्यांचे सांगणे आपल्याला भावते.

एकेकाळी डॉक्टर होऊ पहाणाऱ्या प्रदीप वैद्य ह्यांनी संगीतात रमणे व पुढे पुण्यात स्थायिक होऊन **एक्सप्रेशन लॅब, एकलनाट्य** हे उपक्रम राबवणे व प्रायोगिक रंगभूमिसाठी **द बॉक्स थिएटरची** निर्मिती करणे हे प्रेरणादायी आहे. विद्या महाजन, आनंद गानू, ययाती बापट ह्यांच्या कार्य-कर्तृत्वाचा परिचय करून देताना लेखक अरुण फडके ह्यांनी प्रत्येकातील जिद्द, व्यावसायिकता अशा गुणांचा आढावा घेतला आहे. स्टार्ट अप हा शब्द जन्माला येण्याआधी दापोलीत मँगो रिसॉर्ट उभारणाऱ्या बापटांच्या लेखाचे शीर्षक **साहसे श्री प्रतिवसती** किती अनुरूप आहे हे वाचक म्हणून तुम्हालाही जाणवेल.

आधुनिक उच्चशिक्षित शेतकरी असलेल्या सचिन पटवर्धन ह्यांचा शाकाहारी मांस प्रकल्प, घानातील अनुभव लक्षांत राहणारा. तसेच **प्रक्रिया आणि परिणाम** या बाबतचे विवेचन उद्बोधक वाटते. सुप्रसिद्ध साहित्यिका मंगला गोडबोले ह्यांचा परिचय करून देतांना त्यांच्या माहेरची पार्श्वभूमी सांगताना अरुणने अमरावतीचा भूगोल-पट मांडलेला आहे. मुंबईहून पुण्यात गेलेल्या मंगलाताईंनी लिहिलेल्या वैविध्यपुर्ण साहित्याचा, त्यातील ठळक वैशिष्ट्य याचा अभ्यासपूर्ण परामर्श घेतलेला दिसतो. त्या **अदृश्य समाज परिवर्तनाची साक्षीदार** असल्याची प्रचिती आपल्याला येते. घट्ट वीण असलेल्या कुटुंबातील पार्लेकर कन्या पुढे असंख्य पुस्तके लिहिणारी साहित्यिक होते व त्यांच्या साहित्यावर काही विद्यार्थी एमफील व पीएचडी करत आहेत ही बाब पार्लेकर व पुणेकर ह्यांच्या अभिमानाची आहे. इथे मला मुद्दाम

नमूद करावेसे वाटते की  आमच्या मुंबईतही काही उणे नसलेले पुणे आहे, ते म्हणजे पार्ले. अरुणने मात्र लिखाणात पार्ले - पुणे साधर्म्य किंवा तुलना करण्याचा मोह टाळला हेच त्याचा कुशल लेखणीचे वैशिष्ट.

१९८० नंतर जन्मलेले धाडसी उद्योजक म्हणून आयटी ते पोल्ट्री असा एक भन्नाट करिअर प्रवास करणारे साहिल गणपुले आपल्याला भेटतात. अरुणच्या शैलीची ताकद आपल्याला जाणवते.  **मी रहातो तिथे मी दुसरे पार्ले वसवले आहे** असे म्हणणारे अरुण श्रीधर जोशी ह्यांचे चरित्र म्हणजे नीरा विक्री ते पोर्टलॅंड येथे वाणसामानाचे दुकान थाटणे, शिवाय मराठी मंडळाची स्थापना करणे आणि इथे आल्यावर उत्तम सर्व मराठी सिनेमांच्या निर्मितीचे काम करणे हे सर्व वाचून थक्क व्हायला होते. शेवटच्या लेखात कॅनडातील सायंटिस्ट एमिरेटस म्हणून ख्यातनाम असलेल्या डॉ भारती आपटे – बापट, त्यांचे कोलोन व प्रोस्टेट कॅन्सरबाबतचे कार्य आणि मोव्हेंबर मुव्हमेंट वाचनीय तर आहेच पण उद्याच्या सायंटिस्टना घडवणारी आहे.

**हे लेख निव्वळ या कर्तृत्ववान महिला आणि पुरुषांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय अथवा फक्त त्याच्या यशाचा आलेख नाही. हा, एका व्यक्तीचे Subjective (व्यक्तिनिष्ठ), कौतुक करणारा लेखही नाही. Objective (वस्तुनिष्ठ) दृष्टीने नोंदवलेली, मुंबई महानगरीतील विलेपारले या उपनगराच्या दीडशे वर्षांच्या इतिहासातील ही काही पाने आहेत.** या दस्तुरखुद्द लेखक अरुण फडकेच्या विधानात कोठेही आत्मप्रौढी नसून त्यातील व्यक्तींच्या महान कार्याबाबतचा सार्थ अभिमानच दिसून येतो आहे. पार्लेकर म्हणजे नेमका कोण व कसा? ह्याबद्दल देखील आपल्याला कळते. उदाहरणार्थ - अथक परिश्रम, उद्यमशीलता, स्वच्छ पारदर्शी व्यवहार, दूरदृष्टी, आपुलकी, सामाजिक बांधिलकी, उत्तम जनसंपर्क असे अनेक गुणविशेष सांगता येतील.

मित्र अरुण, तुझ्या लेखनाचे कौतुक करण्यासाठी शब्द नाहीत. पार्ल्यातील ही बारा रत्ने म्हणजे वानगीदाखल म्हणता येतील. कारण अशी किमान शंभर व्यक्तिमत्वे तू लिहून वाचकांसमोर आणू शकतोस. पार्ले या प्रगत व सांस्कृतिक दृष्टीने महत्वपूर्ण अशा उपनगराचा इतिहास लिहिणे सोप्पे काम नव्हे. गेल्या चार दशकांतील बदलत्या सामाजिक - सांस्कृतिक - आर्थिक संक्रमणाचा तसेच कनिष्ठ ते उच्च मध्यमवर्गीय जीवनाचा आलेख तू समर्थपणे मांडला

आहेस. प्रत्येक मान्यवराचे जीवन-चरित्र वेगळे, त्यांचा संपूर्ण आयुष्यपट नेमक्या शब्दांत मांडतांना पाल्हाळ, पुनरुक्ती, फापटपसारा असे दोष नाहीत. उलट प्रत्येक लेखात वैविध्य, नेमकेपणा, पार्ल्याबाबतचे तपशील पेरत, सशक्त भाषेच्या माध्यमातून वाचनीयता प्रवाहित ठेवली आहेस. मित्र म्हणून अभिमान वाटावा असे काम तू करतो आहेस. हे पुस्तक इंग्रजीमधून आले तर उद्या – परवाची पार्लेकर पिढी निश्चितच घडेल.

बारा लेखांची मालिका **अभूतपूर्व** मासिकांत छापून, मित्र व संपादक अनिल हर्डीकर ह्याने एक नवे दालन उपलब्ध करून दिले आहे. कॉमर्स कॉलेजात असूनही मराठी भाषा व साहित्यात रस व प्राविण्य असलेल्या या जोडगोळीने अधिक नवनवे प्रकल्प आणावेत हीच सदिच्छा.

या पुस्तकासाठी मी प्रस्तावना लिहावी असे तुला वाटावे हा माझ्यासाठी गौरव-क्षण आहे. कारण तू चोखंदळ आहेस, केवळ मित्र म्हणून काही करणे, करवून घेणे हे तुझ्या स्वभावात नाही. तुझी ही मनस्विता व लेखणीची कुशलता अखंड तेवत राहो. पार्ले, पार्लेकर ह्यांच्या संदर्भातील अनेक ज्ञात - अज्ञात पैलू लिखाणातून आणण्याचे काम तुला करायचे आहे. तुझे असे लेख वाचल्यावर मुंबईतील प्रत्येक उपनगरावर, त्यातील मान्यवर व्यक्तींबाबत लेखमाला लिहिण्याची प्रेरणा अनेकांना होईल ! आणि ह्याचा श्रीगणेशा तू केला असल्याचे आम्हा मित्रांना अभिमानाने सांगता येईल.

खूप शुभेच्छा..!

**राजीव माधव जोशी,**
२ डिसेंबर, २०२१.

**लेखक / बँकिंग अभ्यासक / नाटककार *[नाटकाची गोडी लावली डहाणूकर कॉलेज, गॉसिप ग्रुप म्हणजेच पार्ल्याने, अर्थात यातला अरुण फडके कॉमन]***
--००-

# अर्पण पत्रिका

माझे वडील श्री दिनकर परशुराम फडके यांचा जन्म वर्ष १९२३ मधे बडोदा इथे झाला.
त्यांच्या वयाच्या पाचव्या वर्षी त्यांच्या आईचा मृत्यू झाला आणि मोठ्या बहिणीने त्यांना
आपल्या घरी विलेपारल्याला आणले. पारले टिळक विद्यालय ही शाळा आणि लोकमान्य
सेवा संघ, पारले ही सामाजिक संस्था यांच्या संस्कारांनी ते समृद्ध झाले होते.
आपल्या समाजातील सर्व वयोगटातील नागरिकांची गुणवत्ता ओळखायची आणि
त्यांचे मनापासून कौतुक करायचे हा वारसा माझ्या वडिलांनी मला दिला.
शाळा – महाविद्यालयात आणि पुढील उच्च शिक्षणांत – मैदानी क्रीडा आणि कला प्रकारांत
यश मिळवणाऱ्या विलेपारल्यातील प्रत्येक मुला-मुलीचे कौतूक करण्यासाठी माझे वडील
त्यांच्या कुटुंबाची भेट घेऊन स्वतः लिहिलेले कौतुकाचे पत्र त्यानां देत असंत.
अशी पत्रं ते एका डुप्लीकेट बुकांत लिहीत असंत.
वडिलांच्या पश्चात त्यांनी लिहिलेली अशी शंभर-सव्वाशे पत्रं माझ्या संग्रहात आहेत.
विलेपारल्यातील अशा गुणवत्तेची आणि कर्तृत्वाची नोंद घेऊन,
त्या गुणवंत नागरिकांचे कौतुक करण्याचा,
समाजाला त्याचा योग्य परिचय करून देण्याचा माझ्या वाडिलांचा वारसा,
**आता मी पारल्यात रहात नाही** या **अभूतपूर्व पारले** या मासिकातिल
लेखमालेतून, आणि आता **ईसाहित्य प्रकाशनाच्या ईपुस्तकातून** मी जपला आहे.

हे ई पुस्तक आई वडिलांच्या स्मृतीस अर्पण करीत आहे

माझे आई-वडील आणि माझ्या गावाच्या ऋणांतून उतराई होण्याचा हा नम्र प्रयत्न..!

अरुण फडके
११ डिसेंबर, २०२१

--○○--

# आता मी पारल्यात रहात नाही.




**आता मी पारल्यात रहात नाही. लेख क्र १**

# रेड कार्पेटवर चालताना

तो पारल्याच्या शाळेत शिकत होता तरी तिथल्या विषयात आपल्याला फार गती नाही हे त्याला स्वतःला माहीत होते आणि पालकाना, विशेषतः वडिलानाही निश्चित माहीत होते. दर सहामाही आणि वार्षिक परीक्षेतील ते प्रगतीचे आलेख, प्रगती पुस्तकातल्या नोंदीच्या स्वरूपांत पालकांना दृश्यमान होत होते. मात्र हे असे, याच्या एकट्याच्या बाबतीत होत होते असे नाही. स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या पंचवीस  वर्षात, १९७० च्या दशकातले मराठी माध्यम शाळा शिकलेले विद्यार्थी – विद्यार्थिनी बहुतांशी असेच होते. **शाळेनंतर तू पुढे शिकायला हवेच, मग तुला नोकरी तरी नक्की मिळेल असा सल्ला नियमित मिळत होता.** कुटुंबाच्या सामान्य अर्थकारणामुळे, पुढील शिक्षण घेऊन नोकरी व्यतिरिक्त वेगळे काही करता येते असा विश्वास मात्र सहज उपलब्ध नव्हता. आत्मविश्वास म्हणजे नक्की काय याची पूर्ण अनभिज्ञता, असा त्या न्यूनतेचा परिणाम होता.  विषयांची अक्षर ओळख शाळेत झालेली असते ज्याला आपण साक्षरता म्हणतो. मात्र त्या साक्षरतेचा वापर मोकळ्या जगात कसा करायचा त्याची जबाबदारी प्रत्येकाची ज्याने त्याने सांभाळावी असा शिरस्ता होता. या मोकळ्या जगात, पलीकडे पोहोचण्यासाठी एक निसर्गदत्त गुणावत्ता असते. ती आपल्याकडे आहे याची जाणीव झाल्यानंतर, त्या तथाकथित मोकळ्या जगात,  याचे शाळाबाह्य शिक्षण सुरु झाले होते.

**हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेन्ट बरोबरच रेस्टॉरंट -- बार्स -- बेकरी चेन शॉप -- कॉफी चेन शॉप -- कॉरपोरेट हाय एंड मेजवान्या आणि येत्या २०२१ या नवीन वर्षात ग्राहकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या रेडी टू ईट मील्स -- दीर्घ शेल्फ लाईफ असलेली बेकरी प्रॉडक्ट अशा व्यवसायात,  पुणे शहर आणि चौफेर विस्तारलेल्या पुणे परिसरात फार मोठा प्रभाव टाकणाऱ्या एका यशस्वी उद्योजकाची ही कहाणी आहे.**

**वर्ष १९७० मध्ये शालांत परीक्षा आणि सांप्रत वर्ष २०२० ची अखेर आणि २०२१ ची सुरुवात या पन्नास वर्षांच्या त्याच्या कारकिर्दीचे नेमके तीन टप्पे आहेत.**



^ श्री राजेन्द्र केळशीकर

**वर्ष १९७० ते १९८१,**

**Nothing can be taught but everything can be learned.**

आपल्या नायकाचे वडील सौम्य स्वभावाचे साधेसे गृहस्थ होते. पारल्यातील कॉलेज आणि मुंबई युनिव्हर्सिटी मध्ये ते सायकॉलॉजी – लॉजिक – फिलॉसॉफी असे विषय एम ए च्या विद्यार्थ्यांना शिकवत असत. एका परदेशी प्रकाशनाच्या एनसायक्लोपिडियासाठी ते लिहित असत. कॉलेजात प्राध्यापक असलेले **Teaching is an Art without teaching** असे आग्रहाने सांगणाऱ्या ... टाय – कोट अशा रुबाबदार पेहेरावात असणाऱ्या वडिलांचा कळत – नकळत पडलेला प्रभाव, यासाठी आजही तो कृतज्ञ आहे. अभ्यासात फार गती नसलेला, आपण एक **Useless** मुलगा आहोत असा न्यूनगंड पिच्छा सोडत नव्हता. त्यामुळे फार बुद्धिमत्तेची आवश्यकता नाही अशा अभ्यासक्रमात प्रवेश घ्यावा आणि तिथे शिकावे म्हणजे नोकरी तरी नक्की मिळेल, असा निर्णय झालेला होता. त्यानुसार प्रभादेवीच्या बॉम्बे केटरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला होता.

आपल्याला इंग्लिश बोलण्याचा सराव नाही आणि कॉलेजातील प्यून सुद्धा फक्त इंग्लिशमधेच बोलतायत हे अनुभव, याचा न्यूनगंड वाढवणारे होते. पहिल्या वर्षी, कॉलेजात जातो म्हणून रोज घराबाहेर पडणारा हा... त्या वर्षी प्रत्यक्ष कॉलेजात गेलाच नाही. परिणामी पहिल्या वर्षी वार्षिक परीक्षा देता आली नाही. दुसऱ्या वर्षी, तरुणाईच्या आवेगात केलेल्या वर्तनामुळे, त्यावर्षाची वार्षिक परीक्षाही हुकली. मात्र झालेल्या चुकांची त्याला जाणीव झाली आणि पुढील तीन वर्षात, त्याचा अभ्यासक्रम पूर्ण झाला होता. इथे मला एका गोष्टीचा संदर्भ लागतो. अनेक वर्षांपूर्वी एका बालक – पालक सल्लागार केंद्रात, नामवंत मानसोपचार तज्ञांबरोबर संस्थेच्या व्यवस्थापनेचे काम करताना...बालकांच्या आणि कुमार – किशोर वयातील तरुण – तरुणींच्या **Behavioral (वर्तणूक विषयक)** आणि **Psychological (मानसशास्त्र विषयक)** अडचणी असतात याचा थोडासा परिचय झाला होता. आपला नायक, किशोर वयातील अशा **Behavioral** म्हणजे वर्तणूक विषयक अडचणीतून...स्वयंस्फूर्तीने बाहेर पडला होता, याची आज पन्नास वर्षानंतर जाणीव होते आहे.

शालेय शिक्षणात आपली प्रगती नाही...आपण एक **useless** माणूस आहोत... या समजुतीचा पगडा अजूनही होताच. त्यातूनच, या तणावातून सुटका व्हावी म्हणून घरापासून दूर कुठेतरी जावे अशी ऊर्मी सतत पाठलाग करत होती. याचवेळी पुणे केटरिंग कॉलेजमध्ये कुकरी आणि कलिनरी इन्स्ट्रक्टरची नोकरी मिळाली आणि पुण्यात पहिला प्रवेश झाला होता. कुकरी आणि कलिनरी इन्स्ट्रक्टर म्हणून काम सुरु केले आणि एक जाणीव होऊन डोळे खाडकन उघडले. मुंबईच्या कॉलेजात कुकरी - कलीनरी शिकलो हे खरे... मात्र समोरच्या विध्यार्थ्यांना ते **शिकवायचे कसे**... ते मात्र आपण शिकलेलो नाही. काही दिवसातच पुणा केटरिंग कॉलेजची नोकरी सोडून तो मुंबईच्या ताज मध्ये सामान्य शेफ म्हणून दाखल झाला होता. ताजच्या किचनमध्ये काम सुरु झाले तरी असे याला अस्वस्थ आणि अस्थिर वाटत होते...!..कारण आता त्याला, कॉलेजात कागदावर परीचय झालेली...**कमर्शियल – फ्रंट डेस्क – सेल्स – फायनान्स – अकाउंट्स – हाउसकीपिंग** अशी सर्व डिपार्टमेंट प्रत्यक्ष काम करताना दिसत होती आणि आता त्याला याचे आकर्षण वाटत होते. किचनच्या पलीकडे या सर्व डिपार्टमेंटचा आपल्याला काहीच अनुभव नाही याची जाणीव त्याला आता तीव्रतेने झाली होती. आपला नायक अजूनही अस्वस्थ होता...नेमक्या ध्येयाच्या शोधात होता...!




**^** श्री राजेंद्र केळशीकर

वर्ष १९७५ – ९० या काळांत पाश्चिमात्य प्रभावाचे खाद्य पदार्थ - स्नॅक्स उपलब्ध करून देणाऱ्या **वायकीकी** या नावाने दोन स्नॅक्स बार, मुंबईत सुरु झाले होते. अंधेरी पश्चिमेतील तेंव्हाच्या अंबर – ऑस्कर सिनेमाच्या समोर एक आणि दुसरा व्ही टी स्टेशन समोर सुरु झाला होता. वेगळ्या आव्हानाच्या आणि व्यवसायाच्या संधीच्या शोधात असलेल्या आपल्या नायकाने...**वायकिकीला** त्यांच्या चवीनुसार पदार्थ तयार करून पुरवठा सुरु केला. मात्र अंधेरी पश्चिमेकडील वायकिकी स्नॅक्स बार फार काळ चालला नाही आणि व्यवसायाची पहिली निराशा पदरात आली होती. **अपयश येईल – काही मनासारखे होत नाहीये असे अनुभव वारंवार येतील. त्यावेळी परमेश्वराला किंवा अन्य कोणाला दोष देऊ नये. असे का होते आहे त्याचा obective म्हणजे वस्तुनिष्ठ विचार करायचा प्रयत्न करावा...हे वडिलांनी कधीतरी उच्चारलेले शब्द स्मृतीच्या पाटीवर स्वच्छ कोरलेले होते...अजूनही आहेत.** आता त्याने दुसऱ्या नोकरीचा शोध सुरु केला होता. आपण एक **useless** माणूस आहोत... या समजुतीचा पगडा त्याच्या समजुतीत आता पक्का झाला होता.

महाराष्ट्र राज्य सरकारच्या एम टी डी सी या पर्यटन – रीसॉर्ट आणि हॉटेल उद्यागात आता त्याला नोकरी मिळाली होती. वर्ष १९७८ / ७९ च्या सुमारास एम टी डी सी चे शिर्डी येथे ४० / ४५ खोल्यांचे हॉटेल तयार होत होते. त्या कामाच्या प्रगतीवर देखरेख करण्यासाठी आता याची नेमणूक झाली होती. त्या काळात ब्ल्यू डायमंड या किर्लोस्कर ग्रुपच्या पुण्यातील हॉटेल व्यवस्थापनाकडे, शिर्डीच्या हॉटेल उभारणीचे कॉन्ट्रॅक्ट दिलेले होते. त्यामुळे ब्ल्यू डायमंडच्या चीफ एक्झीक्यूटिव्ह बरोबर नियमित भेटी होत होत्या. **हा तरूण, मुंबई – पुणे आणि मुंबई – शिर्डी हा प्रवास रात्री करतो आहे. आवश्यक ते काम न थकता – न कंटाळता – स्वतः पूर्ण करतो आहे हे ब्ल्यू डायमंडच्या चीफ एक्झीक्यूटिव्हच्या एव्हाना लक्षात आले होते.** त्याचवेळी रात्रीचा प्रवास केला की आपण दिवसा काम करू शकतो आणि आपल्याला सततच्या कामाचा कंटाळा नाही हे आपल्या नायकाच्या लक्षात आले होते. **मला काय करता येतंय त्याचा आणि अजून काय येत नाहीये त्याचा शोध घेण्याची ही त्याची पहिली दहा वर्षे होती.** या काळात फारसे यश मिळाले नाही याची त्याला कल्पना होती. मात्र मिळालेला अनुभव आणि ज्ञानात झालेली वृद्धी ही त्याची जमेची बाजू अमूल्य होती,

## वर्ष १९८१ ते २०००,

**Find something you are better at.**

वर्ष १९८१ मध्ये, एम टी डी सी च्या शिर्डी हॉटेलचे काम पूर्ण झाले होते. **आणि एक दिवस पुण्याच्या ब्ल्यू डायमंडच्या त्यावेळच्या चीफ एक्झीक्यूटिव्हने खडा टाकला…नोकरीत बदल अपेक्षित आहे का…!?…ब्ल्यू डायमंडमध्ये माझ्या बरोबर काम करणार का…?..काहीच दिवसात अपेक्षित इंटरव्ह्यू झाला आणि चीफ एक्झीक्यूटिव्हचा असीस्टंट म्हणून आपला नायक नव्या नोकरीत पुण्यामध्ये कामावर रुजू झाला.** पाच वर्षांचा अभ्यासक्रम आणि पुढच्या पाच वर्षातील अनुभव, कारकीर्दीचा असा दहा वर्षांचा पाया रचला गेला होता. शिक्षणानंतरच्या पाच वर्षात म्हणावे तसे यश मिळाले नव्हते मात्र **Nothing**

**can be taught but everything can be learned** हे वडिलांचे शब्द, त्या पाच वर्षात काही प्रमाणात साध्य झाले होते.

वयाच्या २९ व्या वर्षी १९८३ मध्ये जनरल मॅनेजर आणि १९८६ मध्ये ब्ल्यू डायमंडचा चीफ एक्झीक्यूटिव्ह अशा चढत्या क्रमाने आपल्या नायकाचे प्रगतीचे टप्पे पार झाले होते. मात्र हे सहज झाले नव्हते... ही पाच वर्ष खूप गुंतागुंतीची होती...!..**निसर्गदत्त चातुर्य – वडिलांच्या शब्दातून मिळालेला विवेक आणि दिला – घेतलेला विश्वास...** अशा **DNA** मुळे, इथे या नेमक्या पाच वर्षांत, पुणे शहरातील **Hospitality Industry** च्या इतिहासात, एका चाणाक्ष उद्योजकाच्या कारकिर्दीची ही सुरुवात होती. नंतरच्या पस्तीस वर्षात आपल्या नायकाने अभूतपूर्व प्रगती केली होती. **Hospitality Industry** मध्ये सीमित न रहाता त्याने **Food Industry** या व्यापक क्षेत्रात, एक हाती नवे आयाम निर्माण केले होते. एक टांचणी सुद्धा याच्या नजरेतून सुटणार नाही असा, ब्ल्यू डायमंडचा **Hawk Eye** चीफ एक्झीक्यूटिव्ह असा दबदबा निर्माण झाला होता.

वर्ष १९६० ते १९८५ या साधारण २५ वर्षांच्या काळात, पुण्यामध्ये, ब्ल्यू डायमंड हे त्या दर्जाचे एकमेव हॉटेल होते...त्यांना प्रतिस्पर्धी नव्हता. मात्र जवळच असलेल्या ओशो आश्रमातील साधकांचा खूप मोठा ग्राहक वर्ग आणि त्यांच्या जीवन शैलीचा विशिष्ट प्रभाव या हॉटेलवर होता. पुण्यात व्यवसायानिमित्त चार सहा दिवसासाठी येणाऱ्या पाहुण्यांना, त्यामुळे हे **Business Hotel** म्हणून परिचित नव्हते. मराठी उद्योग जगताचा अभिमान असलेले, माननीय श्री शंतनुराव किर्लोस्कर त्यावेळी ब्ल्यू डायमंडच्या बोर्ड ऑफ डायरेक्टरचे चेअरमन होते. ओशो आश्रमातील भक्तांसाठी हॉटेल बंद करून त्याचे **Business Hotel** करण्याचा निर्णय घेऊन एका वर्षात ते स्थित्यंतर यशस्वी होणे, हे आपल्या नायकाच्या चीफ एक्झीक्यूटिव्ह झाल्यानंतरच्या कारकिर्दीचे पहिले महत्वाचे पाउल होते. त्यानंतर कर्मचाऱ्यांचा चाळीस दिवस चाललेला संप आणि संप मागे घेईपर्यंत त्यासाठी पाच सहा वरिष्ठ सहकाऱ्यांसह चालू ठेवलेला हॉटेलचा व्यवसाय हे कारकिर्दीचे दुसरे मोठे यश होते.

वर्ष १९८५ पर्यंत फारसा नफा न कमावणाऱ्या ब्ल्यू डायमंड हॉटेलचे रुपांतर, आपल्या नायकाच्या कर्तृत्वाने, वर्ष २००० पर्यंत, पुण्यातील एका नामवंत - यशस्वी **Business Hotel** मध्ये झाले होते. **सकारात्मक प्रयत्नवाद – अविरत श्रमाची वृत्ती आणि तयारी -**

**- निखळ पारदर्शक व्यवहार नीति -- हॉटेल व्यवसायाचा पूर्ण परिचय – दूरदृष्टी – धाडसी निर्णय घेण्याची क्षमता – लहान मोठ्या प्रत्येक सहकाऱ्याशी वैयक्तिक संवाद -- सौजन्य आणि प्रत्येक पाहुण्याप्रती अगत्यशील संपर्क...** स्वतः निर्माण केलेल्या उद्योगाचे नेतृत्व करणाऱ्या आपल्या नायकाच्या अशा सगळ्या गुणवत्ता...हे त्याच्या यशाचे नेमके गमक आहे. कॉलेजातून बाहेर पडल्यानंतर... आपण **Useless** मुलगा आहोत... या मानसिकतेवर... **सकारात्मक प्रयत्नवाद आणि अविरत श्रमाची वृत्ती या दोन स्वयंप्रेरणांनी मात केली होती.**

वर्ष १९८५ मध्ये **बेकर्स बास्केट** ही चार बेकरी चेन शॉपची सुरुवात आपल्या नायकच्या संकल्पनेतून झाली. संगीताच्या कार्याक्रमासाठी पुण्यात येणारे सगळेच वरिष्ठ कलावंत, त्या काळात ब्ल्यू डायमंडमध्ये रहायला येत असत. आपल्या नायकाच्या देखरेखीखाली या सर्वांना, संयमी आणि सौजन्यशील आदरातिथ्याचा अनुभव मिळाला होता. हे सौजन्य आणि आदरातिथ्य कीर्तिमान झाले आणि ब्ल्यू डायमंडची व्यवसाय वृद्धी होऊन नफ्याची नवी गणिते मांडली गेली.

याच दरम्यान, **मेजरसाहेब** या सिनेमाच्या **NDA** मधील चित्रीकरणासाठी, श्री अमिताभ बच्चन दोन महिने पुण्यात येणार होते. त्यांचे वास्तव्य त्यावेळी ब्ल्यू डायमंडमध्ये होते. याचे सर्व श्रेय आपल्या नायकाचे आहे. श्री बच्चन यांना भेटण्याची संधी स्वतः निर्माण करून, त्यांना भेटण्यासाठी निव्वळ पंचेचाळीस मिनिटात पुणे – मुंबई असा प्रवास, किर्लोस्करांच्या खाजगी जेटमधून करून, ब्ल्यू डायमंडमध्ये रहावे यासाठी श्री बच्चन यांच्याशी केलेली मुत्सद्देगिरी...असे अनेक किस्से या काळात घडले आहेत. **या काळात मुंबई – पुणे एक्स्प्रेस वे झालेला नव्हता आणि त्या प्रवासाला सहा – सात तास लागत असत.**

## वर्ष २००० ते २०२० आणि पुढे....

**You find your own skills, that you can excel in...!!..**निवांत क्षणी, वडिलांनी सहज उच्चारलेले असे शब्द... कानात सतत रुंजी घालत होते. साधारण वर्ष २००० मध्ये, माननीय श्री शंतनूराव किर्लोस्कर – भारत फोर्जचे बाबा कल्याणी अशा दिग्गज

उद्योगपतींनी स्थापन केलेल्या **पुना इंडस्ट्रीयल हॉटेल्स लिमिटेडने,** ब्ल्यू डायमंड ताजला विकण्याचा निर्णय घेतला आणि इथे आपल्या नायकाच्या कारकीर्दीच्या वर्ष २००० नंतरच्या तिसऱ्या कालखंडाची सुरुवात झाली.

टाटांच्या ताजने, ब्ल्यू डायमंड विकत घेतले त्यावेळी त्याना, **बेकर्स बास्केट** ही चार बेकरी चेन शॉप नको होती. आपल्या **नायकाने** वर्ष १९८५ मध्ये स्वतः सुरु केलेली ही बेकरी चेन शॉप खरेदी करण्याची संधी आपल्या नायकाला मिळाली आणि **श्री रविश अरोरा** या सहकाऱ्यासह स्वतंत्र व्यवसायाची गुढी, वर्ष २००० मध्ये उभारली गेली. बॉम्बे केटरिंग कॉलेज आणि ओबेराय स्कूल ऑफ हॉटेल मॅनेजमेंटचे पदवीधर **श्री रविश अरोरा** वर्ष १९९३ पासून ब्ल्यू डायमंडचे **Food and Beverage Manager** होते. **Inn – Venue Hospitality Management Services Pvt Ltd** या मोठ्या उद्योगाचे हे दोघे आज संचालक आहेत. **पॅटिसेरी - कन्फेक्शनरी - बेकरी प्रॉडक्ट्स मध्ये तीस वर्षांची दीर्घ परंपरा असलेला हा पुणे शहरातील बेकर्स बास्केटचा बेकरी व्यवसाय आता पंधरा शाखांमध्ये विस्तारला आहे.**



**^** श्री राजेन्द्र केळशीकर आणि श्री रविश अरोरा.

१२ डिसेंबर २००६ च्या **Economic Times** च्या पुणे आवृत्तीमधील एक लेख आपल्याला आजही वाचता येतो. जगभारातील, विशेषतः दक्षिण अमेरिकेतील स्वादिष्ट रसानांचा आस्वाद घ्यायचा असेल तर औंध मधील **POLKA DOTS** या रेस्टॉरंटला अवश्य

भेट द्यावी असा आग्रहाचा सल्ला या लेखकाने दिला आहे. **World Cuisine  with Bar** असे वैशिष्ट्य असलेले हे रेस्टॉरंट आज सर्व वयोगटाच्या नागरिकांमध्ये लोकप्रिय आहे. युरोपिअन सजावटीने सजलेले आणि युरोपिअन रसना आस्वादासाठी पुणेरी खवय्यांच्या पसंतीचे, बाणेर हाय स्ट्रीट वरचे **INCOGNITO  Restaurant** अगदी  असेच  लोकप्रिय आहे.







^  पोलका डॉटस रेस्टॉरंट – औंध ^ इन्कॉग्निटो रेस्टॉरंट – बाणेर

आधुनिक आर्कीटेक्चर आणि उत्तम इंटिरियर डिझाईन असलेले **Deccan Rendezvous** हे **Boutique Four Star  Hotel,** वर्ष २००६ मध्ये डेक्कन जिमखाना परिसरात सुरु झाले होते. वर्ष २०१४ पर्यंत **Inn – Venue  Hospitality Management Services Pvt Ltd** कडे या हॉटेलचे व्यवस्थापन हक्क होते. वरील सर्व अंगीकृत व्यवसायाचा विस्तार अनेक पटींनी झाला होता. इन्फोसिसच्या हिंजेवाडी संकुलातील इटालियन फूड साठी **FABIANO snack bar**, ईशान्य माल मधील **IRO&  GRILL N BAR**, जगभरातील **DESSERTS**  साठी लोकप्रिय असलेले **OOPSA  DAISY**  आणि अन्य **COFFEE  SHOPS** या सगळ्या **Food  Outlet** च्या प्रत्येकी तीन-चार शाखा आता स्थापन झाल्या आहेत.



**^ INNVENUE Factory** बिल्डींग – हडपसर

**श्री राजेन्द्र केळशीकर – श्री रविश अरोरा या जोडीच्या Inn - Venue Hospitality Management Services Pvt Ltd** च्या व्यवसायाचे रुपांतर आता मोठ्या उद्योगात झाले आहे. **हॉस्पिटॅलीटि - बेकरी चेन शॉप - रेस्टॉरंट - स्नॅक बार - कॉफी चेन शॉप – डेझर्ट शॉप** असा **FRESH FOOD Industry** चा मोठा विस्तार आणि त्याची निर्मिती आता व्यवस्थापन कौशल्यामुळे केंद्रित झाली आहे. पुणे शहरातील या सर्व विविध आस्थापनांना आवश्यक पदार्थांची निर्मिती, हडपसर येथील दोन कारखान्यांमध्ये केली जाते. स्वतःची वाहने, पुण्यातील या सर्व आस्थापनांमध्ये ताज्या उत्पादनांचा नियमित पुरवठा करतात. **आज ३६० कर्मचारी या उद्योगात कार्यरत आहेत.** याला कारखाने म्हणावे याचे कारण ही **पंधरा हजार आणि पंचेचाळीस हजार चौरस फुट इतक्या विशाल आकाराची दोन आधुनिक किचन आहेत.**

प्रिन्स चार्ल्स यांच्या पुणे भेटीच्या वेळी पुण्यातील नामवंत उद्योजक ठाणावाला कुटुंबाने दिलेल्या मेजवानी पासून, जगभरातील रसना कौशल्य आणि स्वाद विविधतेसह, पुणे शहरातील अशा असंख्य मेजवान्यांचे व्यवस्थापन करणारी **INN-VENUE** ची अत्यंत लोकप्रिय आणि यशस्वी **Corporate & High End Banquets** हा या विस्तीर्ण व्यवसायातील यशाचा कळसाध्याय आहे.



^ श्री राजेंद्र केळशीकर

शब्दांच्या मर्यादा ओलांडून, या उद्योग आणि उद्योजकांचा पूर्ण परिचय द्यायचा म्हणजे एका पुस्तकाची आखणी करावी लागेल इतके काही सांगण्यासारखे राखून ठेवले आहे. निव्वळ पन्नास वर्षांत, पुण्याच्या रसना आणि खाद्य संस्कृतीचे आणि उद्योगाचे वेगळे आयाम निर्माण करणाऱ्या आमच्या पारलेकर शाळासोबती **श्री राजेंद्र केळशीकर** या स्नेह्याचा आणि त्याच्या प्रगतीचा असा हा सार्थ परिचय आहे.

या लेखाचे शीर्षक **Red Carpet Walk** असे आहे, त्याला काही संदर्भ आहे. हडपसर इंडस्ट्रीयल इस्टेट मधील **INNVENUE Hospitality** या उद्योगाच्या भव्य इमारतीचे सध्याचे नाव **Red Carpet Building** असे आहे.


**मी आता पारल्यात रहात नाही** असे **अभिमानाने** म्हणणाऱ्या, पारल्याच्या पलीकडच्या विस्तीर्ण जगात, स्वकर्तुत्वाने आपली विशेष ओळख निर्माण करणाऱ्या **श्री राजेंद्र केळशीकर** या पारलेकराचा हा पहिला परिचय, माझ्या समकालीन आणि सर्वच पारलेकरांना, निश्चितच आवडेल अशी माझी खात्री आहे...!

--○○--

**आता मी पारल्यात रहात नाही. लेख क्र २**

# चंदेरी केसांचा उद्योजक.

आजपासून साधारण चाळीस – बेचाळीस वर्षांपूर्वीचा, वर्ष १९७८ / ७९ चा, तो काळ होता. विलेपारल्याहून तो नाशिकमध्ये आला तेंव्हा तो वीस – एकवीस वर्षांचा होता. महाविद्यालयातून पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर लगेचच नोकरी शोधावी किंवा पुढील शिक्षणासाठी पुन्हा महाविद्यालयात प्रवेश घ्यावा असा विचार विद्यार्थ्यांमध्ये त्या पन्नास वर्षांपूर्वीच्या काळात प्रचलित होता. पदवी परीक्षेनंतर ऐंशी - नव्वद टक्के विद्यार्थी – विद्यार्थिनी प्रामुख्याने नोकरी साठी अर्ज भरत असत. नोकरी मिळाल्यानंतर विद्यार्थिनी वर संशोधनासाठी तयारी करत असत. शाळेत हुशार म्हणून नावाजलेले फार तर दहा टक्के विद्यार्थी – विद्यार्थिनी, मेडिकल – इंजीनियरिंग – आय आय टी अशा क्षेत्रातील अभ्यासासाठी त्या त्या शिक्षण संस्थात प्रवेश घेत असत. अमुक पदवी घेऊन मला अमुक एका क्षेत्रात काम आणि नोकरी करायची आहे असे उद्देश आणि धोरण फार कोणाच्या मनात नव्हते. **आज, शालांत परीक्षेत ८० / ९० टाक्के मार्क मिळाले तरच पदवी अभ्यासक्रमात प्रवेश मिळतो. अशी तीव्र स्पर्धा पन्नास वर्षांपूर्वीच्या त्या काळात नव्हती.**



< श्री लोकेश शेवडे

आपला नायक मात्र यापेक्षा वेगळ्याच उद्देशाने नाशिक मध्ये स्थलांतरित झाला होता. आपल्या मुलांनी नोकरी न करता व्यवसाय करावा या वडिलांच्या मार्गदर्शनानुसार आणि त्यांच्याच सल्ल्याने नाशिकमधील सातपूर औद्योगिक क्षेत्रांत जागा घेऊन, एका इलेक्ट्रोप्लेटिंगच्या कारखान्याची उभारणी झाली होती. या

व्यवसायाचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी घेऊन त्यासाठी आपला नायक, नाशिक मध्ये वास्तव्याला आला होता.

**साधारण वर्ष १९७० ते ८० या दरम्यान विलेपारले हे प्रायोगिक रंगभूमीचे मुंबईतील महत्वाचे केंद्र झाले होते.** नंतरच्या काळात, व्यावसायिक रंगभूमीवर यशस्वी झालेले अनेक नाट्यकर्मी, **गॉसिप गृप** या अनोख्या नावाने परिचित झालेल्या गृपचे सदस्य होते. याच काळांत आपला नायकही महाविद्यालयात शिकत होता आणि या गृपचा सदस्य होता. प्रायोगिक रंगभूमी चळवळीतील नव्या विचारांचे संस्कार त्याच्यावर याच ठिकाणी झाले होते. वाचनाचे वेड लागले होते. सुदैवाने, प्रागतिक विचारांच्या – शिक्षणाचे महत्त्व जाणणाऱ्या – सुशिक्षित – सत्शील – सुसंस्कृत आणि संयमशील अशा कुटुंबाची पार्श्वभूमी हे याच्या किशोर-कुमार-तरुण वयातील व्यक्तिमत्वाच्या प्राथमिक बांधणीचे शक्तिस्थान होते. याच्या वयाच्या दहाव्या-अकराव्या वर्षी, १९६६ / ६७ मध्ये याचे कुटंब विलेपारल्यात स्थाईक झाले होते. **"आज मी जो आहे त्यावरचे तीन प्रमुख प्रभाव म्हणजे ... माझे आई – वडील, विलेपारले उपनगर आणि प्रायोगिक रंगभूमीच्या काळातील रंगकर्मी स्नेही"**...!..वयाची साठी पार केल्यानंतर, स्नेही-सुर्हुदांशी होणाऱ्या प्रसन्न संवादात, कुठलाही अभिनिवेश न ठेवता, अभिमानाने तो नेहेमीच हे स्पष्ट करत रहातो.

आपल्याशी संवाद करायची याची एक खास शैली आहे. एका रंगकर्मीचे स्पष्ट – स्वच्छ शब्दोच्चार – विचार स्पष्ट करताना शब्दार्थांना अलंकृत करत सहज येणारे आरोह – अवरोह. लिखित शब्दांच्या, श्रोत्यावर होणाऱ्या परिणामाचा निश्चित अभ्यास असलेल्या, कसलेल्या लेखक-दिग्दर्शकाने निसर्गदत्त कौशल्याने घेतलेले दोन शब्दांमधील सूचक – अर्थवाही विराम. अशी रुबाबदार देखण्या रुपाला साजेशी, याची समृध्द संवाद शैली. **माझे विचार – सवयी – आवडी – बुद्धीमत्ता – भावनिकता – मानसिकता...उद्योजग होण्यासाठी तेंव्हाही समर्पक - संयुक्तिक नव्हत्या आणि आजही नाहीत. अगदी खरे सांगतो, उद्योजग बनावे असे मला कधीच वाटले नाही. मात्र प्रत्येक विपरीत आणि प्रतिकूल परिस्थिती मला आव्हान देत राहिली, नवे धडे मिळत राहिले आणि मी रोज नव्याने विकसित होत गेलो. असाच तो स्पष्ट आणि प्रांजळपणे इथेही व्यक्त होतो.**

**वर्ष १९७८ ते १९८५ पहिली सात वर्ष.**




^ सरगम इंडस्ट्री - सातपूर नाशिक

हा आपला नायक नाशिक मध्ये आला तो नेमका काळ आर्थिक मंदीचा होता. मात्र त्याकाळात याची जाणीव झालेली नव्हती आणि अर्थकारणाविषयी पूर्ण अनभिज्ञता आणि अज्ञानच होते. वर्ष ७८ / ७९ मध्ये सातपूर औद्योगिक क्षेत्रांत **सरगम इंडस्ट्रीज** या इलेक्ट्रोप्लेटिंगच्या कारखान्याची स्थापना झाली होती आणि व्यवसायला फारशी स्पर्धाही नव्हती. आर्थिक मंदीचा आणि क्रेडीट स्क्वीझचा अदृश्य प्रभाव इतका होता की पुढील दोन वर्षात कामे मिळणेही दुरापास्त झाले होते. विलेपारल्यातील प्रायोगिक रंगभूमीच्या संस्कारातून थेट नाशिकमध्ये आल्यानंतर, दोन्ही शहरातील नाटक – रंगभूमी याविषयाकडे पहाण्याच्या दृष्टीची तफावत त्याच्या लक्षात आली होती. आपला नायक नाशिकमध्ये रमला याचे अगदी प्राथमिक कारण रंगभूमी हेच होते. एकांकिका लेखन – दिग्दर्शन आणि प्रसंगी अभिनय यातच लक्ष केंद्रित झाले होते.




^ सरगम इलेक्ट्रोप्लेटर्स – बडोदा – गुजरात

शहरातील एकांकिका स्पर्धांमध्ये बक्षिसे आणि पुरस्कार मिळत होते. मात्र या दोन वर्षांत **सरगम इंडस्ट्रीचा** उद्योग डबघाईला आला होता. उत्पन्नापेक्षा नुकसानीकडे प्रवास सुरु झाला होता. या परिस्थितीचा दबाव इतका होता की **सरगम इंडस्ट्रीचा** कारखाना विक्रीला काढून ग्राहक पहायला सुरुवात झाली होती. ही विपरीत आणि प्रतिकूल परिस्थिती हे याचे पहिले आव्हान होते. इलेक्ट्रोप्लेटिंग ही सर्व्हिस इंडस्ट्री आहे आणि त्याकाळीही होती. सामान्य नागरिक ग्राहकांपेक्षा अनेक उद्योगांना या व्यवसायाची गरज लागत असते. मुंबईहून आलेला एक देखणा आणि हुशार नाट्यकर्मी म्हणून त्याचा परिचय, उद्योगक्षेत्रांतील हौशी नाटक मंडळाना झाला होता. विशेषतः **MICO INDUSTRY** या कारखान्यातील कर्मचाऱ्यांसाठी काही एकांकिका बसवल्या होत्या. आपल्या नायकाच्या कौशल्याने, याच परिचयातून, या कारखान्यातून त्यांच्या सुट्या भागांना इलेक्ट्रोप्लेटिंगसाठी कामे मिळायला सुरुवात झाली होती. काही काळातच कामांची आवक इतकी वाढली की कामे वेळेत पूर्ण करायला विलंब होऊ लागला.

मंदीचा काळ संपून भरपूर कामे मिळायला लागली होती. अगदी सुरुवातीलाच मंदीच्या फेऱ्यात अडकलेला व्यवसाय स्थिर करण्यासाठी आपल्या नायकाकडे काम मिळवण्याची

क्षमता होती हे त्याच्या स्वतःच्या लक्षांत आले होते. खरे म्हणजे आपल्या वडिलांच्या मार्गदर्शनाने व्यवसायाची सुरुवात झाली होती तरी आपल्या नायकाला व्यवस्थापनाचा अनुभव मात्र शून्य होता. त्यावेळी एका मोठ्या कॉर्पोरेट कंपनीमध्ये फार मोठ्या अधिकाराच्या पदावर असणाऱ्या वडिलांची नेमणूक त्याकाळात कलकत्त्याला झाली होती. व्यवसायाच्या परिस्थितीचे भान ठेवून त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला आणि ते नाशिकमध्ये आले. त्यांच्या अनुभव आणि व्यवस्थापन कौशल्यामुळे, वर्ष १९८४ पर्यंत, **सरगम इंडस्ट्रीच्या** कारखाना आणि व्यवसायाला स्थिरता आली होती.

## वर्ष १९८५ ते २००० पंधरा वर्षे.

प्राथमिक अनुभवातून नवे धडे मिळाले होते आणि आपल्या नायकाचे अंगभूत विक्री कौशल्य आता सफाईदार झाले होते. नाशिक परिसरातील उद्योगांकडून इलेक्ट्रोप्लेटिंगसाठी कामे येत होतीच. आता वर्ष १९८५ मध्ये **औरंगाबाद जिल्ह्यातील उद्योगांकडून** कामाची आवक मोठ्या प्रमाणात सुरु झाली होती. या कामांचे योग्य नियोजन आणि व्यवस्थापन करण्यासाठी **औरंगाबाद जवळील वाळूंज उद्योगक्षेत्रात तेजोनिधी उद्योग या इलेक्ट्रोप्लेटिंगच्या दुसऱ्या कारखान्याची उभारणी झाली होती.** आपल्या नायकाचा धाकटा भाऊ या उद्योगाचे व्यवस्थापन पहाण्यासाठी दाखल झाला होता. मात्र, क्रोम – निकेल – झिंक प्लेटिंग हे सरगम इंडस्ट्री च्या व्यवसायाचे मूळ स्वरूप, वर्ष २००० पर्यंत खूपच बदलले होते.

आपल्या नायकाने विपरीत आणि प्रतिकूल परिस्थितीच्या पहिल्या आव्हानाचा यशस्वी सामना केल्यानंतर त्याला नवे धडे मिळाले होते आणि त्याचा आत्मविश्वास द्विगुणीत झाला होता. आता नवे आव्हान खुणावत होते.



^ सरगम कोटर्स – चाकण – पुणे

मैलोनमैल आडव्या उभ्या पसरलेल्या मुंबईच्या प्रत्येक समस्येचा अनुभव त्याला नित्यनेमाने मिळत होता. त्यातली एक मोठी समस्या म्हणजे पाणी आणि त्याचा नियमित पुरवठा. आपल्या घरापुरत्या पाण्याच्या साठवण आणि पुरवठ्यासाठी, वर्ष १९६० / ७० च्या दशकापर्यंत घराघरातील पोटमाळ्यावर पत्र्याच्या अथवा अल्युमिनियमच्या टाक्या बसवल्या जात असत **(Loft Tanks).** मात्र कालांतराने गंजल्यामुळे त्याची दुरुस्ती शक्य होत नसे. याला पर्यायी व्यवस्था म्हणून प्लास्टिकच्या टाक्या बनवता येतील काय याचा अभ्यास सुरु झाला होता. वाजवी किंमत – दीर्घकाळ टिकाऊपणा – बसवायला सोपी – कमी वजनाची असे या पर्यायाचे फायदे होतेच.

STOREWEL
Futureproof

STOREWEL
Rotomatic Containers Pvt. Ltd.




^ रोटोमॅटिक प्लांट – अंबड – नाशिक

वर्षभराचा अभ्यास – जर्मनीतील डयुसेलडॉर्फ शहरात भरणाऱ्या प्लास्टिक प्रदर्शनाला भेट – प्रकल्पाचे अर्थकारण आणि भारतातील प्लास्टिक टाक्यांचे मोल्ड आणि मशीन बनवणाऱ्या उद्योजकाचा शोध अशा अथक प्रयत्नातून, आतेभाऊ **श्री शंतनू भडकमकर** यांच्या साथीने स्टोअरवेल या नावाने प्लास्टिक टाक्या बनवणाऱ्या **रोटोमॅटिक कंटेनर्स प्रायव्हेट लिमिटेड** या उद्योगाची स्थापना, वर्ष १९८७ मध्ये, अंबड औद्योगिक वसाहतीत कारखाना बांधून करण्यात आली**. उत्तम दर्जा - नियमित पुरवठा अशा वैशिष्ट्यांनी स्टोअरवेल ब्रॅंड भारतभर लोकप्रिय झाला आहे. अनेक आकारातील – पाणी साठ्याच्या विविध क्षमतेच्या टाक्या – स्टील कपाटाना पर्यायी प्लास्टिकची कपाटे – मोठ्या आकाराचे निर्माल्य कलश अशी असंख्य उत्पादनांची निर्मिती हे रोटोमॅटिक कंटेनर्स प्रायव्हेट लिमिटेड या उद्योगाचे वैशिष्ट्य आहे.** नव्याने उद्योग सुरु करण्याची उमेद असलेल्या तरुणांनी, या उद्योगाच्या निर्मितीसाठी केलेल्या **Project Report** चा अभ्यास अवश्य करावा. प्लास्टिक टाक्या बनवण्यासाठीचे जर्मन तंत्रज्ञान ज्या किमतीला उपलब्ध होते त्याच्या फक्त दहा टक्के मूल्यात, वर्ष १९८६ मध्ये, **Make In India** च्या यशस्वी प्रयोगाने, भारतीय तंत्रज्ञाने – भारतात बनवलेल्या यंत्राने या व्यवसायाची सुरुवात झाली होती.







मात्र वर्ष १९८५ ते २००० हा पंधरा वर्षांचा आपल्या नायकाचा ऐन उमेदीचा काळ, त्याला अनेक भल्या – बुर्या अनुभवांचा साक्षीदार बनवून गेला होता. वर्ष १९९० / ९५ या पाच वर्षांच्या काळांत नाशिकच्या उद्योग क्षेत्रामध्ये कामगार असंतोषाचा भडका उडाला होता. हिंसाचार ही झाला होता. आपल्या नायकाने या दीर्घ काळ चाललेल्या या परिस्थितीवर यशस्वी वाटाघाटी करून मार्गही काढला होता. त्या आधीच्या काळात भ्रष्टाचारी सरकारी कर्मचाऱ्यांचा आणि त्यांच्या भ्रष्टाचाराचा निग्रहाने – निर्भयी वृत्तीने समर्थपणे सामनाही केला होता.





**वर्ष २००० पुढील वीस वर्षे**

क्रोम – निकेल – झिंक प्लेटिंग हे सरगम इंडस्ट्री च्या व्यवसायाचे मूळ स्वरूप, वर्ष २००० पर्यंत बदलले होते. औद्योगिक उपकरणांच्या भागांचे **सिल्व्हर प्लेटिंग** करणारा विश्वासार्ह उद्योग आता पाच कारखान्यांसह विस्तारला आहे.






^ मुलगी सौ मुग्धा आणि बंधु श्री देवेश

^ आलाप एन्टरप्राइज सिन्नर – नाशिक

वर्ष २००० पासून सुरु झालेल्या नव्या सहस्त्रकामध्ये, **सरगम इंडस्ट्री** या मूळ व्यवसायाची वृद्धी वेगाने झाली होती. उद्योग विश्वाचा विस्तार जसा होत गेला त्याबरोबरच त्यात आवश्यकते नुसार कालानुरूप बदलसुद्धा होत गेले. धाकटे बंधू श्री देवेश शेवडे – चुलत बंधू श्री सुधांशू शेवडे आणि मुलगी सौ स्निग्धा शेवडे, एकामागोमाग व्यवसाय आणि उद्योग व्यवस्थापनात सहभागी झाले होते. **औरंगाबाद पाठोपाठ सिन्नरला तिसरा कारखाना उभा राहीला होता. राज्याच्या सीमा पार करून चवथा कारखाना गुजरातमध्ये बडोदा शहरातील औद्यगिक वसाहतीत स्थापन झाला होता. पाचवा कारखाना पुण्याजवळील चाकण औद्योगिक वसाहतीत  उभारला गेला होता.**



< श्री लोकेश शेवडे

हा आहे आपला नायक श्री लोकेश शेवडे. याच्या उद्योग विश्वाचा विस्तार जसा होत गेला त्याबरोबरच त्यात आवश्यकतेनुसार कालानुरूप बदलसुद्धा होत गेले. बदल हा तर निसर्ग नियमच आहे. **मी उद्योजक म्हणून जन्माला आलेलो नाही असे निक्षून सांगणारा लोकेश शेवडेही नक्कीच बदलला. प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यावर सरावाने, उपलब्ध परिस्थितीचा सकारात्मक निर्मितीसाठी केलेला वापर त्याच्या खात्यात जमा असूनही...मी उद्योजक म्हणून जन्माला आलेलो नाही असे तो नियमित तत्वावर म्हणत रहातो.** नाशिकमधल्या दैनिक वर्तमानपत्रात, आपल्या निश्चित विचार धारणेने नियमित स्तंभ लेखन करणाऱ्या आणि मुंबईतील महाराष्ट्र टाईम्स आणि लोकसत्ता दैनिकात नैमित्तिक लिखाण करणाऱ्या लोकेश शेवड्यांच्या वाचनाच्या वैविध्यपूर्ण छंदाचा प्रभाव आपल्याला निश्चितच जाणवतो. त्यांची काही पुस्तके प्रकाशित झाली आहेत, काही प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

माननीय **श्री वि वा शिरवाडकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्थापन झालेल्या कुसुमाग्रज प्रतिष्ठान** या नाशिक मधील मान्यवर संस्थेच्या दैनंदिन कामात, पदाधिकारी या नात्याने श्री लोकेश शेवडे नियमित सहभागी असतात. उद्योग व्यवस्थापनातून निवृत्त होऊन, काही वर्षांपासून खंड पडलेल्या नाट्य संहिता आणि एकांकिका संहिता लेखनाला आता पुन्हा सुरुवात करावी असे तीव्रतेने वाटते आहे असे म्हणणाऱ्या लोकेश शेवड्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये झालेला एक दृश्य बदल मात्र आपल्या सर्वांना नक्कीच दिसतो. **सिल्व्हर प्लेटिंगच्या व्यवसायाची प्रगती करताना .... डोक्यावरचे केस चंदेरी कधी झाले हे त्यालाही समजले नाही...!**

विलेपारल्यातून नाशिक शहरात स्थलांतरित झालेल्या श्री लोकेश शेवडे यांनी, त्या शहराच्या उद्योग संस्कृतीत निश्चितच प्रभाव टाकला आहे. त्यांच्या कुटुंबियांसह सर्व सहकार्यांना पुढील प्रगतीसाठी शतशत शुभेच्छा...!

--००--

**आता मी पारल्यात रहात नाही. लेख क्र ३**

# ड्राफ्ट्समन ते क्राफ्ट्समन – एका उद्योजकाचा प्रवास

विलेपारल्याच्या तेजपाल स्कीमच्या पाचव्या गल्लीत भागीरथी भुवनमध्ये रहायचा तो. रस्त्याला लागून असलेल्या चाळीच्या दर्शनी भागात तळमजल्यावर उजव्या बाजूला त्याच्या कुटुंबाचे बिऱ्हाड होते. त्यांचे घर म्हणजे मध्यमशा आकाराची एक खोली होती इतकेच. त्यांचे घर आणि रस्ता यांच्या मध्ये, असावे म्हणून रचलेले जुजबी तारेचे कुंपण. चाळीच्या मालकाने आपल्या मालकीच्या जागेची हद्द निश्चित असावी, कदाचित इतकाच त्याचा उपयोग होता बहुधा. आपला नायक आणि त्याच्या कुटुंबासाठी सुद्धा हे निव्वळ कुंपण होते, मात्र बंधन किंवा मर्यादा निश्चितच नव्हे. एक दिवशी, त्याच्या बिऱ्हाडासमोरच्या या कुंपणाला ओलांडून त्याने थेट नाशिक गाठले होते. ज्याकाळात **Make in India** या संकल्पनेचा उल्लेखही झाला नव्हता त्यावेळी याने स्वतःच्या अभ्यासाने – चिकाटीने – निश्चयाने एक यंत्र बनवले होते. काही वर्षातच भारताच्या सीमा ओलांडून, जगाच्या निर्यात नकाशावर या यंत्राच्या निर्यातीने आपली मुद्रा उमटवली आहे.

वर्ष १९७० मध्ये तो अकरावीची म्हणजे तत्कालीन शालांत परीक्षा उत्तीर्ण झाला तेंव्हा आपला नायक सोळा – सतरां वर्षांचा होता. मोठी बहीण, दोन वर्षांनी मोठा भाऊ आणि सहा वर्षांनी लहान बहीण आणि आई – वडील असे सहा जणांचे त्यांचे कुटुंब त्या मध्यम आकाराच्या खोलीत आनंदाने रहात असे. महात्मा गांधी रस्त्यावरील  केसकर बागेच्या साधारण समोरच्या इमारतीच्या तळमजल्यावर, शहाडे यांचा पंचे डेपो होता. फारसे कधी न बोलणारे त्याचे वडील, नेहेमीच  पांढरे स्वच्छ धोतर आणि पांढरा शुभ्र सदरा याच परिधानात दुकानात कायम दिसायचे. पारंपरिक नऊवारी साडी नेसणारी त्याची गोरीपान मृदुभाषी आई, नेहेमीच हसतमुख असायची. एक सौजन्यशील – सुस्वभावी -- सुखी – समाधानी असा परिचय असलेल्या या कुटुंबाचे अर्थकारण, तत्कालीन विलेपारल्यातील बहुतांशी अन्य मध्यमवर्गी कुटुंबासारखेच होते.



^ श्री अरुण आपटे

काहीच वर्षांनी मोठा असलेल्या आपल्या नायकाच्या भावाला तोपर्यंत, पन्नास वर्षांपूर्वी प्लॅस्टिक उद्योगात फार मोठे नाव असलेल्या एक मराठी उद्योगात, छानशी नोकरी लागली होती. शाळेनंतर मुलांनी शिकावे अशी पालकांची अपेक्षा तर नक्कीच होती. मात्र कुटुंबाची परिस्थिति ओळखून, जबाबदारीची निश्चित जाणीव असलेली तरुण मुले, शिक्षण घेतानाच नोकरीही करत होती. आपल्या नायकाची गोष्ट थोडीशी वेगळी होती. मोठ्या भावाच्या परिचित असलेल्या श्री मेहेंदळे यांच्या शिफारशीने, वर्ष १९७० मध्ये त्याला महाराष्ट्र प्लॅस्टिक इंडस्ट्री मध्ये नोकरी लागली होती. आता तो पूर्णवेळ नोकरी करून मग पुढील शिक्षण घेत होता. संध्याकाळी कारखान्यातील काम संपवून, रोज जोगेश्वरीहून दादरमार्गे व्हिटीच्या कॉलेजात मेकॅनिकल ड्राफ्ट्समन डिप्लोमाचे शिक्षण घेत होता. आजच्या घडीला, याच नेमक्या मेकॅनिकल ड्राफ्ट्समन कौशल्याचा उपयोग करून **एक यशस्वी क्राफ्ट्समन अर्थात नामवंत यंत्रज्ञ झालेला आपला नायक** नव्या नव्या यंत्रांची डिझाईन करतो आहे आणि यशाच्या नव्या पायऱ्या चढतो आहे. पुढील काळांत आपल्या नायकाला प्लॅस्टिक उद्योगातच यंत्र निर्मितीचे  काम करायचे आहे यांचे बहुधा नियतीने दिलेले हे संकेत होते... आखून दिलेला मार्ग होता..!

लोकमान्य सेवा संघ, पारले ही विलेपारल्यातील नामवंत सामाजिक – सांस्कृतिक संस्था आहे. प्रतिभावान लेखक – दिग्दर्शक आणि नाट्यकर्मी कै श्री विजय बोन्द्रे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्ष १९७० मध्ये संस्थेच्या नाट्यशाखेत, प्रायोगिक रंगभूमीची चळवळ आकार घेत होती. शाळासोबती असलेल्या मित्रांसाह आपला नायक प्रायोगिक रंगभूमीच्या या चळवळीत दाखल झाला होता. मात्र आपल्या शाळासोबत्यां सारखा त्याला अभिनयात रस नव्हता. **गॉसिप गृप** या अनोख्या नावाच्या गृपमध्ये लेखन – दिग्दर्शन – वाचन – अभिनय – नेपथ्य – प्रकाश योजना – निर्मिती यांची चर्चा होत होती. शाळेतील बंदिस्त शिस्तीतून बाहेर पडल्यावर ... जगाकडे बघायची – समाजातले व्यवहार समजून घ्यायची – सभोवती असणाऱ्या माणसांचा योग्य परिचय करून घ्यायची ... अशा गोष्टी प्रत्यक्ष शिकवल्या जात नसल्या तरी होणाऱ्या संवादातून अप्रत्यक्ष रीतीने प्रत्येकाच्या स्मरण वहीत नोंदल्या जात होत्या. सर्वांसह आपल्या नायकालासुद्धा यांचा फायदा नकळत झालाच होता. श्री विजय बोन्द्रे यांच्या बरोबरच्या अनेक संवादातून आत्मविश्वास मिळाला होता आणि असंख्य गोष्टींच्या जाणीवा जागृत झाल्या होत्या, अशी कृतज्ञता आपला नायक आजही जपतो आहे.

आपला नायक फार सौम्य स्वभावाचा – अगदी मितभाषी नसला तरी विचार करून मोजून नेमके बोलणारा आहे. सततच्य प्रयत्नांचे -- नियमित आणि वक्तशीर व्यवहारांचे महत्व, अशा याच्या विवेक आणि चातुर्याच्या बुद्धीनिष्ठ गुणवत्ता, निसर्गदत्त आहेत, त्याच्या कुटुंब शिस्तीतून आल्या आहेत. आता वयाची पंचविशी पार झाली होती. वर्ष १९७० ते १९७९ अशी साधारण आठ – नऊ वर्ष, महाराष्ट्र प्लॅस्टिक इंडस्ट्री मध्ये भरपूर अनुभव गाठीला बांधला होता. शाळेपासून एकत्र असलेल्या स्नेहींबरोबर रोजच्या भेटीत विचार करताना, स्वतःचा व्यवसाय करायची स्वप्ने पडू लागली होती. उद्यमशील चित्त आणि वृत्ती, दोन्ही स्वस्थ बसू देत नव्हती. कधी तरी सुरुवात होणे महत्वाचे होते.

श्री श्रीरंग मच्छे आणि श्री उद्धव देसाई या दोन स्नेहींशी झालेल्या दीर्घ मसलतीतून, मुंबई सोडून नाशिकला जाण्याचा निर्णय झाला होता. स्वतंत्र भारतात, साठ – सत्तर वर्षांपूर्वीच्या त्या काळांत, औद्योगिक प्रगती आणि अर्थकारण यांच्या तुलनेत, नाशिक हे ब दर्जाचे शहर होते. मात्र अनेक मोठ्या उद्योगांनी सातपूर आणि अंबड या दोन औद्योगिक वसाहतीत, हळूहळू आपल्या कारखान्यांमध्ये विकासाचा पाया घातला होता. कुंपणापलीकडून पहाणाऱ्यांसाठी, नाशिकमध्ये उद्योग -- व्यवसाय करणे हे न पेलणारे आव्हान

होते. मात्र स्नेहींसह आपल्या नायकासाठी ही उत्तम संधी होती. त्यासाठी एक धाडस करणे आवश्यक होते. कुटुंबीयांशी सल्ला – मसलत करून, वर्ष १९७९ मध्ये महाराष्ट्र प्लॅस्टिक इंडस्ट्रीच्या नोकरीचा राजीनामा देऊन त्याने नाशिकसाठी प्रस्थान ठेवले होते. मात्र हा निर्णय काही विचारा अंतीच झाला होता.

आज मागे वळून पहाताना, वर्ष १९७९ आणि पुढची चार - पांच वर्षे नेमकी आर्थिक मंदीची होती हे आपल्या लक्षात येते. त्या मंदीच्या आणि महागाईच्या काळातही नव्या शहरात नवा व्यवसाय हे धाडस होते कारण त्याकाळात – त्याक्षणी, त्या मंदीच्या अर्थव्यवस्थेचा परिचय झाला नव्हता. या सुरुवातीच्या काळांत टिकून रहाण्यासाठी, काम मिळवून न थकता ते पूर्ण करायचे यासाठी, सातत्य – जिद्द – निग्रह या गुणवत्ता कुठल्याही व्यवसाय अथवा उद्योगासाठी आवश्यक असतात. आपल्या नायकाला या गुणवत्ता निसर्गदत्त प्राप्त झाल्या होत्या. विलेपारल्यातील एक जुना स्नेही श्री श्रीरंग मच्छे, दोन वर्षे आधीच नाशिकमध्ये स्थायीक झाला होता. त्याच्या साथीने परफेक्ट सर्कल या मोठ्या उद्योगाच्या उत्पादनांपैकी काही सुट्या भागांच्या ब्लॅकोडायझिंगचे म्हणजे काळ्या रसायनाचा लेप द्यायचे काम मिळाले होते. दुसऱ्या स्नेह्याच्या सौजन्याने त्याच्या कारखान्यात एका बाजूला छोटा टँक बनवून हे काम सुरू झाले होते. **एकमेका सहाय्य** याचे हे उत्तम उदाहरण होते. हे काम वर्ष १९८३ पर्यन्त चालू राहीले. याच वेळी विलेपारल्यातील दुसरा स्नेही श्री उद्धव देसाई यांच्या सहकार्याने **Mosquito repellent** म्हणजे शरीरापासून डासांना दूर ठेवणारे लिक्विड बनवण्याची आणि त्याच्या विक्रीची सुरुवात झाली होती. उशिरापर्यंत कामे करून, मुख्य दरवाजा नसलेल्या स्नेह्याच्या कारखान्यात अनेक रात्री झोपून काढल्या होत्या. व्यवसाय – उद्योगांची कुटुंबाची कुठलीही पार्श्वभूमी नसताना, त्या मंदीच्या काळांत **To keep floating** म्हणजे वेगाने उसळणाऱ्या पाण्यात स्वतःच्या हिमतीवर खंबीरपणे तग धरून रहाण्याचा तो यशस्वी प्रयत्न होता.

**साहसे श्री प्रतिवसती** हे आपल्या प्राचीन विद्वानांनी लिहिलेले वचन अगदी खरे आहे. काहीच काळांत वर्ष १९८३ मध्ये सातपूर औद्योगिक वसाहतीत पहिल्या कारखान्यासाठी जागा घेतली आणि प्रथम एक खोली बांधून कारखान्याचा पाया रचला गेला होता. विलेपारल्यातील तिसरा स्नेही श्री प्रशांत गडकरी यांच्या सहकार्याने, वर्ष १९८३ मध्ये महिंद्र अँड महिंद्र या वाहन उद्योगाच्या ॲम्ब्युलन्स आणि दहा आसनी रिक्षाच्या **MS body** म्हणजे

लोखंडी सांगाडे बनविण्याचे काम मिळाले आणि १९८६ पर्यन्त यशस्वीपणे पूर्ण झाले. वर्ष १९७९ पासून सुरू असलेल्या प्रयत्नांना म्हणावे तसे यश आता मिळाले होते, सर्वांचा उत्साह वाढला होता आणि अर्थातच **श्री** म्हणजे अर्थकारण सशक्त झाले होते. या पांच – सहा वर्षांच्या काळांत कुटुंबाची सर्व जबाबदरी, मोठे बंधु श्री विजय आपटे यांनी समर्थपणे सांभाळली होती या साठी तो आजही कृतज्ञ आहे. वर्ष १९८७ मध्ये, आपल्या नायकाचा सौ विद्याशी विवाह झाला आणि त्या दोघांचे कौटुंबिक जीवन सुरू झाले होते. वाचकांना कदाचित थोडेसे आश्चर्य वाटेल पण सुरुवातीच्या काळांत केलेल्या श्रमातून मिळालेल्या उत्पन्नाची बचत करून कारखान्याची पहिली खोली बांधली गेली होती. महत्वाचे म्हणजे  आजपर्यंत कुठल्याही प्रकारचे कर्ज न घेता या व्यवसायाची प्रगती झाली आहे.

व्यवसाय वृद्धीचा आता पुढचा टप्पा सुरू झाला होता. याच काळांत, मोठे बंधु श्री विजय आपटे यांना, **Shrinkable Plastic** या नव्याने उपलब्ध झालेल्या एका प्लॅस्टिक उत्पादनाचा दीर्घ अनुभव मिळाला होता. उष्णता दिल्याने नियंत्रित प्रमाणात आक्रसणारे किंवा संकुचित होणारे हे प्लॅस्टिक, छोट्या – मोठ्या वस्तूंच्या वेष्टनासाठि कागदी खोक्यांना पर्याय म्हणून वापरायला  सुरुवात झाली होती. (चित्र क्र १). हे प्लॅस्टिक, फिल्म रोलच्या आणि स्लीव्ह स्वरूपात, अनेक आकारात उपलब्ध असते. (चित्र क्र २).  सुरुवातीला अशी **श्रिंकेबल फिल्म** किंवा **श्रिंक फिल्म** बनवणाऱ्या यंत्राच्या निर्मितीचे प्रयत्न वर्ष १९८७ पासूनच सुरू झाले होते. निश्चित ध्येय धारणा -- चिकाटी – सातत्य – प्रयोगशील वृत्ती यासह स्थिर चित्ताने, **Make in India** संकल्पनेची सिद्ध झालेली ही तीस वर्षांपूर्वी गोष्ट आहे. वर्ष १९९० मध्ये या यंत्राची निर्मिती यशस्वी झाली आणि त्याचवेळी **श्रिंकेबल फिल्मचे** उत्पादन सुरू झाले आणि ते वर्ष १९९३ पर्यन्त सुरू राहिले.





**^ चित्र १** श्रिंकेबल फिल्मचे वेष्टन



**^ चित्र २** अनेक आकारात श्रिंक फिल्म

भारतात या **श्रिंकेबल फिल्म** बनवणाऱ्या यंत्रांची मागणी वाढली त्यामुळे श्रिंकेबल फिल्मचे उत्पादन थांबवण्याचा निर्णय घेऊन फक्त यंत्रांच्या निर्मितीवर लक्ष केंद्रित झाले. वर्ष १९९५ पासून या यंत्रांची परदेशात, नेपाळ – बांगलादेश -- श्रीलंका – केनिया – इराण – लागोस या देशांत निर्यात सुरू झाली. या प्रकारच्या सर्व यंत्र निर्मितीमध्ये गेल्या पंचवीस वर्षांत, **आपटे प्लॅस्टिक** या उद्योगाची मक्तेदारी सिद्ध झाली आहे.



**^** श्री अरुण आपटे

**आपला नायक आहे नाशिक उद्योग जगतातील प्रगतिशील उद्योजक श्री अरुण आपटे**. वर्ष १९७९ मध्ये विलेपारल्याहून नाशिक मध्ये गेल्यानंतरच्या निव्वळ चाळीस वर्षांत,

मोठे बंधु श्री विजय आपटे यांच्या सल्ला आणि सहकार्याने, याने **आपटे गृप ऑफ कंपनीजचा** पाया रचून आता त्याचा विस्तार केला आहे. नव्या उत्पादनाचे आव्हान आणि धाडसी वृत्ती याला उत्तम अर्थ नियोजनाची आणि व्यवस्थापन कौशल्याची जोड मिळाली आणि वर्ष २०१५ मध्ये **पॉलिकार्बोनेट** या वेगळ्या प्रकारच्या प्लॅस्टिकची निर्मिती सुरू झाली होती. या प्लॅस्टिकच्या शीट बुलेटप्रूफ जॅकेट बनविण्यासाठी अस्तर म्हणून आतल्या बाजूला जोडल्या जातात. पूर्वी या प्रतीचे प्लॅस्टिक परदेशातून आयात करावे लागत असे. देशाच्या संरक्षण दलासाठी अत्यावश्यक या विशेष उत्पादनात आपला देश आता आत्मनिर्भर झाला आहे.



**^** चित्र ३ **Extruder model machine**




**^** चित्र ४ **Chamber type Machine**


या छायाचित्रातील सर्व यंत्रांची निर्मिती आता **आपटे गृप ऑफ कंपनीज** या विस्तारलेल्या उद्योगातर्फे नाशिक मध्ये सातपूर औद्योगिक वसाहतीतील तीन कारखान्यातून केली जाते. या सर्व कारखान्यात मिळून आज सत्तर कर्मचारी काम करतात.



**^** चित्र ५ **High Speed Mixer**



**^** चित्र ६ **Gluing in Processing Machine**





^

चित्र ७ **Gluing in Machine with web^** चित्र ८ **Mulching Paper Machine**

वर्ष १९९७ मध्ये दोन्ही भावांनी स्वतःचे घर घेतले आणि खऱ्या अर्थाने दोघे नाशिककर झाले. नवी मशीन डिझाईन करणे या एका छंदापाई **यंत्रज्ञ अरुण** कधीच थांबला नाही. बागायती आणि शेतकी व्यवसायात आवश्यक, नव्याने उपलब्ध झालेल्या **Mulching Film** या वेगळ्या प्रकारच्या प्लॅस्टिक उत्पादनाची सुरुवात, नव्याने बांधलेल्या तिसऱ्या कारखान्यात आता अगदी अलीकडे झाली आहे. यासाठी आवश्यक यंत्र अन्य उत्पादकाकडून घेण्यात आले आहे. (**चित्र ८**) ही तीन लेयर **मल्चीग फिल्म** शेतकीसाठी तयार केलेल्या जमिनीवर प्रथम अंथरली जाते आणि मग त्यावर पेरणी केली जाते. पाण्याची बचत – आर्द्रतेचे आणि सूर्यप्रकाशाच्या उष्णतेचे योग्य नियंत्रण असे या **Permanent Plastic** चे फायदे आहेत.





**^** चित्र ९ आपटे प्लॅस्टिक टेक्निकल एक्स्ट्राक्शन कारखाना, सातपूर नाशिक





^ फोरसम एन्टरप्राइज कारखान्याची ही इमारत आणि बाजूच्या प्लॉटवर फुललेली बाग.

वरील छायाचित्रात दिसणारा हा सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम, सातपूर **MIDC** च्या सहकार्याने उभा राहीला आहे. आपटे गृप ऑफ कंपनीज तर्फे इथे नारळ – आंबा – अन्य फळझाडे – औषधी वनस्पति यांची लागवड करून त्यांची नियमित देखभाल केली जाते. येत्या काही काळातच मधमाशा पालन उपक्रम सुरू होणार आहे.



^ सौ विद्या + श्री अरुण + चि सुखदा



^ श्री विजय + सौ विभा

मोठे बंधु श्री विजय आपटे – डॉ बाळ गंगाधर क्षीरसागर – श्री आदित्य आनंद भावे अशा अनुभवी आणि या उत्पादन क्षेत्रात विशेष कौशल्य विकसित केलेल्या सहकाऱ्यांच्या बरोबर आज श्री अरुण आपटे, या स्वतः प्रगत केलेल्या उद्योगाचे नेतृत्व आणि व्यवस्थापन करतो आहे. त्याच्यासह आपटे गृप ऑफ कंपनीजच्या सर्व कर्मचारी -- व्यवस्थापक आणि सर्व आपटे कुटुंबियान शतशत शुभेच्छा..!

--○○--

**आता मी पारल्यात रहात नाही. लेख क्र ४**

# पुण्यातील The Box Theatre अनोखे रंगअवकाश

हुशार तरुण विद्यार्थी... आपले नियोजित शिक्षण अचानक अर्धवट सोडून का देतात..!?.. असा निर्णय का घेतात..!?.. या निर्णयापाठी काही तर्कशुद्ध विचार असतो का..!?.. भावनेच्या आहारी जाऊन एका आवेगात तर असे निर्णय होत असावे का..!?.. हे शिक्षण अर्ध्यावर सोडले ठीक आहे.. यापुढे काय असा विचार होत असतो का..!?.. आपल्या नायकाने **MBBS** च्या तिसऱ्या वर्षांची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अचानक हा शिक्षणक्रम सोडण्याचा निर्णय नक्की का घेतला असावा..!?.. कित्येक वर्षे झाली, या अशा तरुणांनी असे निर्णय का घेतले, याची एक उत्सुकता, कायम घर बनवून बसली आहे मनात..!..ही उत्सुकता यासाठी.. की नंतरच्या काळांत नेमक्या याच तरुणांना, त्यांनी तो निर्णय घेतल्या नंतरच्या काळांत, वेगळ्या क्षेत्रात घेतलेले शिक्षण – अनुभव आणि मिळालेले यश सुद्धा मला पहाता आले आहे. असे बदल करण्याची आणि धाडसाने तसे निर्णय घेण्याची उर्मी – ऊर्जा – चेतना यांना नक्की कुठून मिळते..!?.. याला काय काय संबोधने वापरायची असा प्रश्न नेहेमीच पडला आहे..! त्या तरुण वयात, आपल्याला नक्की काय करायचंय – नक्की काय शिकायचंय त्याची .. **स्वतःची असलेली योग्य ओळख म्हणावे**.. की **झालं खरं त्यावेळी** असे म्हणून सोडून द्यावे .. की **नियतीने त्याच्यासाठी आखलेला हाच खरा मार्ग होता**..असे म्हणावे...!.. गंमत म्हणजे, माझ्या मुलाच्या अश्या बदललेल्या निर्णयाचा मी साक्षीदार आहे..!!

इंडियन एक्सप्रेस ५ नोव्हेंबर, २०२०

**In a first for Pune, a new black box throws open the doors to imagination.**

टाइम्स ऑफ इंडिया, पुणे १३ डिसेंबर २०२०

**First BLACK BOX Theatre in Pune is a Surprise Hit...**


Whats Hot, १४ डिसेंबर, २०२०

**From Plays To Performances, Punekars, Are You Ready For Pune’s Very First Black Box Theatre In The City?**

नोव्हेंबर – डिसेंबर २०२० मध्ये, म्हणजे मार्च २०२० च्या चवथ्या आठवड्यात सुरू झालेल्या करोना महामारीचा प्रभाव थोडासा कमी होत असतांना अगदी अलीकडे, पुण्यातील तीन इंग्लिश वृत्तपत्रांनी **The Box** या रंगभूमीवरील नव्या प्रयोगाची घेतलेली ही दखल आह. याचा संकल्पक निर्माता आपला नायक आहे.




**^ The Box Logo**



**^** श्री प्रदीप वैद्य

परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर, त्याने पुढील शिक्षण थांबवल्याला, आता काही वर्षे लोटली होती. शाळेत असताना श्री रामकृष्णबुवा पटवर्धन यांच्याकडे आणि नंतर कॉलेजमध्ये गेल्यावर तो डॉ अजय पोहनकर यांच्याकडे शास्त्रीय संगीत शिकत होता. नंतरच्या काळात वर्ष १९८९ ते १९९१ मध्ये डॉ चंद्रप्रकाश द्वीवेदि यांच्या प्रस्तावित आर्य चाणक्य या दूरदर्शन मालिकेसाठी संगीत नियोजन करत होता.


त्यानंतर वर्ष १९९३ मध्ये त्यांच्याच **चिरंतन** या चित्रपटाच्या संगीत दिग्दर्शनाची जबाबदारी त्याच्यावर आली. हा महत्वाकांक्षी प्रकल्प फार मोठ्या पायावर रचला गेला होता.

आपल्या नायकाच्या संगीत दिग्दर्शनाने स्वरबद्ध केलेल्या, श्री सुरेश वाडकर, श्रीमती साधना सरगम, श्री उदित नारायण, श्रीमती महालक्ष्मी अय्यर, श्री रवींद्र साठे यांनी गायलेल्या, या मालिकेच्या पहिल्या गाण्यासह, त्यावेळी गोरेगावच्या सहारा साऊंड स्टुडिओचे उद्घाटन झाले होते. निर्मात्याबरोबर झालेल्या मतभेदातून सुरू होण्याआधीच मालिकेचा पूर्ण प्रकल्प रद्द केला गेला होता आणि आपल्या नायकाची संगीतकार म्हणून कारकीर्द सुरू होऊ शकली नव्हती. आपला हा नायक विलेपारल्यातून पुण्यात स्थाईक झाला त्याची ही गोष्ट.

वर्ष १९७० ते १९८० या काळांत श्री विजय बोंद्रे यांच्या गॉसिप गृपमुळे, विलेपारले हे उपनगर प्रायोगिक रंगभूमीचे महत्वाचे केंद्र होते. साधारण वर्ष १९८० नंतरच्या काळांत विलेपारल्यातील नाटकवेड्या तरुणाईचे गृप, काही काळ प्रायोगिक नाटके आणि एकांकिका सादर करत होते. स्नेही श्री अशोक खरे यांच्यासह आपल्या नायकाने स्थापन केलेल्या **शेफाली** या गृपमध्ये आपला नायक आणि अन्य सदस्य संगीत आणि नाटके अशा उपक्रमात सहभागी झाले होते. नाट्यलेखन आणि नाट्य दिग्दर्शनाचे प्राथमिक धडे त्याने इथेच गिरवले होते. या गृपमधील त्याचे काही तत्कालीन सहकारी, नंतरच्या काळांत रंगभूमि आणि चित्रपट सृष्टीत खूप यशस्वी झाले होते. हे सर्व जरी खरे असले तरी **होते कुरूप वेडे पिल्लू तयात एक** अशीच याची परिस्थिति होती. कायम अस्वस्थ रहाणार हा आपला नायक नक्की काय करतोय, कारकिर्दीच्या कुठल्या दिशेने निघालाय, त्याचा अंदाजच कोणाला लागत नव्हता.

आता खूप यशस्वी झालेल्या एका नामवंत अभिनेत्याचा भाऊ त्याकाळात नायकाचा स्नेही आणि भागीदार होता, आजही आहे. त्याच्या बरोबर एक जाहिरात कंपनी सुरू केली होती त्याची कामे आपला नायक सांभाळत होता. त्या संदर्भात वर्ष १९८८ पासून त्याच्या पुण्यासह सोलापूर-सांगलीच्या फेऱ्या सुरू झाल्या होत्या. मूळ पुण्यातील संगीत क्षेत्रातील प्रयोग करणाऱ्या काही मित्रांचा परिचय झाला होता तरी आपल्या नायकांचे पाऊल पुण्याच्या संगीत क्षेत्रात पुढे पडत नव्हते. योगायोगाने लहान मुलांसाठी गोष्टींच्या कॅसेट बनवणाऱ्या **Fountain Music** या कंपनीकडून काही पार्श्वसंगीताची कामे मिळाली होती, मात्र ती कामे अल्पकाळासाठी होती. याच दरम्यान पुण्यातील तरुण **रूपाली भावेशी** परिचय झाला होता. **प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन** अर्थात **PDA** या पुण्यातील प्रख्यात नाट्यसंस्थेची, रूपाली सदस्य होती आणि नाटकांत सहभाग घेत होती. कालांतराने **रूपाली भावे** आपल्या नायकाची जीवनसाथी झाली आहे.

वर्ष १९९०  च्या दरम्यान, रूपाली भावे **PDA** च्या राज्य नाट्य स्पर्धेतील नाटकात काम करत होती. वर्ष १९९०  मध्येच राज्य नाट्य स्पर्धेतील पदार्पणातच अभिनयातील पदकाची ती मानकरी झाली होती. याच काळांत महाराष्ट्र कल्चरल सेंटरच्या कामात आणि पुण्यातील अन्य रंगमंचावरही समांतर आणि प्रायोगिक नाटकातून तो प्रकाशयोजनाकार  – दिग्दर्शक  – लेखक – निर्माता – संगीतकार अशा भूमिकातून सहभागी होत राहीला होता. वर्ष १९९८ रूपाली भावेशी विवाह झाल्यानंतर, मध्ये त्याने पुण्यात कायमचे राहायला जायचा निर्णय घेतला होता. वर्ष १९९८ मध्ये तो कर्वेनगर परिसरात रहायला आला.



< श्री प्रदीप आणि सौ रूपाली

एक लक्षात घेणे आवश्यक आहे....एखाद्या व्यक्तीचे कर्तृत्व सिद्ध होण्यासाठी... त्या व्यक्तीचे वय काय आहे याच्याशी त्याचा काहीच संदर्भ नसतो. वयाच्या वीस – पंचविशीत कर्तृत्व सिद्ध करणारे महानुभाव आपल्याला माहीत आहेतच. अशी कर्तृत्वसिद्धी होण्यासाठी काही महानुभाव आपल्या नायकासारखे वयाची पन्नाशी गाठतात हे ही वास्तव आहे. दुसरी गोष्ट अशी की एखाद्या कामात कर्तृत्व सिद्ध होणे, त्या कामात त्याचे यश समाजमान्य होणे यासाठी, सामान्यतः आपण **आर्थिक  यश** हे एकच परिमाण, निकष किंवा फुटपट्टि वापरतो आणि परीक्षा करून मोकळे होतो...!..नवी संकल्पना आणि त्याचे एखादे नवे काम उभे करताना त्यामागील **अनुभव – परिश्रम – नावीन्य – परिपूर्णता** याचा विचार आपण सहसा करत नाही....कारण अशा नव्या संकल्पनेकडे अथवा कामाकडे पहाताना आपण पूर्वानुभवाची अनेक भिंग वापरतो. कदाचित यामागे प्रत्येकाची, आपण न्यायनिष्ठुर असल्याची फसवी धारणा असते म्हणून प्रत्येकाचे भिंग वेगळे असते.




< श्री प्रदीप वैद्य


वर्ष १९९८ मध्ये पुण्यात स्थायिक झाल्यानंतर हा अस्वस्थ नायक, रंगभूमीवर आणि रंगमंचावर अनेक माध्यमातून सतत व्यक्त होत राहिला आहे. भरपूर अनुभव गाठीला बांधत राहिला आहे. सतत तीन वर्षे राज्य नाट्य स्पर्धच्या पुणे केंद्रातून प्रथम क्रमांकाने सन्मानित झाला आहे. आपल्या आर्थिक यशाच्या भिंगाचा वापर करून याच्या या कारकीर्दीकडे पहाणे उचित ठरणार नाही. याच अस्वस्थ काळांत, रंगभूमिकडे आकर्षित होणाऱ्या नव्या तरुण पिढीला प्रशिक्षण दिले जात होते. त्यासाठी अनेक संस्थांची दीर्घ कालावधीची अभ्यास शिबिरे होतीच. एकविसाव्या शतकात वेगाने बदलणाऱ्या – प्रगत झालेल्या समाजमाध्यमांनी अनेक संदर्भ बदलून टाकले आहेत. सुरुवातीला फेसबुक आणि ट्वीटर सारख्या समाज माध्यमात, राजकीय संदर्भ असलेल्या विषयापूरते हे बदल प्रभावी झाले होते. मार्च २०२१ मध्ये कोविड १९ च्या समाजातील प्रत्येकाला बसलेल्या अनपेक्षित हादऱ्यामुळे, व्यक्त होण्यासाठी या समाजमाध्यमांचे अन्य फायदे लक्षात आले. मात्र त्याआधी चित्रपट – नाटक – मनोरंजन व्यवसायातील ऑनलाईन तिकीट विक्री व्यवस्था आणि जाहिरातीसाठी या माध्यमांचा सुयोग्य वापर वर्ष २०१५ पासून सुरू झाला होता.

वर्ष २००७ मध्ये **Expression Lab** संकल्पनेचा वापर आपल्या नायकाने एका नाट्य प्रशिक्षण कार्यशाळेसाठी प्रथम केला होता. नाटयशिक्षणसाठी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून तरुण – तरुणी पुण्यात येत असतात. त्यातला प्रत्येकजण आपली मराठी भाषेतील


आपली प्रादेशिक बोली घेऊन आलेला असतो. त्याचा प्रत्येकाचा लहेजा वेगळा आणि महत्वाचा असतो. पुणे - मुंबईत बोलली जाणारी मराठी बोली प्रमाण आहे ती आधी शिका असा आग्रह, नाट्यशिक्षण सुरू करताना धरला जात असे. आपल्या नायकाने या मांडणीत पूर्ण बदल केला आणि प्रादेशिक बोलीचे महत्व जाणून ती जपण्याचे काम केले. वर्ष २०१७ पर्यंतच्या दहा वर्षांत, साडेपाचशे तरुण – तरुणी या कार्यशाळेत सहभागी झाले आहेत. रंगमंचावर व्यक्त होण्यासाठी आपल्याकडे उपलब्ध शरीर – मन – बुद्धी याचा योग्य वापर याची जाणीव – जागृती असा या संकल्पनेचा मुख्य गाभा होता. यातूनच **एकलनाट्य** ही संकल्पना, सोलो फेस्टिव्हलमध्ये वापरता आली आणि आंतरराष्ट्रीय मंचावर पोहोचण्यासाठी त्याचा किमान सव्वाशे तरुण नाट्यकर्मींनां उपयोग झाला. अनेक तरुण –तरुणींनां नाटक – चित्रपट – मालिका विश्वात प्रवेश मिळाला.




< **The Box** चे प्रवेशद्वार >




**आपला नायक आहे विलेपारल्यातून पुण्यात स्थाईक झालेला अनुभवी रंगकर्मी श्री प्रदीप वैद्य**..!..किमान चाळीस वर्षांचा अनुभव असलेल्या या आपल्या पारलेकर रंगकर्मीने....**रंगअवकाश** म्हणजे **The Box** हे एकहाती उभे केलेले बहूउद्देशीय आणि लवचिक त्रिमीती रंगमंचाचे काम अनपेक्षित आहे....तरीही प्रयोगशील आधुनिक भारतीय रंगभूमीवरचे पुढचे पाऊल आहे आणि म्हणून ते काम आणि श्री प्रदीप हे दोन्ही कौतुकास पात्र आहेत. प्रयोगशील असणारे काही रंगकर्मी सुद्धा वाढत्या वयात प्रस्थापित होताना दिसतात....तेंव्हा नव्या रंगभूमीवरील अशा नव्या प्रयोगांची दाखल घ्यायला बिचकतात.



< श्री प्रदीप वैद्य

प्रदीपने लिहिलेल्या आणि दिग्दर्शित केलेल्या **सहस्त्रचंद्रदर्शन** या नाटकाला वर्ष २००७ मध्ये राज्य नाट्य स्पर्धेत पुणे केंद्रात प्रथम क्रमांक मिळाला होता. वर्ष २०१७ मध्ये प्रदीपने या नाटकाचे **काजव्यांचे गांव** या नांवाने पुनर्लेखन केले आणि समांतर रंगभूमीवर ते सादर झाले. लेखन – दिग्दर्शन – नेपथ्य यापुरती याची प्रयोगशील बांधणी मर्यादित नव्हती. एक नाट्यसंहितेचे, दहा वर्षानंतर पुनर्लेखन हा सुद्धा महत्वाचा प्रयोगच होता. आता आकृतिबंध आणि प्रेक्षागृहतील आसन मांडणी यातही, प्रदीप नवे प्रयोग करतो आहे. अनेक पुरस्कार प्राप्त या नाटकाचे मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात सलग सात प्रयोग, प्रदीपच्या **The Box** मध्ये सादर झाले आहेत. प्रत्येक प्रयोगात काही पात्रांसाठी नविन अभिनेते – अभिनेत्री असाही प्रयोग केला गेला आहे.




^ काजव्यांचे गांव चे १४ मार्च २०२१ पर्यंत ७० प्रयोग झाले आहेत

**MBBS** ला प्रवेश घेतल्यापासून ते अर्ध्यातच थांबवतानां, नंतरच्या काळांत सतत कार्यव्यस्त रहाणाऱ्या प्रदीप वैद्यला अपेक्षित यश वाकुल्या दाखवत होते की हाच अपयशाचा पाठलाग करत होता याचा उलगडा जवळच्या स्नेही-सुहृदांना अजूनही झालेला नाही. सातत्याने यश-अपयशाच्या छायाप्रकाशात वावरणाऱ्या अशा महानुभावांना नियती एक वरदान देत असावी कारण निराशेची सावलीसुद्धा यांच्यावर कधी पडत नसते. कर्वेनगर परिसरात चालत जाताना बंद पडलेल्या **RESCON** या कारखान्याचा परिसर रोज दिसत होता. या कारखान्याच्या रिकाम्या जागेत काहीतरी करता येईल याचा विश्वास दिवसेंदिवस दृढ होत होता. या बंद असलेल्या कारखान्यातील घनता असलेली पूर्ण अंधारी जागा म्हणजे एखाद्या रंगमंचाच्या त्रिमीती संरचनेसाठी एक आव्हान आहे याची जाणीव अस्वस्थ करत होती. मानवनिर्मित प्रकाशयोजनेच्या मांडणीतून अशा पूर्ण बंदिस्त अंधाऱ्या जागेत एखाद्या नाटकासाठी वेगळे जगच निर्माण करता येणार होते याची स्वप्ने त्याला पडत होती. हेच त्याच्या नजरेत असलेले **रंगअवकाश** होते. एकेकाळी या इमारतीत कारखाना होता, आणि औद्योगिक क्षेत्र असल्याने साहजिकच प्रकाशयोजनेसाठी आवश्यक वीज पुरवठा उपलब्ध होता, नव्हे त्यापेक्षाही जास्त म्हणजे ५०० kw चा, ही व्यवहारीक वास्तवातील जमेची बाजू होती.

याच जागेत आपल्याला काही निर्माण करायचे आहे .. .. त्यासाठी मोठा अर्थपुरवठा आवश्यक आहे जो आपल्याकडे नाही .. .. तरीही आपण हे करायचे आहे असा निग्रह मात्र झाला होता. सौ परिमल चौधरी आणि श्री प्रमोद चौधरी हे पुण्यातील उद्योजक दांपत्य आणि **RESCON** या कारखान्याचे तेव्हाचे संचालक अभिषेक दोशी यांच्याशी प्राथमिक चर्चा सुरू झाली होती. चौधरी दांपत्याने संपूर्ण प्रकल्पाला आवश्यक अर्थपुरवठा करण्यासाठी संमती दिली आणि **The Box** पुढची संकल्पना पुढच्या  टप्प्यावर पोहोचली होती. .

**Expression Lab** या प्रदीपच्या दहा वर्षे यशस्वी झालेल्या संकल्पनेचा आणि सोलो फेस्टिव्हलचा एकत्रित विस्तार म्हणजे **E Lab हा प्रकल्प, जो द बॉक्सच्या आधी,** अशाच एका औद्योगिक इमारतीत प्रदीपने साकारला होता. जो **द बॉक्स** पेक्षा खूपच छोटा होता पण कोविडमुळे बंद करावा लागला. **RESCON** या कारखान्याच्या मालक असलेल्या दोशी कुटुंबाबरोबर वर्ष २०१७ मध्ये प्रदीपच्या प्रथम भेट घेतली होती त्यावेळी याच **E Lab Studio** चे मॉडेल त्यांच्यासमोर ठेवले होते. रंगभूमी – रंगमंच – प्रकाशयोजना अशा गोष्टींची पुसटशीही कल्पना नसलेल्या उद्योजक दोशी कुटुंबाच्या समजुतीत ही कल्पना रुजायला

आणि स्वीकारायला वेळ लागला होता. चर्चेनंतर या जागेत संकल्पित **The Box** बनवायला हरकत नाही अशी प्राथमिक संमती मिळाली आणि मग प्रकल्पाच्या अर्थकारणावर चर्चा सुरू झाली होती. वर्ष २०१९ च्या अखेरीस लेखी कागदपत्रांसाह सर्व व्यवहार पूर्ण झाले आणि आवश्यक दुरुस्तीच्या कामाची वेळापत्रके ठरली. **The Box** या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या स्थापनेचे अर्थकारण खूप मोठे आव्हान होते. सौ परीमल आणि श्री प्रमोद चौधरी या उद्योजक दांपत्याने, यासाठी मोठे अर्थसहाय्य देऊ केले. तत्पूर्वी अमेरिकेत स्थायिक मराठी माणसाची संस्था, कॅलिफोर्निया आर्टस् असोसिएशन अर्थात **कला** या संस्थेनेही प्रदीपला प्राथमिक आर्थिक मदत केली आणि फेब्रुवारी २०२० मध्ये अंतर्गत बदलांची कामे सुरू झाली आणि दुर्दैवाने मार्च महिन्यात कोरोना महामारीचे संकट कोसळले आणि सर्व काम थांबले.







**^ The Box** आतील रंगमंच

**^** प्रेक्षागृह








**^** तिकीट बारी

**^** ग्रीन रूम

अशा या नैसर्गिक आणि अनैसर्गिक सगळ्या अडचणीतून मार्ग काढत, १७ ऑगस्ट २०२० यादिवशी प्रदीप आणि रुपालीने एका कवितेच्या चित्रिकरणाने या प्रकल्पाचे अनौपचारिक उद्घाटन केले. बाकीची कामे पूर्ण करून सप्टेंबर २०२० पासून **The Box** हे नाट्यगृह भाड्याने उपलब्ध झाले. आठवड्यातील शुक्रवार - शनिवार - रविवार तीन दिवस पूर्ण नाटकासाठी आरक्षित करता येतात. एकाच दिवशी पांच प्रयोग सुद्धा लावत येतात अशी या रंगअवकाशाची संकल्पना प्रत्यक्षात राबवली जाते आहे. अन्य दिवशीही नाटके होतातच. प्रयोगात प्रकाशयोजनेसाठी सत्तर लाइट्स तंत्रज्ञासह विनामूल्य उपलब्ध आहेत. ५०० **kw** हायटेन्शन लाईनचा वीज पुरवठा असल्यामुळे अतिरिक्त प्रकाशयोजनेसाठी बाहेरून जेनसेट व्हॅन आणावी लागत नाही. खर्च बचतीचे असे अनेक फायदे, भारतातील रंगकर्मींना **The Box** मध्ये उपलब्ध झाले आहेत. वरिष्ठ रंगकर्मी श्री पुरुषोत्तम बेर्डे यांचा **पुरूक्रमा** हा संवाद – श्री अतुलकुमार दिग्दर्शित – अभिनीत **An Oak Tree** - श्री विराजस कुलकर्णी दिग्दर्शित **ANATHEMA**, श्री मोहित टाकळकर दिग्दर्शित **कलर ऑफ लॉस**, प्रसाद वनारसे दिग्दर्शित **फॉल अगेन फ्लाय बेटर** आणि **डार्विन** असे समांतर रंगभूमीवरील प्रयोग अगदी अलीकडे इथे सादर झाले आहेत.



< श्री पुरूषोत्तम बेर्डे




**^** शिल्पकला महोत्सव



**^** चित्रकला महोत्सव

भारतातील अनेक नाट्यगृहांमध्ये नाटक सादर करण्याची संधि, तंत्रकुशल प्रदीपला त्याच्या कार्यकाळात मिळाली होती. याच अनुभवातून, नाटक सादरीकरणाच्या बदलत्या आधुनिक तंत्राच्या गरजेनुसार आणि अर्थातच नाटकाच्या सादरीकरणाच्या सभागृहातील मूलभूत गरजांचा विचार करून या **The Box** ची निर्मिती व्यवसायिक **(Professional)** तंत्राच्या विचारांनी झाली आहे. मात्र हे सभागृह निव्वळ नाटकाच्या प्रयोगापुरते मर्यादित नाही. संगीत - नृत्य – नाट्य अशा सादरीकरणाच्या आणि चित्रकला – शिल्पकला अशा ललित कलांचे कार्यक्रम यासह जाहिराती – सिनेमा – मालिकांच्या चित्रीकरणासाठी सर्व सोयी **The Box** मध्ये उपलब्ध आहेत, गेल्या सहा महिन्यात नाटकांसह सर्वच कार्यक्रम यशस्वी झाले आहेत. शास्त्रीय संगीतातील अकरा तरुण गायक - वादक कलाकारांचा, आशिष शेलार निर्मित ३० / ३१ जानेवारीचा सलग सत्तावीस तास ऊर्जा संगीत महोत्सव – पांच मॉडेल सह चित्रकला महोत्सव – शिल्पकला महोत्सव या सर्व संकल्पना, प्रत्येक महिन्याला एक दिवस म्यूझिक आणि डान्स जॅमिंगसाठी वाहिलेला या सर्व पहिल्या सहा महिन्यातच यशस्वी झाल्या आहेत. यातील अनेक कार्यक्रम **online live streaming** च्या द्वारे **OTT** वर जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचले आहेत.




^ ऊर्जा महोत्सवातील अकरा तरुण कलाकार.



^ **The Box** प्रवेशद्वार



**^** श्रीमती विद्या आणि श्री दीपक करंजीकर यांच्यासह श्री प्रदीप वैद्य

आपल्या **The Box** चे **Branding** आणि त्याचा **Organic reach** या तंत्रात, वरील दोन पारलेकरांसह दिसणारा आमचा पारलेकर मित्र श्री प्रदीप वैद्य वाकबगार आहे. **The Box** च्या **façade साठी असलेल्या** रंगीत **corner समोर selfie point** वरचे, भेटीला येणाऱ्या स्नेही - सहृदांसह त्याचे फोटो, त्याचे **ब्रॅंड आयडेंटिटी** झाले आहेत. नाटक या विषयातील **happening place** म्हणजे नक्कीच पुणे शहर. अशा शहरात, कुठलीही संस्था पाठीशी नसताना एकहाती या प्रकल्पाची निर्मिती लक्षणीय आहे म्हणून नोंद घेण्यासारखी आहे. पत्नी रूपाली भावेसह श्री प्रदीप वैद्य, बारा वर्षे एक संकल्पनेचा पाठलाग करून ती वास्तवात सादर करणाऱ्या तुम्हा दोघांचा आम्हाला अभिमान आहे...! शुभास्ते पंथानः ...!






--○○--

**आता मी पारल्यात रहात नाही. लेख क्र ५**

नाना विद्या कळा सिद्धी। नाना निश्चयाची बुद्धी।
जे सूक्ष्म वस्तूची शुद्धी । ज्ञेप्तीमात्र ॥ २१ ॥
दासबोध – दशक एक - समास तिसरा – शारदास्तवन

# नाना विद्या कळा सिद्धी ।

वर्ष १९६७ मध्ये, इयत्ता आठवित होती, त्यावेळी ती होती फक्त १३ / १४ वर्षांची. अनेक वक्तृत्व स्पर्धांमध्ये शाळेतर्फे सहभागी होत होती आणि पारितोषिके मिळवत होती. मुख्य म्हणजे ती त्यावेळी शाळेतील हुशार मुलांच्या तुकडीत होती. मात्र नवव्या इयत्तेत जाताना परीक्षेत गुण कमी मिळाल्यामुळे तिची ही तुकडी हुकली होती. काही विषयात गुण कमी मिळाले होते त्यांचे कारण मात्र फारच अनोखे होते. विलेपारल्यातील हनुमान मार्गावरच्या पितळे वाडीत, त्याच्या शेजारच्या वसंतराव कुलकर्णींच्या इमारतीच्या आवारात, हनुमान रस्त्यावरच्या गल्लीतील ओकांच्या रावजी निवास या बंगल्याच्या आवारात आणि पार्लेश्वर सोसायटीच्या गच्चीवर, त्यावेळी आठव्या ईयत्तेत असलेली आपली नायिका, **राष्ट्र सेविका समितीतर्फे** मुलींसाठी शाखा आणि वर्ग घेत होती. लेखाच्या शीर्षस्थानी लिहिलेल्या दासबोधातील समर्थांच्या **नाना विद्या कळा सिद्धी** या शब्दांची अनुभूति, तिला आणि पारलेकरांना तेंव्हाच झाली होती. समाजसेवेचा हा समृद्ध वारसा, तिला आई + वडील आणि सर्व कुटुंबांकडून मिळाला होता. प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्य दिन अशा राष्ट्रीय सणांच्या दिवशी शाळेतील तिचे वक्तृत्व कौशल्य सर्वपरिचित होते.



< कु विद्या महाजन

वर्ष १९७० मध्ये ती शालांत परीक्षा (तत्कालीन अकरावी) उत्तीर्ण झाली आणि पारले महाविद्यालयात विज्ञान शाखेत तिने प्रवेश घेतला. पुढील वर्षांतच आपली अभ्यासाची चुकलेली वाट लक्षात आली आणि

कला शाखेत तिने प्रवेश घेतला होता. वर्ष १९७४ मध्ये मराठी आणि सायकॉलॉजी या विषयात **BA** साठी तिने रुपारेल महाविद्यालयात प्रवेश घेतला. महाविद्यालयाच्या विद्यार्थी मासिकाची ती संपादक झाली. वर्ष १९७५ मध्ये तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी आणीबाणी जाहीर केली आणि भारतीय लोकशाहीने प्रथमच वेगळा अनुभव घेतला होता. आपल्या नायिकेच्या शालेय जीवनातील, कुमार वयातील धाडसी नेतृत्व गुणांचा अनुभव पहाता, तरुण वयात महाविद्यालयीन जीवनात निश्चितपणे ती या आणीबाणीच्या विरोधात खंबीरपणे उभी राहिली. रुपारेल महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह आणीबाणी विरोधात केलेल्या निदर्शनासाठी, मोरीरोड पोलिस स्टेशन आणि आर्थर रोड तुरुंगात तिला १५ दिवस तुरुंगवास घडला होता. आर्थर रोड तुरुंगात सत्याग्रह केला आणि तिथेही शाखाही घेतली होती.

**नाना निश्चयाची बुद्धी ।**

रुपारेल महाविद्यालयातून **BA** ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर लगेचच तिचे लग्न ठरले आणि त्याच वेळी **विवेकानंदांचा स्त्री विषयक दृष्टिकोन** हा तिचा पहिला लेख साप्ताहिक लोकप्रभा मध्ये प्रकाशित झाला होता. हा लेख म्हणजे नंतरच्या काळांतील तिच्या स्त्री केंद्रित संशोधन आणि अभ्यासाची झालेली ही सुरुवात होती. लगेचच विवाह झाला आणि ती आपल्या सासरी हैदराबादला आली. **MA** च्या अभ्यासासाठी तिने मुंबईत विद्यापीठातच प्रवेश घेतला होता. तिच्या पहिल्या मुलीचा जन्म ही मातृत्वाची परीक्षा आणि **MA** ची दुसऱ्या वर्षांची परीक्षा तिने एकदमच दिल्या होत्या. मात्र त्या परीक्षेत तिला अपेक्षित गुण मिळाले नाहीत. प्रगतीचे – अभ्यासाचे – संशोधनाचे तिचे **नाना निश्चय** झालेच होते. वयाच्या २६ व्या वर्षी **M Phil** च्या अभ्यासासाठी तिने हैदराबादच्या ओसमानीया विद्यापीठात प्रवेश घेतला होता. नामवंत लेखक श्री **श्री ना पेंडसे यांच्या कादंबऱ्यातील सामाजिक प्रवृत्ती** या विषयात **M Phil** च्या परीक्षेत ती प्रथम पुरस्काराची मानकरी झाली होती. आता **Ph D** ची तयारी सुरू झाली होती मात्र त्याला आवश्यक ती **MA** च्या परीक्षेतील पात्रता नव्हती पण जिद्द बुलंद होती. आता **MA** च्या अभ्यासासाठी पुन्हा प्रवेश घेतला आणि दुसऱ्या **MA** चा अभ्यास दुसऱ्या मुलीच्या जन्माच्या वेळीच पूर्ण झाला, त्या परीक्षेत ७३ टक्के गुण मिळाले आणि **Ph D** ची

तयारी झाली होती. वर्ष १९८७ मध्ये **स्त्रीयांच्या कादंबऱ्यातील समाजप्रवृत्ती** या विषयात **Ph D** प्राप्त झाली होती. यासाठी तिला ओसमानीया विद्यापीठाच्या डॉ रा ब माढेकर सुवर्ण पदकाने सन्मानित केले गेले होते. वर्ष २००४ ते २००९ या पांच वर्षांसाठी तिला मिळालेल्या **UGC** ची संशोधन शिष्यवृत्ती अंतर्गत, **कृष्णामृतनट** या प्राचीन हस्तलिखिताचे संशोधन आणि संपादन केले होते. वर्ष १९८४ ते २०११ या काळांत ती, ओसमानीया विद्यापीठात मराठीची अर्धवेळ प्राध्यापिका म्हणून कार्यरत होती.

आपल्या नायिकेचा नेमका परिचय **आता मी पारल्यात रहात नाही** या लेखमालेतील लेखात करून देताना तिच्या विस्तृत शैक्षणिक पार्श्वभूमीचा परिचय करून देणे नक्कीच महत्वाचे आहे. यांचे कारण, डॉ विद्याची अर्थात पूर्वाश्रमीची विद्या महाजन आणि आत्ताची डॉ विद्या देवधर हिची शैक्षणिक कारकीर्द आणि नंतरच्या काळातील तिने निर्माण केलेले काम चित्तवेधक आणि मराठी वाचकाला आणि भाषेला अभिमानास्पद आहे.



< डॉ विद्या देवधर

डॉ विद्याची आई श्रीमती सुशीलाताई महाजन आणि वडील श्री मधुकरराव महाजन हे सर्वार्थाने तिचे प्रेरणास्थान आणि मार्गदर्शक आहेत. आज ब्याण्णव वर्षांच्या सुशीलाताई, वर्ष १९६४ मध्ये पारले टिळक विद्यालयात शिक्षिका म्हणून रुजू झाल्या होत्या. वडील श्री मधुकरराव महाजन हे त्यांच्या वयाच्या तीशीतच, **भारतीय जनसंघाचे मुंबई इलाख्याचे**

**पहिले संघटनमंत्री** नियुक्त झाले होते. गोवा मुक्ती संग्रामातही त्यांचा महत्वाचा सहभाग होता. **संयुक्त महाराष्ट्र समितीच्या** सर्वपक्षीय समितीच्या सेक्रेटरीपदाची जबाबदारी मधुकररावांना दिली गेली होती. मुख्य म्हणजे ११ मे १९५३ या दिवशी **डॉ शामाप्रसाद मुखर्जी यांच्या काश्मीर खोऱ्यातील लखनपूर प्रवेशाच्या वेळी, श्री मधुकरराव महाजन त्यांचे एक सहकारी होते.** मधुकरराव एक उद्योजक होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्कार आणि कारकीर्दीतील सर्व साहित्य निर्मिती हा माझ्या आई + वडिलांचा वारसा आहे यांचा कृतज्ञवृत्तीने डॉ विद्या नेहेमीच उल्लेख करते.



^ माननीय सुशीलाताई आणि श्री मधुकरराव महाजन

मराठी साहित्यातील आणि अन्य क्षेत्रातील डॉ विद्याच्या निर्मितीतील वैविध्याचा परिचय विस्ताराने करून देणे आवश्यक आहे. लग्नानंतर वर्ष १९७६ मध्ये ती तिच्या सासरी हैदराबादला गेली होती. त्याकाळांत हैदराबाद हे आंध्रप्रदेशातील मुख्य शहर होते. मात्र या शहरावर आधीच्या निजामाच्या राजवटीच्या काळाचा खूप प्रभाव होता. मुंबई आणि विशेषतः विलेपारल्यातल्या मोकळ्या वातावरणात आणि प्रगत विचारांच्या कुटुंबात वाढलेल्या विद्याला तो फरक स्पष्ट जाणवत होता. तिथल्या मराठी समाजाचा परिचय करून घेण्यासाठी प्रथम तिने शहरातील महाराष्ट्र मंडळ – सखी मंडळ अशा मराठी नागरिकांच्या संस्थांचे आणि साहित्यविषयक काम करणाऱ्या मराठी साहित्य परिषद, तेलंगण, राज्य मराठी विकास संस्था,

रोटरी क्लब अशा संस्थांचे सदस्यत्व घेतले, त्या कामात सक्रिय सहभागी झाली. **सुसंघटित** म्हणजे **Organized** असणे आणि परिसरातील समाजाभिमुख असणे हा राष्ट्र सेविका समितीच्या शिस्तीत वाढलेल्या प्रत्येक स्त्रीचा मूलभूत स्वभावधर्म विकसित होतो. विद्याला हेच बाळकडू मिळाले होते, तिच्या दैनंदिन जीवनशैलीचा तो अविभाज्य भाग होता. याबरोबरच हैदराबाद शहरातील राष्ट्र सेविका समितिच्या कामातही ती सक्रिय सहभागी झाली.

**जे सूक्ष्म वस्तूची शुद्धी ।**

डॉ विद्याचे साहित्य संपादन काम फार मोठे आहे. त्याआधी तिच्या सहा पुस्तकांचा परिचय वाचकांना करून देणे आवश्यक आहे. तिचे पहिले समीक्षेचे पुस्तक **स्त्री लिखित कादंबरी – प्रेरणा व प्रवृत्ती.** या पुस्तकात स्त्रीयांनी लिहिलेल्या कादंबऱ्यातील मंडणीची विस्ताराने समीक्षा केली आहे. दुसरे अनुवादित पुस्तक **विश्वव्यापी**. यात ख्रिस्तपूर्व काळांतील भारतीयांच्या विदेशयात्रांचे वर्णन केले आहे. तिसरे पुस्तक **तेजतपस्विनी.** राष्ट्र सेविका समितीच्या संस्थापिका लक्ष्मीबाई केळकर अर्थात वंदनीय मावशी याच्या जीवनकार्यावर निर्माण झालेल्या चित्रपटाची ही पटकथा आहे. चवथे पुस्तक **आनंदाचे आवारू -- श्रीमद्भागवत – कथा, काव्य, तत्वज्ञान.** पाचवे पुस्तक **आनंदाचे आवारू – श्रीमद्भागवतकथा**. विद्याच्या वडिलांनी या मूळ संस्कृत संहितेचा पूर्ण अभ्यास केला होता त्याचे मराठी भाषांतराचे प्राथमिक काम पूर्ण केले होते. श्रीमद्भागवत – कथा , काव्य, तत्वज्ञान या पहिल्या पुस्तकात त्यातील कथा – काव्य –तत्वज्ञान या प्रत्येक भागातील संदर्भ वेगळे लिहिले गेले. श्रीमद्भागवतकथा या दुसऱ्या पुस्तकात कथा विभागातील अडीचशे कथांपैकी, निवडक शंभर कथांचा समावेश केला गेला आहे.

**वर्ष २०१६ ते २०१८ या दरम्यान** डॉ विद्याला मिळालेल्या **लोकसभा रिसर्च फेलोशिप** या अंतर्गत **कानून निर्माणमे महिलांओंका योगदान** हे हिंदी भाषेतील तिचे सहावे आणि सर्वात महत्वाचे पुस्तक आहे. प्राचीन आणि आधुनिक भारतातील शासनकर्त्या महिलांचा आणि त्यांच्या शासनकाळातील त्यांनी निर्माण केलेल्या कायद्यांचा, संशोधनावर आधारित अभ्यास आहे. भारतीय लोकसभेच्या सभागृहात या पुस्तकाचे प्रकाशन झाले होते.

मराठी आणि अमराठी वाचकांनी या महत्वाच्या पुस्तकाचे स्वागत कसे केले आहे त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.



^ पाच पिढ्या डॉ विद्या आजी, आई, मुलगी आणि नातवासह



^ तीन पिढ्या डॉ विद्या, आई आणि दोन मुलींसह



< जीवनसाथी श्री अजित देवधर यांच्यासह डॉ विद्या

डॉ विद्याच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पदर उलगडणे कोणालाही अगदी सहज शक्य असते इतकी ती पारदर्शक आहे. एका कर्तृत्वसंपन्न आईची तितकीच कर्तृत्वसंपन्न मुलगी आहे. धाकट्या बहिणीची आदर्श आहे. एक लोकप्रिय शिक्षिका आहे. एक यशस्वी गृहिणी आहे. आपल्या मुलींची चतुर अनुभवी मार्गदर्शक आहे आणि नातवंडांची प्रेमळ आजी आहे. अनेकदा तिच्याबरोबरच्या प्रत्यक्ष संवादात, तिच्या सौम्य स्वभावाचा – मृदूतेचा –ऋजुतेचा अनुभव आपल्याला नक्की येतो. मात्र याच निर्व्याज – निरपेक्ष वृत्तीमध्ये एक करारी – चतुर व्यवहारी - अनुभव संपन्न - धीर-गंभीर अशा डॉ विद्याचा परिचय सुद्धा आपल्याला होतो. वयाच्या साठीनंतर तिला प्राप्त झालेली तिची निसर्गदत्त रजतधवल केशभूषा, तिचे व्यक्तिमत्व उजळून टाकते. या गुणश्रेष्ठ विदूषीने, आपल्या अविरत संशोधनाने, भारतीय स्त्रीच्या प्राचीन – अर्वाचीन आणि आधुनिक इतिहासातील कर्तुत्ववान स्त्रीयांचा विविध लिखाणातून मांडलेला परिचय, येणाऱ्या पुढील पिढ्यातील स्त्री आणि पुरुषांना मार्गदर्शक रहाणार आहे हे निश्चित. राज्य मराठी विकास संस्थेवर सदस्य म्हणून महाराष्ट्र शासनाने तिची नियुक्ती केली आहे.

राष्ट्र सेविका समितीच्या संस्थापिका लक्ष्मीबाई केळकर यांच्यावरील चरित्रपटाच्या पटकथेबरोबरच डॉ विद्याने अन्य तीन माहितीपटांच्या पटकथा लिहिल्या. **शताब्दी सुमानांजली** हा विविध क्षेत्रातील महिला कार्यकर्त्यांशी केलेल्या संवादावरील माहितीपट. **समर्था सुशीला** हा आपल्या आईच्या जीवनकार्याचा परिचय करून देणारा माहितीपट. **स्मृतिका** हा तिसरा माहितीपट. या माहितीपटांच्या लेखन आणि निर्मितीमागे काही अनुभवाची पार्श्वभूमी आहे. हैदराबादमधील रामोजी सिटी या मोठ्या स्टुडिओच्या श्री रामोजी राव यांच्या तत्कालीन **E TV** या चॅनलच्या मराठी कार्यक्रमांची संहिता लिहीण्याचे काम डॉ विद्या चार वर्षे करत होती.



^ माजी लोकसभा अध्यक्ष माननीय श्रीमती सुमित्राताई महाजन यांच्या हस्ते **कानून निर्माणमे महिलांओंका योगदान** या हिंदी पुस्तकाचे प्रकाशन.

डॉ विद्याचे संशोधन आणि अभ्यास दीर्घकाळ, विविध माध्यमातून वाचक आणि श्रोत्यांपर्यंत पोहोचले आहे. **स्त्रीलिखित कादंबरी साहित्याचा मागोवा** हे शोधनिबंध दोन खंडात प्रकाशित झाले आहेत. याच शोधनिबंधांवर आधारित **८५ चर्चासत्रात** ती सहभागी झाली आहे. सामाजिक – सांस्कृतिक – संतसाहित्य अशा विषयांवर **२५० भाषणे आणि व्याख्याने** तिने दिली आहेत. **अखिल भारतीय साहित्य संमेलन** आणि **विश्व मराठी साहित्य संमेलनात** तिची भाषणे सादर झाली आहेत. आगरकरांच्या शब्दांत आगरकर – मालतीबाई बेडेकर – मराठी कवितेतील स्त्री दर्शन – १८५७ च्या रणरागिणी अशा विषयांवर कार्यक्रम सादर झाले आहेत. १८५७ चा तेजस्वी इतिहास या कार्यक्रमाचे संहिता लेखन डॉ विद्याने केले आहे.

डॉ विद्याच्या वर उल्लेख केलेल्या साहित्य विषयक संशोधन आणि अभ्यासाचा परिचय खूप दीर्घ आहे आणि प्रभावशाली आहे. याशिवाय, डॉ विद्याचे साहित्य संपादन काम यापेक्षा फार मोठे आहे आणि विस्ताराने वाचकाना परिचित होणे आवश्यक आहे. **भारतीय**

**स्त्रीलिखित साहित्य** या विषयांत उर्दू – तेलगू – तमिळ – मल्याळम या भाषांच्या विशेष अभ्यासासह एकूण वीस भाषांतील शोध निबंधांचा अभ्यास हे अनोखे काम महत्वाचे आहे. गेली पस्तीस वर्षे नियमित प्रकाशित होणाऱ्या **पंचधारा** या त्रैमासिकांच्या संपादक मंडळाची ती सदस्य आहे. **संवादू** या द्वैमासिकाची संस्थापक आणि गेली ९ वर्ष संपादक आहे. डॉ ना गो नांदापुरकर या मराठवाडा - विदर्भातील मान्यवर लेखकाच्या समग्र साहित्याचे प्रत्येकी पंधराशे पानांचे दोन खंड संपादनाच्या दीर्घकाळ चाललेल्या यशस्वी कार्यात डॉ विद्या सहसंपादक म्हणून सहभागी होती. सर्वात महत्वाचे म्हणजे सेतुमाधवराव पगडी या विद्वान इतिहास संशोधकाच्या बारा हजार पानांच्या आठ खंडात प्रकाशित झालेल्या समग्र साहित्याची डॉ विद्या सहसंपादक आहे. ही सर्वच कामे पर्वताएवढी मोठी आहेत. लग्न झाल्यानंतर हैदराबादला आपल्या सासरी गेलेल्या डॉ विद्याने, आपल्या या सर्वच सातत्यपूर्ण आणि नियमित कामाने, या सर्व संस्था – संघटना आणि या शहराच्या किर्तीत फार मोलाची भर घातली आहे.

**झेप्तीमात्र ।**

२५ नोव्हेम्बर १९८९ रोजी, डॉ विद्याचे वडील मधुकरराव महाजन यांचे निधन झाले. त्याच्या प्रथम स्मृतिदिनी १९९० रोजी, भारतरत्न माननीय श्री नानाजी देशमुख यांच्या उपस्थितीत महाजन कुटुंबीयांनी मधुकरराव महाजन स्मृती पुरस्कार योजना जाहीर केली. **साहित्य, समाजकार्य** आणि **व्यवसाय** या तिन्ही क्षेत्रात मधुकररावांनी कार्य केले आहे. हे लक्षात घेऊन दरवर्षी अनुक्रमे **समाजकार्य - लेखन संशोधन** आणि **तरुण व्यवसायिक** याना पुरस्कार देण्याचे ठरवले. महाजनांना स्त्री शक्तीची जाणीव होतीच पण स्त्रीसामर्थ्यावर त्यांचा विश्वास होता असे नानाजींनीच पहिल्या सभेत सांगितले होते म्हणून तीन वर्षांनंतर या तीनपैकी कोणत्याही क्षेत्रातील महिलेला चौथ्या वर्षीचा पुरस्कार राखीव ठेवला गेला आहे. गेली तीस वर्षे हा मधुकरराव महाजन वार्षिक पुरस्कार दिला जातो आहे.

**मराठी भाषेच्या संवर्धनकार्यासाठी महाराष्ट्र सरकारतर्फे दिला जाणारा कविवर्य मंगेश पाडगावकर – मराठी भाषा संवर्धन पुरस्कार, हा वर्ष २०२० मधील रुपये दोन लाख रकमेचा पुरस्कार** यावर्षी मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य या संस्थेला देण्यात

आला आहे. डॉ विद्या या संस्थेची विद्यमान अध्यक्ष आहे. महाराष्ट्राबाहेरील राज्यात **मराठी भाषेच्या संवर्धनकार्यासाठी होत असलेले या संस्थेचे हे सातत्यापूर्ण कार्य, मराठी नागरिकांसाठी निश्चितच अभिमानाचे आहे.**

**स्त्रीजीवन** विषयक असंख्य पैलूंचा अभ्यास या डॉ विद्याच्या ज्ञान उपासनेचे कार्य अखंडित सुरू आहे. संघमित्रा सेवा प्रतिष्ठान, नागपूर यांच्यातर्फे **अखिल भारतीय महिला चरित्र कोशाचे** संकलन आणि संपादनाचे काम प्रगत होत आहे. साहित्यप्रेमी भगिनीमंडळ, पुणे यांच्यातर्फे **संपूर्ण भारतातील विचारवंत व समाजसुधारक यांचे स्त्रीजीवन विकासासंबंधित विचार व कार्य असे दोन संशोधन प्रकल्प तिच्या मार्गदर्शनाखाली प्रगत होत आहेत.**



< डॉ विद्या देवधर

लेखाच्या शीर्षस्थानी, समर्थ रामदासांच्या दासबोधातील पहिल्या दशकातील – तिसऱ्या समासातील शारदास्तवनातील एकविसाव्या श्लोकाचा संदर्भ घेतला आहे. या श्लोकात महामाया देवी शारदेसंदर्भात व्यक्त झालेल्या समर्थांच्या स्फटिकासमान विश्लेषक विवेचनाशी, डॉ विद्याच्या शालेय काळापासून सुरू झालेल्या जीवनशैलीचे आणि शब्दकळेचे स्पष्ट साधर्म्य आहे. समर्थांच्या या श्लोकातील चवथ्या चरणातील **ज्ञेप्तीमात्र** मधील **ज्ञ** हा धातू, **जाणणे** अथवा **ज्ञानाची जाणीव होणे** या अर्थी आहे. परमात्म्याचे म्हणजे ब्रह्माचे स्वरूप सर्व मानवी कल्पनांच्या पलीकडे आहे. मात्र देवी शारदेमुळे परमात्म्याला स्वतःचे भान येते आणि त्याला नाव देता येते--कारण ही शारदा चारही वाणींची स्वामींनी आहे, **तिच्यामुळेच**

**शब्दाच्या सहाय्याने कोणत्याही गोष्टीचे ज्ञान होते**. पदार्थमात्राच्या, प्रत्येक वस्तूच्या अंतरंगात असलेल शुद्ध मूलतत्व जाणणारी ही साक्षात मुळमाया देवी शारदा, डॉ विद्याला नक्की प्रसन्न झाली आहे.

पारले टिळक विद्यालय ही माझी शाळा -- तिथली समृद्ध शिक्षणपद्धती – लोकमान्य सेवा संघ, पारले ही संस्था आणि ग्रंथालयांतील पुस्तकांची उपलब्धता आणि तिथे जोपासलेली वाचन संस्कृति -- सतत जागृत राहिलेले सामाजीक – सांस्कृतिक भान यामुळे विलेपारले उपनगरातील प्रत्येक कुटुंबाची वृत्ती सजग, समाजाभिमुख, प्रगतिशील आहे म्हणूनच इथले समाजजीवन समृद्ध आणि समाजमन जागृत आहे. याच विलेपारल्याच्या जीवनशैलीचा मोठा प्रभाव माझ्यावर आहे आणि त्यासाठी या दोन संस्थांची मी कायम ऋणी आहे, यांचा उल्लेख डॉ विद्या नेहेमीच कृतज्ञतेने करते.

डॉ विद्याच्या अविरत ज्ञानसत्रात सहभागी होऊन त्याला सहाय्यभूत एखादे छोटेसे काम करणे अथवा तिला आपल्या उपक्रमात सहभागी करून घेणे म्हणजे निखळ आनंद आणि समाधानाची अनुभूति असते. डॉ विद्याला आणि तिच्या सर्व कुटुंबीयांना, सर्व उपक्रमात निरंतर यश आणि समाधान प्राप्त होवो आणि सुहृदांची स्नेहवृद्धी होवो ही देवी शारदेचरणी प्रार्थना..!

--○○--

**आता मी पारल्यात रहात नाही. लेख क्र ६**

# चिंता करतो विश्वाची

विलेपारल्यातल्या तेजपाल स्कीम पहिल्या गल्लीतल्या श्री महादेव तथा बाबासाहेब गानु यांना ओळखत नाही अशी व्यक्ति निदान त्या गल्लीत तरी निश्चितच सापडली नसती. बटण फॅक्टरी पासून रविकिरण आणि जीवनसरिता सोसायटी पर्यंतची ही गल्लीच मुळी तीन चारशे फुट लांबीची आहे. हा उल्लेख साधारण चाळीस वर्षांपूर्वीचा आहे. बटण फॅक्टरीची वास्तु आता अस्तित्वात नाही आणि उल्लेख केलेल्या दोन्ही सोसायटयांच्या इमारतींचा पुनर्विकास झाला आहे. गल्लीतल्या सिद्धनिवासच्या तळमजल्यावर बाबांचे बिऱ्हाड होते. पांच-सहा फुट रुंदीच्या घराच्या पुढ्यातील अंगणात बाबांनी चार-सहा फुलझाडे लावली होती. त्यांची निगराणी ते नियमितपणे करीत असत. पांढरा बनीयन आणि पट्ट्यापट्ट्याची चड्डी घालून आठवड्यातील सुट्टीच्या दिवशी आपल्या स्कूटरला तेल – पाणी करणारे बाबा, नंतर त्या स्कूटरवर बसून गल्लीच्या दोन्ही टोकांपर्यंत स्कूटरच्या दोन फेऱ्या मारायचे. त्या स्कूटरवर त्यांचा फार जीव होता.

खरे म्हणजे **बाबा गानु** याच संबोधनाने ते सर्वांना परिचित होते. बाबा वयाच्या सतराव्या वर्षी, कळंबट या चिपळूण जवळच्या गावातले आपले घर सोडून मुंबईत आले. मुंबईत आसरा नव्हता त्याकाळांत दादरच्या टिळक ब्रिजच्या फुटपाथवर काही महीने राहिले. कालांतराने गिरगाव आणि गोरेगावला काही वर्षे राहून विलेपारल्यात स्थायिक झाले. पत्नी श्रीमती सुधाताई गानु महिला संघाच्या बालवाडीच्या पहिल्या शिक्षिका होत्या. बालवाडीला प्रगतीच्या वाटेवर नेऊन, चाळीस वर्षानी त्या निवृत्त झाल्या. गानुकाकूंबरोबर चालत पाय मोकळे करायला निघाले की बाबांच्या हातांत बऱ्याचवेळा एक छोटीशी छडी असायची. बाबांचे सर्वच काम कडक शिस्तीचे असायचे. मात्र त्या छडीचा वापर मुलांना शिस्त लावण्यासाठी कधीच झाला नाही. आपल्या मुलांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा याची नेमकी जाणीव असलेले हे सुजाण पालकत्व होते. एकंदरीतच त्यांचे व्यक्तिमत्व कोकणातल्या माणसासारखे, बाहेरून काटेरी मात्र आतून मधुर आणि रसाळ असे होते. बाबांची मोठी मुलगी नीला आणि धाकटी शुभदा, दोघी डॉक्टर झाल्या. **दोन बहीणींच्या मधला बाबांचा मुलगा आनंद, हा**

**आजच्या लेखाचा आपला नायक आहे. समर्थ रामदासांच्या शब्दातील चिंता करतो विश्वाची असा आनंद आता पारल्यात रहात नाही.**

**गर्जे मराठी ग्लोबल** ही विश्वव्यापी संघटना उभी करणाऱ्या श्री आनंद गानु यांच्या कुटुंबाचा आणि सहचारिणी सौ सुनीत यांच्यासह त्यांचा परिचय विस्ताराने करून घेणे आवश्यक आहे. यांचे कारण गानु कुटुंबाचे विलेपारल्यातील वास्तव्य आणि कुटुंबाचे संस्कार (**conditioning**) यातूनच श्री आनंद आणि सौ सुनीता यांना लोकहिताच्या या कामासाठी प्रेरणा आणि ऊर्जा मिळाली आहे. वर्ष १९७२ मध्ये तत्कालीन अकरावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर आनंदने **बी फार्म** पदवी प्राप्त केली. त्याचवेळी डोंबिवलीची सुनीता साठये त्याच अभ्यासक्रमात शिकत होती, तिची **एम फार्म** पदवी पूर्ण झाली होती. जनसंघ – भाजप – आरएसएस अशी निष्ठा असणाऱ्या डोंबिवलीतील साठये कुटुंबाचा वारसा घेऊन, चि सुनीता विलेपारल्याच्या आनंद गानुची वर्ष १९७९ मध्ये सहचारिणी झाली.



**< सौ सुनीता गानु**



**< श्री आनंद गानु**

विवाहानंतर त्याचवर्षी दोघांनी झांबीया या आफ्रिकेतील देशांत नोकरीसाठी प्रस्थान ठेवले होते. झांबीयाच्या ईस्टर्न प्रॉव्हीन्स या राज्याच्या फार्मसी सेक्शनचे, दोघेही प्रमुख होते. पूर्व आफ्रिका आणि दक्षिण आफ्रिकेतील अकरा देशांचा प्रवास, झांबीयातील पांच – सहा वर्षांच्या वास्तव्यात, आपल्या लँडरोव्हर मोटरीतून झाला होता. **LMV** ते **HMV** कुठल्याही आकाराचे वाहन असो, सौ सुनीता एक निष्णात ड्रायव्हर आहे. या बहुतांशी प्रवासात तीच मोटारीचे सारथ्य करीत असे.

कालांतराने झांबीयाहून भारतात परत आल्यावर वर्ष १९८६ मध्ये फार्मास्युटिकल उत्पादने बनवणाऱ्या दोन कारखान्यांची उभारणी या दोघांनी केली होती. पुढच्या वीस वर्षांत, १२००० हजार चौरस फुटाचा वसईमधला स्वतंत्र कारखाना, ११ केमिस्ट आणि १२५ कामगार अशी दोन्ही कारखान्यांची वेगाने प्रगती झाली होती. वर्ष २००५ मध्ये मुलगा शैलेश


आणि मुलगी गायत्री आपल्या शिक्षणानिमित्त परदेशात गेले. वर्ष २००६ मध्ये, वयाच्या पन्नाशी नंतर सौ सुनीता आणि श्री आनंद यांनी कारखाना विकण्याचा निर्णय घेतला. आफ्रिकेतील देशांचा प्रवास झाला होता तरी मायभूमी भारतातील प्रवास करणे बाकी होते. वर्ष २००७ ते वर्ष २०१२ या पांच वर्षांत भारतातील प्रवासाचे कॅलेंडर तयार झाले होते. वर्षाला एक अशा पांच रोड ट्रीप - साधारण ३० दिवस - स्वतःच्या मोटारीने किमान ५००० किलोमीटर प्रवास. प्रत्येक ट्रीपची सुरुवात अर्थातच मुंबईतूनच झाली. खारदुंगला पासच्या पलीकडे लेह-लडाख, त्रिपुरा, कन्याकुमारी, राजस्थान-मध्यप्रदेश, ओडिशा अशा भारताच्या चारी दिशांनी या दोघांचा प्रवास झाला होता.

वर्ष २०१३ आणि २०१५ या दोन वर्षांमध्ये, सौ सुनीता आणि श्री आनंद या दोघांनी इंडियन कॅन्सर सोसायटीच्या सहकार्याने, महिलांसाठी बऱ्याच कॅन्सर डिटेक्शन कॅम्पचे नियोजन केले होते. हे सर्व कॅम्प कॅन्सर सोसायटीच्या मोबाईल व्हॅन मध्ये घेतले गेले.

वर्ष २०१५ पासून, येणाऱ्या काळांत बदलत्या जीवन शैली आणि आव्हाने यांचा नेमका मागोवा घेत, फक्त पांच वर्षांच्या काळांत या दोघांनी ज्या समाजाभिमुख – लोककल्याणकारी जागतिक संघटनेची बांधणी केली, त्यासाठी या दोघांची सिद्धता **(Accomplishment)** काय होती, त्याचा नेमका परिचय व्हावा म्हणून कुटुंब पार्श्वभूमी आणि गानु दांपत्याचा विस्तारीत परिचय वाचकांना करून देणे आवश्यक होते.

वर्ष १९६८ मध्ये, टिळक मंदिरात झालेल्या उपनगर साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून, विलेपारले उपनगर आणि येथील रहिवासी नागरिकांबद्दल श्री गंगाधर गाडगीळ म्हणाले होते .. .. .. **“एक साहित्यिक या नात्याने** मला पारलेकरांच्या कार्यापेक्षा पारले या गावाच्या रहिवाशांच्या व्यक्तिमत्वाविषयी अधिक कुतूहल आणि आकर्षण आहे. या व्यक्तिमत्वाला अनेक पैलू आहेत. **टिळक निष्ठा हा पारल्याच्या व्यक्तिमत्वाचा पाया होता आणि आता ही निष्ठा जरी सहजपणे नजरेस येत नसली तरी सुप्तपणे ती पारलेकरांचे व्यक्तिमत्व घडवित असते.** साधी रहाणी, निष्कलंक चारित्र्य, ज्ञानसाधनेविषयी आदर, सतत कष्ट करण्याची तयारी, समाजहिताची दृष्टी, सडेतोड बोलणे, व्यवहार सांभाळणे इत्यादि गुणविशेषांनी युक्त असा व्यक्तिमत्वाचा आदर्श टिळकांनी महाराष्ट्रात निर्माण केला होता. **तो आदर्श गिरवणारी माणसे अजून पारल्यात आहेत. समाजाचे धुरीणत्व करीत आहेत. चेहेऱ्यावरचे भाव**

**रागीट आणि रुक्ष ठेवण्याइतकी त्यांची टिळकनिष्ठा जाज्वल्य आहे.** ललित साहित्य, नवसाहित्य, नवनाट्य पारलेकरांना पचतेही आणि रुचतेही. जे नवीन त्याचे स्वागत करायचे ही खास मुंबईची प्रवृत्ती आहे. संगीत आणि नाटक प्रेम हा महाराष्ट्राचा वारसा आहे. पण पारल्यात जी अभिजात रसिकता आढळते, तिचे श्रेय मात्र खास पारलेकरांनाच द्यायला हवे."





**^** विलेपारले अमृत स्मृति ग्रंथ – प्रकाशन वर्ष १९८६.

विलेपारले उपनगराचा, वर्ष १९०७ ते वर्ष १९८२ या पंच्याहत्तर वर्षांचा विस्ताराने लिहिलेला इतिहास आणि व्यक्ति परिचय, अशा या ग्रंथाचे प्रकाशन प्रा गंगाधर गाडगीळ याच्या हस्ते वर्ष १९८६ मध्ये झाले होते. त्यावेळी केलेल्या भाषणांत ते म्हणाले.. .." **विलेपारले हे मुंबईचे उपनगर खरे, पण त्याबरोबरच अनेक वर्षे ते एक छोटेसे गावही होते. माणसांचे संबंध घरगुती होते, रोजच्या जीवनात एक प्रकारचा स्वस्थपणा होता. जुन्या परंपरांचा पीळ बराचसा शाबूत होता. तिथल्या मराठी माणसांच्या जीवनाला थोडासा पुणेरी ढंग होता. टिळकांवरील निष्ठेने तो अधिक गडद झाला होता.**

पण त्याबरोबरच मुंबईचे अनेक गुण पारलेकरांच्या रक्तात कळत न कळत मुरले होते. मुंबईकरांची उपक्रमशीलता देखील पारलेकरांत विपुल प्रमाणात होती. त्यातल्या अनेकांनी आपले स्वतंत्र व्यवसाय सुरू केले, कारखाने उभारले, व्यापार सुरू केला आणि वाढविला. आधुनिक विद्या आणि तंत्रज्ञान त्यांनी हस्तगत केले. सर्वांनी एकत्र येऊन संस्था उभारल्या. मुंबईकरांच्या कार्यक्षमतेने आणि व्यवहार कुशलतेने संस्था चालविल्या आणि वाढवल्या. मतभेद झाले तरी परकोटीला जाऊ दिले नाहीत. जुन्याचा अभिमान बाळगला, नव्या उपयुक्त आणि हितकारक गोष्टींचा स्वीकार केला आणि जुन्या नव्याचा खास पारलेकरी पद्धतीने मेळ घातला. मुंबईला भूषणवाह वाटावे, तिच्या संपन्नतेत भर घालणारे असे पुष्कळ निर्माण केले.

प्रा गंगाधर गाडगीळ या सिद्धहस्त लेखकाने, विलेपारले उपनगर आणि तिथल्या रहिवासी नागरिकांच्या व्यक्तिमत्वाचे हे विश्लेषण. यातली अनेक व्यक्तिवैशिष्ट्ये, विलेपारले हे उपनगर आणि तिथले रहिवासी नागरिक आजही जपून आहेत. **आपल्या या लेखाच्या नायकाचा परिचय वाचल्यावर, माझे विधान आपल्याला नक्कीच पटेल याची मला खात्री आहे.**

सौ सुनीता आणि श्री आनंद या उभयतांनी वयाच्या पन्नाशीपर्यन्त, विविध अनुभव आणि आर्थिक स्थैर्‍य असलेला एक स्प्रिंग बोर्ड बनवला होता. तोपर्यंत मुलांचे शिक्षण पूर्ण होऊन, दोघांनी आपल्या परदेशातील नोकरीत कारकिर्दीची सुरुवात केली होती. कारखाने विकून व्यवसायातून दोघांनी निवृत्ती स्वीकारली होती. वयाच्या पन्नाशीपर्यन्त **Meaning of life** चा अनुभव म्हणजे दांपत्य जीवन सुरू करतांना विवाहाचे वेळी वराने वधूला दिलेल्या वाचनाची पूर्तता. अर्थात चार पुरूषार्थांचे पालन दोघांनीही केले होतेच. पुरुषार्थ दाखवतांना आपल्या प्राचीन भारतीय संस्कृतीत लिंगभेद आणि ज्ञातीभेद केला जात नाही. सौ सुनीता आणि श्री आनंद, आता नेमक्या आखणीने **Purpose of life** कडे वळले होते. आता खऱ्या अर्थाने, त्या स्प्रिंग बोर्डचा वापर करून पार्थिव जीवनातच मोक्षप्राप्तीचा वैश्विक अनुभव घेण्यासाठी दोघांची तयारी झाली होती. **Giving back to Society अगदी साधे चार शब्द....!**




< गर्जे ग्लोबल मराठी

संस्था आणि चळवळी उभ्या करणे – त्यांची व्याप्ती वाढवणे आणि त्याचा नित्य ध्यास घेणे ही  पारलेकरांची खास गुणवत्ता. वाचनाचा छंद असलेल्या प्रत्येकाचे अवकाश, रोज व्यापक होत जाते. सौ सुनीता आणि श्री आनंद या दोघांचे तसेच झाले. वर्ष २०१४ च्या सुमारास एक दिवस, डॉ दिनेश केसकर या गृहस्थाचा परिचय या दोघांच्या वाचनात आला. **बोईंग या मोठ्या आंतरराष्ट्रीय उद्योगाचे ग्लोबल व्हाईस प्रेसिडेंट आणि बोईंग इंडियाचे प्रेसिडेंट असलेल्या डॉ दिनेश केसकर** या आंतरराष्ट्रीय उद्योगाच्या इतक्या मोठ्या अधिकाराच्या स्थानावर असलेल्या यशस्वी मराठी गृहस्थाचा परिचय आपल्याला आधी कसा झाला नाही, याचे प्रथम दोघांना आश्चर्य वाटले आणि विषाद वाटला. अमरावतीतील सामान्य कुटुंबाची पार्श्वभूमी असलेला हा तरुण, आपल्या बुद्धिमत्ता – चातुर्य – निर्णयक्षमता – अथक प्रयत्न अशा निसर्गदत्त गुणवत्तेमुळे या ठिकाणी पोहोचला आहे याची दोघांना जाणीव – जागृती झाली. **आणि इथेच नेमका, एक ट्रीगर दाबला गेला होता.**

आता जगभरात वास्तव्य असलेल्या, डॉ केसकरांसारखे अन्य आंतरराष्ट्रीय व्यवसायांत यशस्वी झालेल्या मराठी महानुभावांचा शोध सुरू झाला होता. डॉ केसकरांसारखे अनेक मराठी भाषिक, आंतरराष्ट्रीय मान – सन्मान – कीर्ती यांनी अलंकृत झाले होते. मात्र परदेशात वास्तव्य असूनही त्यांची समर्पण भावना – कष्ट – मेहनत – देशप्रेम अबाधित आहे. भारतातील नागरिकांसाठी विशेषतः तरुणांसाठी काम करण्याची तळमळ आहे, हे गानु दांपत्याच्या लक्षात आले होते.  यांचा परिचय नव्या पिढीतील मराठी तरुणांना व्हायलाच हवा या भावनेतून या दोघांनी काम सुरू झाले होते. **इथे गर्जे मराठी या संकल्पनेचे बीजारोपण झाले होते.** याच उद्देशाने वर्ष २०१७ मध्ये ग्रंथाली प्रकाशनातर्फे **गर्जे मराठी** हे पुस्तक दोन भागांत प्रकाशित झाले. या दोन पुस्तकांत परदेशातील ३३ यशस्वी मराठी **NRI** नागरिकांचा परिचय करून देणारे या उभयतांनी लिहिलेले लेख आहेत. ग्रंथालीच्या पूर्ण सहकार्यामुळे पुढील काम करण्यासाठी सौ सुनीता आणि श्री आनंद यांना मोठा हुरूप मिळाला. मात्र

पुस्तकांनाही मर्यादा आहेत. किती प्रती छापायच्या याला खर्चाच्या मर्यादा आणि ते लोकांपर्यंत पोहोचायलाही  मर्यादा आहेत यांची जाणीवही दोघांना  झाली होती.

या सर्व यशस्वी **NRI** नागरिकांच्या कारकीर्दीचा परिचय करून घेतांना एक निरीक्षण या दोघांनी  नोंदवले होते.  जगभरात खूप मराठी मंडळे आहेत, ती खूपच चांगले काम करतात. त्यांचे नेटवर्किंग खूपच छान आहे.  **मात्र त्यांचे काम फक्त सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात आहे**. सौ सुनीता आणि श्री आनंदच्या विचारमंथनात यापेक्षा वेगळेच, मात्र परस्पर अवलंबून असलेले चार उद्देश स्पष्ट होत होते.  सर्वप्रथम असे  उत्तम नेटवर्क उभे करायचे. **(१) नवीन पिढीला शिक्षण (Education) आणि त्यासाठी शैक्षणिक (Academics) क्षेत्रातील नव्या वाटा दाखवायच्या. (२) शिक्षित अथवा कमी शिकलेल्या तरूणांमध्ये आणि अनुभवी अथवा अननुभवी नागरिकांमध्ये उद्योजकात विकसित करायची (Entrepreneurship Development).  (३) यासाठी सल्लागार आणि अनुभवी मदतनिसांची (Mentor) फळी उभी करायची. (४) यशस्वी उद्योजकांच्या प्रगतीचा आलेख समाजासमोर ठेवायचा, त्यांचे कौतुक करायचे, ज्यामुळे पुढे येणाऱ्या पिढीला ऊर्जा मिळणार आहे. (Celebrating Success). हे चार निश्चित उद्देश, अंतिमतः आपल्या समाजाचे ऋण फेडल्याचे (Giving back to society) एक आगळे समाधान आपल्याला देणार आहेत, हीच आपली प्राप्ती,  या धारणेने पुढची पावले पडत गेली होती.**




<

< पद्मविभूषण माननीय डॉ रघुनाथ माशेलकर

गर्जे मराठी संकल्पनेला नामवंत शास्त्रज्ञ पद्मविभूषण माननीय डॉ रघुनाथ माशेलकर यांचा वरदहस्त मिळाला आणि या दोन पुस्तकांच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमात ते सहभागी झाले. डॉ माशेलकर यांच्यासह, पद्मविभूषण

श्री विजय केळकर, पद्मविभूषण श्री अविनाश दीक्षित, पद्मश्री श्री गणपती यादव, नागपूरचे उदयराव बोधनकर अशा विद्वान आणि व्यासंगी मराठी नागरिकांनी, गर्जे मराठी संकल्पनेला पसंतीची पावती दिली आणि कामाला वेग आला. **गर्जे मराठी ग्लोबल इनकॉर्पोरेटेड या नावाने अमेरिकेत आणि गर्जे मराठी ग्लोबल फाउंडेशन या नावाने भारतात, Non Profit Making Company** स्थापन केल्या गेल्या. **गर्जे मराठी ग्लोबल** अर्थात **GMG** या उपक्रमात शिक्षण आणि उद्योजगतात महत्वाचे काम करण्यासाठी जागतिक पातळीवर संघटनेची उभरणी सुरू झाली. सारस्वत बँकेचे अध्यक्ष, **माननीय श्री गौतमजी ठाकूर** यांनी, **गर्जे मराठी ग्लोबलचे** सल्लागार आणि मेंटर होण्यासाठी केलेली विनंती स्वीकारली आहे. भारतीय सहकारी बँक क्षेत्रात, **श्री गौतमजी ठाकूर** हे एक प्रभावशाली व्यक्तिमत्व आहे.

या प्रकल्पासाठी अनेकांचे सहाय्य मिळत गेले आणि जगभरात अनेक देशांत आज या उपक्रमाचे तीस **Chapter** (गर्जे मराठीच्या छोट्या शाखा) तयार झाले आहेत. श्री आनंद यांचे नेटवर उपलब्ध असलेले निवडक इंटरव्ह्यू पाहिल्यावर, संघटनेची उभारणी आणि त्यांची या विषयातली स्पष्ट मांडणी, किती निरपेक्षवृत्तीने केली आहे त्याचा अनुभव आपल्याला घेता येतो. त्यांच्या मुलाखतीतील या विषयाची नेमकी स्पष्ट सहज मांडणी प्रत्येकाने ऐकावी अशीच आहे. यातून संकल्पनेची व्यापकता - असंख्य ऑनलाइन उपक्रमांची विस्ताराने माहिती आणि आत्तापर्यन्त उपक्रमांत सहभागी झालेल्या अनेकांचा परिचय होतो. **गर्जे मराठी ग्लोबल** या जागतिक उपक्रमाची **गतिशीलता (Dynamics)** आणि **सर्वव्यापकता (Omnipresence)** आपल्याला अचंबित करते. निरपेक्षवृत्तीने संस्थापक श्री आनंद गानु नेहेमी म्हणतात **मी निमित्तमात्र झालोय...लोकांचे सहाय्य इतके झाले की उपक्रम खूप वेगाने प्रगत झाला .. यामुळेच आज याला ग्लोबल स्वरूप आले आहे.** सध्या चाळीस नामवंत **NRI** नागरिकांनी मेंटरिंग करायला संमती दिली आहे. ध्येय – उद्देशासह मेंटर आणि मेंटीने कसे वागावे यांचे निश्चित मार्गदर्शन संचालकांनी उपलब्ध करून दिले आहे. मेंटर महिन्यातून फक्त एक तास मेंटीसाठी उपलब्ध असतो. **गर्जे मराठीचे सदस्यत्व सर्वांसाठी विनामूल्य आहे. आज जगभरातील विविध क्षेत्रातील किमान चारशे मराठी NRI या उपक्रमांत सहभागी झाले आहेत.**










गर्जे मराठी उपक्रमाचे, शिक्षण आणि उद्योजगतातील महत्वाचे काम लोकांपर्यंत पोहोचावे यासाठी **GMG Mentoring Program - GMG Saksham - GMG Agri Tech Forum - Garje Marathi Bio-Health-Pharma Tech Association - GMG Innovation Academy** असे कार्यक्रम **Online Seminar** सुरू झाले. अगदी अलीकडे, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा युनिव्हर्सिटी बरोबर **GMG Innovation Academy** चा संयुक्त प्रकल्प सुरू झाला आहे. या विद्यापीठात शिकणाऱ्या मराठवाड्यातील साडेचार लाख विद्यार्थ्यांना, **Mentoring for Early Stage Start-ups** अशा स्वरूपाचा हा प्रकल्प विनामूल्य उपलब्ध आहे. या बरोबरच औरंगाबाद मधील **Marathwada Accelerator for Growth and Incubation Council (MAGIC)** या संस्थेबरोबर आणि नांदेड मधील **Shri Guru Gobind Singhji Institute of Engineering and Technology (SGGSIET),** या शिक्षण संस्थेबरोबर, **GMG Innovation Academy and mentoring for Early Stage Start-ups** हा प्रकल्प सुरू झाला आहे. या तीन संस्थांबरोबर रीतसर **MOU (Memorandum of Understanding)** बनवले गेले आहेत. अगदी नजीकच्या काळांत **पारले टिळक विद्यालय असोसिएशन** आणि **SCEI (Symbiosis Centre for Entrepreneurship and Innovation)** या दोन शैक्षणिक संस्थांबरोबर असेच संयुक्त प्रकल्प सुरू होण्याची अपेक्षा आहे.

जर्मनीमध्ये आता **GMG Career Forum Germany** हा प्रकल्प सुरू झाला आहे. जर्मनीत शिक्षणासाठी नव्याने येणाऱ्या विद्यार्थ्यांना, देशातील संस्कृतीचा – समाजाचा -- भाषेचा योग्य परिचय करून देणे, असे कार्यक्रम यात समाविष्ट आहेत. या उपक्रमांत सहभागी झालेले, चीनमध्ये कार्यरत असलेले मराठी नागरिक, मराठी उद्योजकांना **Start up** साठी सहाय्य द्यायला उत्सुक आहेत. अंतिमतः श्री आनंद एक उल्लेख आग्रहाने करतात. या उपक्रमाचे नांव जरी **गर्जे मराठी** असले तरी प्रत्येक भारतीय विद्यार्थी आणि उद्योजकाला या उपक्रमांत


सहभागी होता येईल. इथे भाषेचे बंधन नाही. अनेक परदेशी नागरिक सुद्धा या उपक्रमांत सहाय्य देत आहेत.

खालील वेबसाईट वर गर्जे मराठी ग्लोबल यातील सर्व उपक्रमांचा परिचय नक्की होईल.

www.garjemarathi.com -
https://www.garjemarathi.com/mentor-for-you.php -
https://www.garjemarathi.com/innovation_academy.html -
https://www.garjemarathi.com/Blog/newsletter_details.php?newsletter=7 7-Seconds-are-enough- -
https://www.garjemarathi.com/Blog/newsletter_details.php?newsletter=GMG-Bio-Health-Pharma-Tech-Association -
https://www.garjemarathi.com/Blog/newsletter_details.php?newsletter=GMG-Agri-Tech-Forum -
https://www.garjemarathi.com/Blog/newsletter.php -
https://www.garjemarathi.com/registrationform.php -

खालील व्हीडिओतील मुलाखतिंमध्ये मध्ये गर्जे मराठी ग्लोबल उपक्रमाचा विस्ताराने परिचय होईल.

https://youtu.be/99TxA7sMktI -
https://www.youtube.com/watch?v=SOpGHb1i0HM -
https://youtu.be/9M7xRa9p87Q -
https://youtu.be/HRQz1AlQShU?sub_confirmation=1




< गर्जे मराठी संस्थापक श्री आनंद गानु.

**विश्वव्यापी संघटनेचे मार्गदर्शक पद्मविभूषण माननीय डॉ रघुनाथ माशेलकर यांच्यासह संस्थापक सौ सुनीता + श्री आनंद गानु आणि गर्जे मराठी उपक्रमांत सहभागी सर्व महानुभाव आणि विद्यार्थी + उद्योजकांना, पारलेकरांच्या शतशत शुभेच्छा … !**

--○○--

**आता मी पारल्यात रहात नाही. लेख क्र ७**

# साहसे श्री प्रतिवसती


विलेपारले पूर्व उपनगराच्या शतकापूर्वीच्या लोकवस्तीचा अभ्यास म्हणजे इथे स्थाईक झालेल्या नागरिकांचा अभ्यास. लोकसंख्येचाच विचार केला तर एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीला तीन हजार नागरिक इथे वस्तीला आले होते. वर्ष १९१८ मध्ये ही लोकसंख्या सात हजारांपर्यंत पोहोचली होती. वर्ष १८५० नंतर इथल्या मूळ रहिवाशांनी आपल्या जमिनी विकायला सुरुवात केली होती आणि वाढणारी लोकसंख्या स्थलांतरित नागरिकांची होती. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस इथल्या बहुतांश जमिनी, यातील धनवान स्थलांतरित नागरिकांनी विकत घेतल्या होत्या. काही सन्मान्य अपवाद वगळता, जमिनी विकत घेणारे बाहुतांश नागरिक तत्कालीन कुलाबा – रत्नागिरी – सावंतवाडी – कुडाळ – वेंगुर्ला आणि शेजारच्या गोव्यातून आले होते. याच नागरिकांनी, विलेपारल्यातील समाजाच्या खास संस्कृतीचे धागे विणले होते.

कुठलाही समाज, आपल्याला स्थिरत्व मिळावे यासाठी सतत प्रयत्न करत असतो कारण कुठल्याही क्षणी तो स्थिर नसतो. यांचे कारण, बदल अथवा परिवर्तन हा निसर्गाच्या चक्राचा नियम आहे. त्यातील प्रत्येक कुटुंब आणि कुटुंबातील प्राथमिक घटक, व्यक्ति अशा परिवर्तनाचा कारक असतो – असतात. आपल्या प्रत्येकाच्या भवतालांत घडणारे बदल कायदे – नियम – मूल्य – प्रथा – परंपरा – आचार विचार – आधुनिक तंत्रज्ञान अशा स्वरूपाचे असतात. गेल्या तीन शतकांपासून हळूहळू झालेल्या औद्योगीकरण – आधुनिकीकरण – जागतिकीकरण आणि अंतिमतः समाजमाध्यमांचा वेगवान तंत्रज्ञान विकास हे यांचे अदृश्य ट्रीगर पॉईंट्स आहेत. असे सूक्ष्म किंवा स्थूल बदल प्रथम संवेदनशील व्यक्तीला जाणवतात आणि मग ते कुटुंब पातळीवर पोहोचतात. इथेच व्यक्तीच्या वागणुकीत, समजुतीत, आकलनांत आणि अंतिमतः घेतलेल्या निर्णयात हे बदल प्रभावी ठरतात हे आपण पाहू शकतो. कालांतराने कुटुंब आणि समाज पातळीवर असे बदल दृश्यमान होतात. ते एक वेगळी दिशा घेतात.

अठराव्या शतकापासून भारताच्या चारी दिशांनी नागरिकांनी रोजी-रोटी साठी मुंबईकडे धांव घेतली होती. मात्र यांत बदल आणि परिवर्तन दृश्यमान झालेले दिसायला लागले. विसाव्या शतकाच्या अखेरच्या तीन दशकात याला उलटी दिशा मिळाली. मुंबईत आंतरराष्ट्रीय दर्जाचे उच्च शिक्षण घेतलेले तरुण, कोकणाच्या दिशेने निघाले, विशेषतः अ दर्जाची विकसित शहरे सोडून, ते उपजीविकेसाठी नव्या आव्हानांच्या शोधात निघाले. विलेपारल्यातील किमान सात – आठ तरुण - तरुणी मुंबई सोडून शेती – बागायती – पूरक व्यवसाय करण्यासाठी कोकण परिसरात आणि अन्यत्र स्थीरावले. यशस्वी झाले.

असा एक धाडसी – चतुर – यशस्वी पारलेकर, आपल्या आजच्या लेखाचा नायक आहे. काहीसा (?) उद्धट...प्रसंगी उर्मट....हाताच्या एका बोटावर वही फिरवत तो वर्गात शिरायचा..! मात्र शाळा आणि महाविद्यालयात, प्रत्यक्षात हा उद्धट आणि उर्मट वाटणारा तरुण, त्याच्या निसर्गदत्त आत्मविश्वासाचेच दर्शन देत होता. हा आत्मविश्वास कुठलाही मुखवटा नव्हता. नंतरच्या काळांत याच्या प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यावर – प्रत्येक घटनेत यांचा हा आत्मविश्वास दृश्यमान होत राहीला आहे.

पार्लेश्वर – जयहनुमान – विष्णुप्रसाद – शिवानंद – रामानंद या सर्व सहकारी सोसायट्या विलेपारल्याच्या अस्सल मध्यमवर्गीय कुटुंबांची सांस्कृतिक बेटं आहेत. यातल्याच सुभाष रोडवरच्या **रामानंदी** वातावरणात वाढलेला **ययाती बापट** शाळेत असतांना, गणित आणि फिजिक्स हे त्यांचे अत्यंत आवडीचे विषय होते. २२ व्य वर्षीच सुवर्ण पदकासह सीएची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर, एसीसी सारख्या मोठ्या कंपनीत बोलावून लठ्ठ पगाराची नोकरी मिळाल्यावर, ह्याने एका वर्षात नोकरी सोडून, स्वतंत्र प्रॅक्टिस चालू केली होती. स्वतंत्र प्रॅक्टिससुद्धा अडीच तीन वर्षे करून, सगळे क्लायंट्स आपल्या मित्रांमध्ये वाटून टाकून, हा काहीच काळांत बांधकाम व्यवसायात स्थिरावला. तो व्यवसायसुद्धा काही वर्षे करून, मग तो दापोलीला जाऊन आधी शेतकरी झाला आणि मग मँगो इन रिसॉर्टचा मालक झाला. अमर्याद जिद्द आणि मेहेनत, बेडर वृत्ती, प्रचलित व्यवस्थेशी प्रसंगानुरूप कधी झगडून तर कधी तिला वाकवून काम करून घेणे, हे सगळे यांचे गुणधर्म आणि गुणवृत्ती आहेतच.



**<** श्री ययाती बापट

**वरवर त्याच्या व्यक्तिमत्वात, एक उद्धटपणाची छटा आहे असे सर्वसामान्यांचे मत आहे.** तो जसा एकाला दिसला, तसाच सर्वांना दिसला असेल, असे मात्र मुळीच नाही. मनुष्य स्वभावाचा आणि एखाद्या व्यक्तिमत्वाच्या गुणधर्माचे वर्णन करतांना एक नेमके संबोधन आपण वापरतो... .. प्रांजळपणा. जे मनाला पटेल तेच करायचे हा खाक्या..! ही या वृत्तीची दृश्य व्यक्तता असते मात्र ती नेहेमीच निसर्गदत्त आत्मविश्वास आणि विषयाचे नेमके गणिती आकलन यांच्या हातात हात घालून येते. स्पष्ट, शुद्ध, प्रामाणिक, निष्कपट व्यवहार हेतु .. .. यातली पारदर्शकता .. .. या आणि अशाच प्रांजळपणाच्या अनेक छटांचे दर्शन मात्र खूप दुर्मिळ असते .. .. जे आपल्याला श्री ययाती बापट या असामान्य – जगावेगळी बौद्धिक प्रतिभा असलेल्या व्यवसायिकाच्या व्यक्तिमत्वात दृश्यमान होत रहाते.

ययातीच्या प्रांजळपणाच्या अन्य वेगळ्या छटा सुद्धा आपल्याला अनुभवता येतात. त्याच्याशी कधीही होणाऱ्या सामान्य संवादातून आणि व्यक्तिगत भेटीतून त्याच्या व्यक्तिमत्वातला सहज – सुवाच्य – पारदर्शक ययाती जाणवतो आणि दिसतोही. आजोबांनी शिकवलेले बुद्धिबळ – वयाची अठरा वर्षे पूर्ण होईपर्यंत थांब आणि मग स्वतःच आपले भविष्यातले निर्णय घे, असा आई – वडिलांचा प्रेरणा-ऊर्जा-आत्मविश्वास देणारा सल्ला – वडिलांनी लावलेल्या झाडाची फळे मुले चाखतात मात्र माझ्या वडिलांनी मी लावलेल्या आंब्याची फळे चाखली याचा आनंद – काही वर्षांपूर्वी आर्यावर्त कॉलनीतील बंगल्यात लावलेली आम्रपालि आंब्याची दोन कलमे, या सर्व, ययातीसाठी अभिमानाच्या आणि

भावनाशील संवेदना देणाऱ्या त्याच्या गहिऱ्या जागा आहे. त्याला आदरस्थानी असलेल्या कै श्री आण्णासाहेब साठे (विलेपारल्याच्या विजय स्टोअर्सचे मालक) यांनी अगत्याने दिलेली आणि त्यांच्या आणि कै श्री बी के खरे या दोघांच्या हस्ते लावलेली आम्रपाली आंब्याची कलमे, त्याच्या आर्यावर्त कॉलनीतील बंगल्याच्या आवारात खिडकीतून रोज दर्शन देतात. यातले एक कलम अन्य मालकाच्या बंगल्याच्या आवारात होते. त्या झाडाप्रति त्याची लागणी इतकी आहे की निव्वळ ते झाड आपल्या आवारात हवे म्हणून संधी उपलब्ध होताच त्याने तो बंगला झाडासह थोडीशी जास्त किंमत देऊन विकत घेतला. या सर्वांविषयी आणि आम्रपाली कलमांविषयी बोलताना, ऋणत्वाचे – कृतज्ञतेचे महत्व जाणणारा संवेदनशील ययाती सहज गवसतो. कॉलेजात असल्यापासून अगदी आजपर्यन्त, साधे (थोडेसे अनाकर्षक) कपडे वापरणे हे त्याचे दुसरे दृश्यमान होणारे वैशिष्टय. खास समारंभात, थोडासा गडद रंगातला लांब बाह्यांचा शर्ट आणि क्वचित त्यावर जाकिट म्हणजे मोठ्ठीच जिवाची मुंबई म्हणावे.



^ कै श्री आण्णासाहेब साठे यांनी लावलेले आम्रपाली कलम, आर्यावर्त



**^** कै श्री बी के खरे यांनी लावलेले आम्रपाली कलम, आर्यावर्त



**^** श्री ययाती बापट

**ह्या सगळयात महत्वाचं काय तर ययातीची मुत्सद्देगिरी**. समोर दिसतंय ते तसं गृहीत न धरता त्यापलीकडे नक्की काय आहे हे बघायची त्याची वृत्ती आणि दृष्टी अगदी नेमकी आहे, सकारात्मक आहे. एकमेकांना घरच्या जमिनीतला हक्क द्यायला तयार नसेलेले एका

कुटुंबातले लोक एकत्र आणून त्याची कागदपत्रे करायला, त्यांची सरकारी रजिस्ट्रार समोर नोंदणी करायची हा व्यवहार सहज सोपा नाही. यातल्या अनेक व्यक्ति नोकरी उद्योगासाठी अन्यत्र स्थाईक झालेले असतात. त्यांचे मतैक्य घडवून आणून, त्यांना गावी नेऊन १५० एकर जमिनींची कागदपत्रे नोंदणीकृत करून घेतली. सातत्य – चिकाटी – वक्तशीर नियमित पारदर्शक व्यवहार आणि आत्मविश्वास .. .. या सगळ्या गुणवत्ता इथे या व्यवहार कौशल्यात एकत्र निवास करताना दृश्यमान होतात.



^ बापट कुटुंबीय डावीकडून चि ऋत्विक – श्री ययाती – सौ उज्वला – चि ऋग्वेद.

**TRUST THE TIMING OF LIFE EVENTS. IT HAS A REASON.**

दापोली शहरातला आर्यावर्त कॉलनी हा पंचवीस एकर विस्तार असलेला, नव्वद बंगले प्लॉटचा महत्वाकांक्षी प्रकल्प, जमीन विकत घेऊन, वर्ष १९८९ – ९० मध्येच संकल्पित झाला होता. याचवेळी जवळच्या सडवली गावातील १५० एकर जमीन सुद्धा भागीदारांच्या साथीने ययातीने विकत घेतली होती. मात्र याच्या आधीच्या काळांतील काही परिस्थिति - घटनांचा संदर्भ याला नक्कीच आहे. मूळ कोकणात स्थाईक असलेल्या ययातीच्या आजोबाना, काही परिस्थितीमुळे आपली आंब्याच्या कलमांची लागवड केलेली बागायती जमीन विकून मुंबईला स्थलांतरित व्हावे लागले होते. आपल्या स्वअर्जित जमिनीवर स्वकष्टाने ज्या कलमांना पाणी घालून आपण वाढवले, त्यांना, ती जमीन विकून अंतर देणे किती

वेदनादायी असेल त्याचा अनुभव शहरी नागरिकांना नक्कीच मिळणार नाही. ययातीच्या स्मृतीत ही परिस्थिति कदाचित दुखरी जागा बनून राहिली असावी.

सीए श्री रानडे – सीए श्री बी के खरे – ए.सी.सी चे श्री जयराव – बिल्डर श्री दातार - आर्किटेक्ट श्री मधुभाऊ देशपांडे अशा सर्व महानुभावांचा खूप तरुण वयांत मिळालेला सक्रिय प्रगतिशील सहवास .. .. उत्तम शैक्षणिक प्रगती .. .. मागोमाग समोरून चालून आलेली नोकरी .. .. प्रस्थापित बांधकाम व्यवसायात भागीदारी .. .. अशा घटना वेगाने आणि नियमितपणे घडत राहिल्या होत्या. माननीय कै श्री भालचंद्र काशीनाथ तथा बी के खरे यांच्याकडे त्याने सीएची आर्टिकलशिप पूर्ण केली होती. एकेकाळी नामवंत कर विषयक सल्लागार म्हणून दबदबा असलेल्या खरेसाहेबांच्या विचारधारणेचा प्रभाव, त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकावर निश्चितच पडत असे. ययातीसुद्धा याला अपवाद नव्हता. **THINK LARGE – THINK DIFFERENT** ही खरेसाहेबांची शिकवण त्याने आत्मसात केली होती. त्यांच्या प्रोत्साहनामुळे ययातीने असेच काही निर्णय चातुर्याने घेतले, ज्यावर नंतरच्या काळातील प्रत्येक प्रकल्पाचा पाया रचला गेला होता. महत्वाचे म्हणजे वर्ष १९८९मध्ये चि ऋत्विकचा जन्म आणि मागोमाग चि ऋग्वेदचा जन्म झाला तो काळ पत्नी सौ उज्ज्वलाच्या परीक्षेचा होता. ययातीचे पूर्ण लक्ष आर्यावर्तकडे होते आणि वास्तव्य दापोलीमध्ये होते. त्याकाळात दोन्ही मुलांच्या शिक्षणासाठी सौ उज्ज्वला एकटी पारल्यात रहात होती. सहचारिणीचे असे सोबत असणे हे या दंपतीच्या यशाचे नेमके मर्म आहे.

वर्ष १९८९ मध्येच सडवली गावातल्या जमिनीवर आंबा कलमे आणि काजूची लागवड करून प्रथम एक घर बांधून घेतले होते. ययातीने विलेपारल्याहून दापोलीला मुक्काम हलवला होता. दापोली शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेला डोंगर म्हणजे आर्यावर्त कॉलनी. त्याकाळांत दापोली शहरातले मुख्य रस्तेही लाल मातीचे होते. मुंबई – पुण्यासारख्या शहरांत इमारत बांधणे फार मोठे आव्हान नसते कारण रस्ता – वीज – ड्रेनेज अशा सुविधा स्थानिक महापालिकेतर्फे उपलब्ध होतात. आर्यावर्त कॉलनीच्या डोंगरावर, बंगले बांधण्यासाठी जमिनीचे प्लॉट पाडण्याचे काम, श्री मधुभाऊ देशपांडे या नामवंत अनुभवी आर्किटेक्टकडे सोपवले होते. इथेच या प्रकल्पाचे अर्धे यश नक्की झाले होते. श्री दातारांबरोबर मुंबई – नालासोपारा – पुणे इथे अनेक इमारती बांधण्याचा अनुभव पाठीशी होता. आर्यावर्त कॉलनीच्या रस्ते – वीज पुरवठा – ड्रेनेज यंत्रणा याचे प्राथमिक काम सुरू झाले. हे मोठेच

आव्हान होते कारण पारंपरिक पद्धतीने झालेल्या या कामांत त्यावेळी एसीबी आणि ब्रेकर सारखी यंत्रे उपलब्ध नव्हती. वर्ष १९९४-९५ मध्ये, कॉलनीत लहान – मोठ्या आकाराचे साधारण नव्वद बंगले प्लॉट, विक्रीसाठी तयार झाले होते.



^ सडवली फार्म हाऊस



^ सौ उज्ज्वला बापट







^ सडवली आमराई

सुट्ट्यांमधे सहलीला येणाऱ्या मित्रमंडळींसाठी, ययातीचे सडवली मधले घर आता आवडते ठिकाण बनले होते. कोकणाशी नाळ बांधलेल्या श्री सुबोध जोशी या त्याकाळांत छोटासा टुरिझम व्यवसाय करणाऱ्या चतुर पारलेकर उद्योजकाने यातले नेमके गमक हेरले होते. वर्ष १९९८ मध्ये सहज काढलेल्या सहलीमध्ये दीडशे मित्रमंडळी सहभागी झाली होती. त्यासर्वांची रहायची सोय याच घरांत झाली होती. तोपर्यंत सडवलीच्या आमराईत दहा वर्षांपूर्वी


लावलेली आंब्याची कलमे बहरली होती. वर्ष २००२ मध्ये, श्री सुबोध जोशी याने आखलेली सडवलीची **पहिली आम्र महोत्सव सहल** अत्यंत यशस्वी झाली आणि बहुधा याच काळांत आर्यावर्त कॉलनी मधल्या बंगले प्लॉटची मागणी वाढली आणि बंगल्यांची बांधकामे सुरू झाली. आर्यावर्त संकल्पना – जमीन खरेदी पासून प्रत्यक्ष यश मिळायला मध्ये बारा – चवदा वर्षांचा काळ जावा लागला होता. आज गेल्या वीस वर्षात श्री सुबोध जोशींच्या **मँगो इन मधल्या आम्र महोत्सव सहलींचा खास ब्रॅंड बनला आहे.**






^ मँगो इन बंगले

आर्यावर्त कॉलनीतील सुरुवातीच्या काही बंगल्यांचे बांधकाम ययातीने स्वतःच केले. त्यामागोमाग बंगल्यांच्या मालकांसमोर टाईम शेअरिंग संकल्पना ठेवली. इथेही मुत्सद्देगिरीने प्रचलित पद्धतीला बाजूला ठेवत स्वतःची वेगळी संकल्पना राबवली आणि काही बंगल्यांच्या मालकांना आर्थिक फायदा निश्चितपणे मिळाला. नंतरच्या मँगो इन हॉटेल संकल्पनेची ही सुरुवात होती. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीची दहा-बारा वर्ष, २०१३ पर्यन्त आर्यावर्त मधील स्वतःच्या बंगल्यासह अन्य बंगल्यामध्ये साधारण २०-२२ बेडरूम मध्ये, होम स्टे – बेड अँड ब्रेकफास्ट या संकल्पना खूप यशस्वी झाल्या होत्या. महाराष्ट्र राज्य सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या एम टि डि सी विभागाची मान्यता या उपक्रमाला मिळलीच होती.





^ मँगो इन सूट अंतर्गत सजावट

वर्ष २०१० मध्ये चि ऋत्विक पदवीधर झाला. लहानपणापासूनच त्याचा ओढा दापोलीकडे होता. त्यावेळी आर्यावर्तच्या व्यवस्थापनाची जबाबदारी अन्य व्यवसायिकावर सोपवली होती मात्र त्यात काही अडचणी दिसत होत्या. चि ऋत्विक बापट या ययातीच्या मोठ्या मुलाने, ही जबाबदरी स्वीकारण्याची तयारी दाखवली आणि वडिलांच्या मार्गदर्शनाखाली त्याची उमेदवारी सुरू झाली. वर्ष २०१४ मध्ये ताज्या दमाच्या पुढील पिढीकडे व्यवसायाचे नेतृत्व सोपवतांना, आर्यावर्त व्यवस्थापनाचे आणि इमारतीचे नामांतर **मँगो इन** असे करण्यात आले. आणि काही काळातच या व्यवसायाने कात टाकली. दापोलीतील टुरिझम अर्थात पर्यटन व्यवसायात आता **मँगो इनचे** प्रत्येकी साडेतीनशे चौरस फुटाचे चार सूट .. डायनिंग हॉल, नव्या अंतर्गत रचनेसह सज्ज झाले.



< श्री ऋत्विक बापट -- श्री ऋग्वेद बापट >







<  मँगो इन बंगला

या चार रूम आणि अन्य आठ बांगल्यांमध्ये  आंतरराष्ट्रीय दर्जाच्या डिलक्स सोयींसह वीस बेडरूम्स, **मँगो इन** व्यवस्थेत आता एकावेळी साठ-सत्तर पर्यटकांसाठी उपलब्ध आहेत.

कोकणातील पारंपरिक खाद्य संस्कृतीतील डाळिंबी उसळ – फणसाची भाजी – थालीपीठ अशा चविष्ठ पाककृती, पर्यटक पाहुण्यांसाठी न्याहारीसह – सकाळ – दुपारच्या जेवणांत खास बनवल्या जातातच. जेवणातील पदार्थांचे वैविध्य आणि स्वाद – चवीचा दर्जा याने पाहुण्यांच्या पसंतीची दाद मिळवली आहे. आधुनिक माहिती – तंत्रज्ञान कौशल्याने – उत्तम छायाचित्र आणि द्रोन कॅमेऱ्यावर चित्रित केलेली मँगो इनची वेबसाइट, व्यवस्थेचा वास्तव आणि लौकीक दर्जा रसिकांपर्यंत प्रसारित करते आहे. कोकणाचे आकर्षण असणाऱ्या मुंबई बाहेरच्या नव्या पर्यटकांचा मिळणारा उत्तम प्रतिसाद, हा वर्ष २०१४ ते वर्ष २०२१ या सात वर्षातील चि ऋत्विकच्या व्यवस्थापन कौशल्य यशाचा पहिला टप्पा आहे. त्याला पुढे उत्तम संधी उपलब्ध होणार आहेतच. धाकटा मुलगा चि ऋग्वेद सीए झाला आहे आणि मोठ्या आस्थापनेत नोकरी करतो आहे. वडिलांच्या समृद्ध कारकीर्दीचा आणि कौतुकास्पद प्रगतीचा तणाव न घेता, दोघेही आपल्या कारकिर्दीची यशस्वी वाटचाल करत आहेत.





^ मँगो इन बंगला बेडरूम आणि स्विमिंग पूल

तैलबुद्धी आणि कुशाग्रबुद्धी अशा दोन्ही निसर्गदत्त बुद्धीमत्तांचा धनी असलेला ययाती, सीएच्या इंटर आणि फायनलला दोन्ही परीक्षांमध्ये गुणवत्ता यादीत होता. फायनलला कंपनी लॉ सारख्या कठीण विषयात सुवर्ण पदकाचा मानकरी होता. सीए झाल्यानंतर त्याला उपजीविकेसाठी साधन न बनवता, दापोलीसारख्या शहरांत शेती – बागायती आणि मुख्य म्हणजे आर्यावर्त कॉलनीचा विकासक म्हणून कीर्तिमान झाला. त्याच्या शिस्तबद्ध उद्योगनीतीने, एकविसाव्या शतकाच्या पहिल्या वीस वर्षांतच, मँगो इनच्या माध्यमातून आणि टाईम शेअरिंग संकल्पनेची मुत्सद्देगिरीने मांडणी करून दापोलीच्या पर्यटन व्यवसायांत आपली मँगो इन ही खास ब्रॅंड अथवा मुद्रा निर्माण केली. आपल्या सक्षम पुढच्या पिढीकडे व्यवसाय सोपवून वयाच्या पन्नाशीतच व्यवसायातून निवृत्ती घेतली.

आता ययाती कुटुंबासाठी आणि स्वतःसाठी वेळ देताना आपल्या छंदात रमला आहे. फळांपासून वाईन, ऑर्गेनिक कोमबुचा तयार करण्याचा हौशी घरगुती उपक्रम सुरू केला आहे. फणस – जांभूळ अशा कोकणात मुबलक प्रमाणात उपलब्ध असणाऱ्या, जवळपास १५ फळांच्या स्वाद आणि चवीने समृद्ध वाईन बनवल्या आहेत. मात्र हा त्याचा **स्वान्त सुखाय** असा घरगुती छंद आहे. याबरोबरच बेक केलेले अनेक पदार्थ बनवण्याचे कसब सरावाने आत्मसात करतांना, त्यांचे स्वतः डिझाईन केलेले सुसज्ज मॉडयूलर किचन त्याच्या दीमतीला आहे. ब्रिजचा डाव टाकणे हा त्याचा अजून एक आवडता छंद. मात्र आता खेळाडू नसल्याने त्याला ब्रिजचा डाव ऑनलाईन खेळावा लागतो. आजही ययाती नियमित अभ्यासाने कंपनी लॉ, इन्कम टॅक्स अशा गतीशील (**Dynamic**) विषयाचा सहज विस्तार करतो. मँगो कॅनिंग, किचन मॅनेजमेंट, सिमेंट काँक्रीट, इमारतींचे योग्य डिझाईन हा तर त्यांचा अनुभवसिद्ध ज्ञानसंचय आहे. यावर ययाती समरस होऊन बोलतो. वाचनाची आवड जोपासतांना इंग्लिश नाटके, फिलॉसॉफी हे त्याच्या पसंतीचे वाचन छंद आहेत.

विलेपारल्यात प्रकाशित होणाऱ्या **अभूतपूर्व पारले** या मासिकातील **आता मी पारल्यात रहात नाही** या लेखमालेतील जुलै २०२१ मधील हा सातवा लेख.



< श्री ययाती बापट

हा लेख निव्वळ श्री ययाती बापट या उद्योजकाच्या व्यक्तिमत्वाचा परिचय अथवा फक्त त्याच्या यशाचा आलेख नाही. हा, एका व्यक्तीचे **Subjective (व्यक्तिनिष्ठ),** कौतुक करणारा लेखही नाही. **Objective (वस्तुनिष्ठ)** दृष्टीने नोंदवलेली, मुंबई महानगरीतील विलेपारले या उपनगराच्या दीडशे वर्षांच्या इतिहासातील ही काही पाने आहेत. आपल्या विलेपारल्यातील चतुर – व्यवहारी पूर्वसूरींनी आधीच्या पिढीतील अनेक संदर्भाच्या अशा अनेक स्पष्ट नोंदी, विलेपारल्याच्या इतिहासाच्या स्मृतिग्रंथात करून ठेवल्या आहेत. ही लेखमाला, एकविसाव्या

शतकातील, विलेपारले उपनगराच्या संस्कृतीच्या पुढच्या प्रगतीच्या नोंदी आहेत. श्री ययाती बापट यांच्या व्यक्तिमत्वाचा आणि उद्योगनीतीचा परिचय.. .. त्यांच्या आधीच्या आणि नंतरच्या भवतालासह -- कुटुंब आणि शिक्षण – शैक्षणिक पार्श्वभूमीसह – काळानुरूप बदलणाऱ्या सामाजिक परिस्थितीसह येतो. ज्याकाळांत Start up Business हा शब्दप्रयोग प्रचारांत नव्हता, त्याकाळातल्या, श्री ययाती बापट यांनी व्यवसायनिष्ठा – चातुर्य – धाडस – सातत्य – मुत्सद्देगिरीने, स्वतः आखलेला यशाचा मार्ग, तरुण पिढीसाठी निश्चितच ऊर्जा आणि प्रेरणा देणारा आहे..!

श्री ययाती – सौ उज्वला – श्री ऋत्विक आणि श्री ऋग्वेदसह सर्व बापट कुटुंब आणि आर्यावर्त आणि मँगो इन परिवाराला शतशत शुभेच्छा..!

--○○--

**आता मी पारल्यात रहात नाही. लेख क्र ८**

# एक आधुनिक - उच्च शिक्षित शेतकरी

कोविड १९ च्या संसर्गाची दहशत पसरली होती त्याला एप्रिल २०२० मध्ये जेमतेम वीस - पंचवीस दिवस झाले होते. देशभर लॉकडाऊन जाहीर झाला होता .. .. जणू देशाचे दैनंदिन व्यवहारच थांबले असावे अशी तणावाची परिस्थिति पाहून, प्रत्येकाचा श्वास जड झाल्यासारखा झाला होता. १६ एप्रिल २०२० च्या पहाटे, **I write that .. .. मी लिहितो ते** या त्याच्या ब्लॉगवर तो भेटला. **२१ दिवसांच्या चॅलेंजच्या शेवटी** आणि **End of 21 Day Challenge** या दोन लेखांत, नेमक्या त्या तणावातल्या दिवसातल्या त्याच्या मनोभूमिकेचा त्याने दिलेला परिचय अगदी पारदर्शक होती. मूळ मराठी लेख आणि त्यांचे त्याने स्वतः केलेले इंग्लिश भाषांतर. मूळ विचार त्याने प्रथम कुठल्या भाषेत मांडले असावे आणि भाषांतर कुठले असा प्रश्न पडावा इतक्या त्याच्या दोन्ही भाषा समृद्ध आणि मांडणी चपखल. विविध विषयांना, विशेषतः कोंकणातील नेमक्या विषयांना स्पर्श करणारे त्याचे संक्षिप्त ब्लॉग वाचले की तो एक उत्तम लेखक आहे याची तुम्हाला खात्री पटेल. त्याचे बहुधा एक कारण आहे. वर्ष २००० मध्ये, दापोलीच्या कृषिमहाविद्यालयातून **M Sc Agri** ही पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर, **ॲग्रोवन** या पुण्याच्या **सकाळ दैनकात** साप्ताहिक पुरवणीसाठी, शेतकी विषयक लेख लिहिण्याची त्याला मिळालेली संधी, यामुळे आपण लिहू शकतो ही त्याला झालेली जाणीव आणि नंतरचे त्याचे यशस्वी लेखन उल्लेखनीय आहे.

विलेपारल्यातील बाहुतांश मध्यमवर्गीय मराठी युवक – युवती ज्या क्रमाने आपले शिक्षण पूर्ण करतात, अगदी त्याच पठडीत आपला आजच्या लेखाचा नायकही बारावी उत्तीर्ण झाला. मात्र बारावी नंतर सीए – इंजिनियर – डॉक्टर – बँकर या सामान्य स्वीकृत मार्गाने याचा प्रवास झाला नाही. प्रत्येक उन्हाळी सुट्टीत महिनाभर, रत्नागिरी जवळच्या गोळप या गावातील वडीलोपार्जित घरी आणि अंजनवेल या गावातील आजोळी राहिल्यामुळे, त्याला या भवतालातील निसर्ग आणि शेती विषयी आकर्षण निर्माण झाले होते. अकरावी-बारावीच्या परीक्षेत फिजिक्स आणि मॅथ्स या दोन विषयात तो फारसा रमला नव्हता. मात्र केमिस्ट्री आणि बायॉलॉजी या विषयांत पुढे अभ्यास करावा अशी उत्सुकता होती. या सर्वांचा एकत्रित विचार

करून बारावी नंतर वर्ष १९९४ मध्ये त्याने दापोलीच्या डॉ बाळासाहेब सावंत कोंकण कृषिविद्यापीठात प्रवेश घेतला. आपल्या आजच्या लेखाचा नायक आहे **श्री सचिन पटवर्धन**.






**^** श्री सचिन पटवर्धन **^** डॉ बाळासाहेब सावंत कोंकण कृषिविद्यापीठ, दापोली

वर्ष २००० मध्ये सचिन, **M Sc Agri** ही पदवी परीक्षा उत्तीर्ण झाला आणि नोकरीचा शोध सुरू झाला. सुरुवातीला पुण्याच्या **सकाळ दैनकात अॅग्रोवन** या साप्ताहिक पुरवणीसाठी, शेतकी विषयक लेख लिहिण्याची त्याला मिळालेली संधी ही त्याची पहिली पायरी होती. त्यासाठी काही काळ तो पुण्यात राहिला. वीस वर्षानंतर सचिनचे ब्लॉग आणि त्यातले विविध विषय, त्याच्या निसर्गदत्त लेखन कौशल्याची साक्ष देतात. विविध विषयांवर नियमित लेखन करणाऱ्या आपल्या आईकडून, सौ मनीषा पटवर्धन यांच्याकडून सचिनने हा लेखनाचा वसा घेतला आहे.

शेतकी पदवीधर सचिन आता नक्की काय करतो याची उत्सुकता सगळ्यानाच असेल याची मला खात्री आहे. पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पुढची आठ – दहा वर्षे नोकरी करून प्रत्यक्ष शेतकी आणि शेतकी व्यवस्थापन क्षेत्रातील अनेक अनुभव त्याने घेतले. पूर्वीच्याकाळी विविध क्षेत्रात विकास कामे करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना, शेती विकास कामांसाठी, युरोपियन युनियन – जर्मनी – अमेरिका असे विकसित देश आणि भारत सरकार असा द्वीपक्षीय सरकारी निधी उपलब्ध होत असे. नंतरच्या काळांत मोठ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय आस्थापना **CSR** प्रकल्पांना या सरकारी नियमा अंतर्गत आर्थिक मदत करत असतात. याशिवाय अझिम

प्रेमजी फाउंडेशन सारख्या संस्था, **CSR** नियमापलीकडे जाऊन, ग्रामीण शेतकी विकासाची कामे करण्यासाठी, स्वयंसेवी संस्थाना निधीचा पुरवठा करतात.

ग्रामीण शेतकी आधारित विकास प्रकल्पावर काम करणाऱ्या काही स्वयंसेवी संस्था, अशा निधीसाठी निधी पुरवठादार आस्थापनांकडे अर्ज करतात अथवा या आस्थापना काही प्रकल्पांची स्वतः निवड करतात. इथे सचिनचे काम सुरू होते. अशा ग्रामीण शेतकी विकास प्रकल्पाचा या निधी पुरवठादारांच्या वतीने अभ्यास करणे. पिकाची निवड -- जमीन उपलब्धी आणि जमिनीची योग्यता – आदिवासी क्षेत्रातील शेती – पाण्याची उपलब्धता – पूरक योग्य हवामान -- कुशल अथवा निमकुशल कामगारांची स्थानिक उपलब्धता – बियाण्याची योग्य निवड -- तयार होणाऱ्या शेतकी उत्पादनाला आवश्यक ती सहज विक्री व्यवस्था या सर्वाचा आढावा घेऊन प्राथमिक अहवाल बनविणे. चालू प्रकल्पाचा आढावा घेऊन आवश्यक तांत्रिक सूचना करणे. यासाठी आवश्यक अभ्यास करणे. असे तांत्रिक सल्ला देण्याचे काम हा सचिनच्या, फ्री लान्स कन्सलटंट अशा स्वरूपाच्या व्यवसायाचा मुख्य भाग आहे. यासाठी त्याला प्रत्येक प्रस्तावित प्रकल्पाला भेट देऊन त्याचा अभ्यास करावा लागतो. याचवेळी ज्या स्वयंसेवी संस्थांना हा निधी उपलब्ध होणार असतो त्यांचा शेतकी तंत्राचा अनुभव आणि कौशल्य – उपलब्ध निधीचे योग्य व्यवस्थापन आणि वापर, मानवी संसाधन स्थानिक उपलब्धता.. .. अशा गोष्टींचे विश्लेषण आणि नोंद प्रकल्पाच्या प्राथमिक अहवालात सचिनला करावि लागते.



^ श्री सचिन पटवर्धन

सचिनचे स्पष्ट विचार त्याच्या ब्लॉग मध्ये आपण वाचू शकतो. शेतकरी आत्महत्या का करतो...!? त्याच्या शेतीच्या अपयशाची निश्चित कारणे कोणती...!? अशी कारणे ओळखून त्यावर योग्य धोरणाने उपाय योजना करण्याची आवश्यकता, यावर सचिन अभ्यासाने आणि निरीक्षणाने टिप्पणी करतो. त्याच्या मते पारंपरिक शेतीचे उत्पादन, हवामानाच्या वार्षिक बदलाचा विचार करून होत असे. नव्या शेतकी तंत्रात नवी बियाणे आणि हवामानाचा विचार न करता केलेले व्यवस्थापन, ही अपयशाची कारणे असू शकतात. यांचे कारण पारंपरिक शेतीच्या उत्पादनाचा विचार करताना, नव्या तंत्रात एकरी जास्त उत्पादन मिळते या आशेने काही बदल केले जातात. बदललेल्या हवामानाचा धोका आणि उत्पादनाचा नाश होण्याची शक्यता  यावेळी जास्त असते.

अभ्यास आणि संशोधन वृत्तीने काम करणाऱ्या सचिनच्या व्यक्तिमत्वात, चार-सहा वेगवेगळ्या भिंगातून विषयाचे अथवा परिस्थितीचे अवलोकन-विश्लेषण करणारे वेगवेगळे सचिन तुम्हाला भेटतात. कोंकणातील फणस हा सचिनमधल्या शेतकी तज्ज्ञाचा जिव्हाळ्याचा, अभ्यासाचा आणि चिंतनाचा पहिला विषय आहे. फणसावरील सात-आठ लेखांत, तो त्याच्या ललित लेखन शैलीत, कोंकणातील पारंपरिक फणस पिकाचा तांत्रिक परिचय करून देतो. केरळ राज्य आणि व्हीएतनाम या देशातील फणसांच्या पद्धतशीर लागवडीचा –उत्पादनाचा -- अर्थकारणाचा – निर्यातीचा – औषधी गुणांचा परिचय करून देतांना, कोंकणातील फणस उत्पादनाशी त्यांची तुलना करतो. फणस पिकाबद्दल असलेल्या कोंकणातील समाजमनाच्या औदासिन्यावर, निष्काळजी वृत्तीवर टिप्पणी करतांना तो उपायही सुचवतो. फणस खाऊन झाल्यानंतर उरणाऱ्या चारखंड – आठळ्या – पाने – लाकूड यांचे पारंपरिक उपयोगाचे विस्ताराने वर्णन करतो. बहुगुणी फणसाच्या वापराचे इतके पर्याय आपल्या समोर ठेवतो की रेस्टॉरंट चालवणारे शेफ असोत अथवा पाककला निष्णात नागरिक, यासर्वांसह शेतकरी आणि उद्योजकांना ते करतील तितके विविध प्रकारचे फायदे  उपलब्ध आहे याची खात्री देतो. फक्त हे सर्व ग्राहकांपर्यंत पोहोचणे, त्यांना ह्याचे महत्व पटवणे, हे करणे गरजेचे आहे याची कळकळ व्यक्त करतो.

समाजाभिमुख असलेला यातला दूसरा सचिन, आपल्या सहचारिणीच्या मदतीने, फणस पिकावरील प्रक्रिया करण्यासाठी प्रयत्न करतो आहे. **वेगन मीट (Vegan Meat) शाकाहारी मांस** हे अलीकडच्या काळांत पशूजन्य मांसाला पर्याय म्हणून जगभरातील

खवय्यानी स्वीकारले आहे. कच्या फणसापासून प्रक्रिया करून डबाबंद वेगन मीट बनविणे, पिकलेल्या फणसापासून, मधुमेहावर रामबाण उपाय असलेले फणसाचे पीठ बनवणे, तळलेले गरे बनवणे अशा भविष्यातील योजना, सचिन समोर आहेत.








यातला शेतकी सल्लागार असलेला विचारवंत सचिन आणखी वेगळा आहे. बालपणीच्या आठवणीत रमणारा सचिन, विलेपारल्यातील लोकमान्य सेवा संघाच्या कृष्णाबाई लिमये व्यायामशाळेतील अनुभवाचा आणि संस्थेच्या ग्रंथालयाचा उल्लेख करतो. शाळेत असतांना आईने आग्रहाने या मैदानी व्यायामशाळेत घातले होते. तिथले सूर्यनमस्कार आणि खोखो सारखे मैदानी खेळ यामुळे झालेला फायदा मला आज जाणवतो आहे असे तो कृतज्ञतेने सांगतो. याबरोबरच लोकमान्य सेवा संघाच्या श्री वा फाटक ग्रंथ संग्रहालयाचा तो सदस्य आहे. महाविद्यालयात शिकत असतांना, या ग्रंथालयात बसून कित्येक दिवस त्याने शेतकी विषयक संदर्भ संकलित केले आहेत. नेमके इथेच सचिनमधला विश्लेषक **प्रक्रिया आणि परिणाम** – **Process and Results** याचे नेमके गमक सांगतो – त्यातल्या फायदा आणि त्रुटीचे गणित आपल्यासमोर मांडतो.

सचिनच्या अनुभवाची मांडणी करताना तो म्हणतो .. .. नोकऱ्या बदलण्याचा एक फायदा म्हणजे तुम्हाला वेगवेगळ्या संस्थांमधून आणि तिथे असलेल्या बॉसकडून शिकायला मिळतं. मी नोकरी केलेल्या एका संस्थेमध्ये **प्रक्रीयांवर** भर दिला जायचा. त्यांचा असा ठाम विश्वास होता की जर प्रक्रीया -- व्यवस्था निर्माण केल्या -- त्यांचे काटेकोरपणे पालन केले तर **परिणाम** मिळतातच. मी काम करत असलेल्या दुसऱ्या एका संस्थेमध्ये कुठल्याही मार्गाने **परिणाम** मिळवण्यावर भर असायचा. असे परिणाम प्राप्त करण्यासाठी **व्यवस्था** मात्र विकसित

केल्या नव्हत्या. दोन्ही संस्थांमधल्या कर्मचाऱ्यांवर ह्या **व्यवस्थांचा किंवा अपेक्षित परिणामांचा ताण येत होता.** पहिल्या संस्थेमध्ये जिथे **प्रक्रीयांवर** भर होता तिथे **परिणाम** दृष्टीपथात न राहण्याचा संभव असे. नियमबध्द पध्दतीने वागताना, जर आवश्यक अपेक्षित **परिणाम** बदलले तर त्यांना साध्य करण्यासाठी लोकांकडे फार कमी पर्याय असत. संस्थात्मक पातळीवर काम करतांना खुप कमी लवचिकता होती आणि बऱ्याचवेळा मठ्ठ पध्दतीने आदेश पाळण्यापलिकडे लोक काही करू शकत नसत. दुसऱ्या संस्थेमध्ये जिथे **परिणाम** महत्वाचे होते तिथे बऱ्याचवेळा असे लक्ष्य निश्चित केले जात असे की ते साध्य करताना संस्थेमधल्या **प्रक्रीया व व्यवस्था** यांचा विचारच केला जात नसे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर माहिती व संपर्क ह्या दोन बाबतीत गैरसमज निर्माण होण्याची शक्यता असायची. सचिनच्या मते पारल्याच्या मैदानी व्यायामशाळेतले माझे अनुभव ही माझ्या व्यक्तिमत्व विकासाची एक **दीर्घ प्रक्रिया** होती आणि कालांतराने अपेक्षे प्रमाणे त्याचे **परिमाण** त्याला मिळाले होते. **आपल्या दैनंदिन व्यवहारातील अनेक क्रियांशी, विचारवंत सचिन हे प्रक्रिया आणि परिणामांचे रुपक अगदी सहजपणे जोडतो.**

याच नोकरीच्या काळांत, एका आंतरराष्ट्रीय शेतकी विषयक कार्यक्रमात त्याला पश्चिम आफ्रिकेतील घाना या अविकसित देशांत एक वर्षासाठी जाण्याची संधी मिळाली. भारतापेक्षा भिन्न पद्धतीची शेती आणि शेतकी उत्पादन असलेल्या तेथील एका डिस्ट्रिक्ट असेंब्लि (**district assembly** – जिल्हा परिषदेसारखी घानातील स्थानिक स्वराज्य संस्था) बरोबर तो काम करत होता. अनेक नव्या आणि चालू शेतकी प्रकल्पांचा अभ्यास – शेतकऱ्यांसाठी ट्रेनिंग मोड्यूल बनविणे – यासाठी ट्रेनरचे ट्रेनिंग वर्ग घेणे अशा स्वरूपाचे काम त्याला घाना मध्ये करता आले.



^ घानातील शेतकऱ्यांसमवेत




^ घानामधील ट्रेनिंग वर्ग

सचिनच्या कुटुंबाची स्वतःची शेती २० एकर शेती आणि आंबा बागायती आहे. या शेतीचे पूर्ण व्यवस्थापन सचिन स्वतः करतो. कोंकणातील आंबा – फणस – काजूबोंडे अशा शेती उत्पन्नापासून डबाबंद टिकाऊ पदार्थ बनविण्याचा त्याचा गृह उद्योग छोट्या प्रमाणात सुरू झाला आहे. कोंकणात आजपर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या मधमाशी पालन या तंत्राचा अभ्यास झाला आहे आणि दोन कृत्रिम पोळी, शेतात उपलब्ध झाली आहेत.



^ आमरस कॅनिंग




^ सौ तेजस्विनी, चि चैतन्य आणि श्री सचिन पटवर्धन

नर्म विनोदी ढंगात ललित लेखन करणारा सचिन, कोंकणातल्या माणसाच्या जेवणातील आवडीच्या खाद्यपदार्थावर आणि गृहीणींच्या रसना कौशल्यावर चविष्ट टिप्पणी करतांना, त्यांच्या दैनंदिन भाषेतील प्रचलित लोकोक्तीवर -- लोकश्रुतीवर -- माणुसकीच्या व्यवहारांवर सहज भाष्य करतो. कधी दोन स्थानिक मित्रांमधील संवादातून कधी स्नेहभावनेच्या, कधी परोपकारी वृत्तीच्या, कधी परिसरातील निसर्गाच्या आणि कधी माणुसकीच्या त्याला येणाऱ्या अनुभवांना शब्दबद्ध करतो. कोंकणातील आंबे – भात शेती – नारळ यावर अभ्यासाने आणि अनुभवाने लिहितांना कृषिविविधता म्हणजे काय आणि कोंकणातील त्याचे महत्व काय या विषयाचा विशेष विस्तार तो आपल्या ब्लॉग लेखनातून सतत करत असतो. **शेती व्यवसायातील युवापिढी - परसबाग न करण्याची सहा कारणे - मातीतले सेंद्रीय कर्ब -- देशांच्या अंतर्भागातले खाद्यपदार्थ – मुंबईत ऑगस्टमध्ये पालेभाजीऐवजी कोबी विकत घेतानाचे तोटे – शेतीचे अर्थशास्त्र आणि मानसिक प्रयोग - बुंदेलखंडमधल्या भात खाचरांची न सांगितलेली गोष्ट - भयकारक साखर – कोंकणातील नारळ उत्पादनाचे अर्थकारण** .. .. सचिनच्या ब्लॉग लेखनाचे विषय असंख्य आहेत आणि ललित शैलीत लिहिलेले हे लेख रंजक आहेत कारण शहरापलिकडच्या वास्तवाची जाणीव, त्यातून वाचकाला नियमित होत रहाते.




< बोधगया येथील शेतीविषयक कार्यक्रमाचे सूत्र संचालन करताना

सचिनचे आजोबा, सराफाचा अर्थात सोनाराचा व्यवसाय करीत असतं. त्याच्या वडिलांनीही काही वर्षे वाणसामान आणि शालेय साहित्य विक्रीचा यशस्वी व्यवसाय केला आहे. शेतकरी झालेला सचिन, आता त्याच्या आणि दुसऱ्यांच्या शेतात सोने पिकवतो आहे असे म्हटले, तर वावगे ठरणार नाही.



**< वडील श्री मनोहर, आई सौ मनीषा, चि चैतन्य आणि सौ तेजस्विनी यांचेसह श्री सचिन**

कोंकण परिसर आणि भारतातील अन्य शेतकी उपक्रमांमध्ये, एक जाणकार शेतीतज्ज्ञ -- अभ्यासू विश्लेषक आणि शेती विषयातील अनुभवी लेखक म्हणून सचिन सुपरिचित आहे. सचिनसह सर्व पटवर्धन कुटुंबीयांना अनेकानेक शुभेच्छा... !

--००--

**आता मी पारल्यात रहात नाही. लेख क्र ९**

# एका अदृश्य समाज परिवर्तनाची साक्षीदार.


**आता मी पारल्यात रहात नाही** या लेखमालेतील हा नववा लेख. यातील व्यक्तिचित्रांतून ज्यांचा परिचय आपण करून घेतला असे सर्व महानुभाव मूळ विलेपारल्याचे रहिवासी होते. विलेपारले हे आपले मूळ वसतिस्थान सोडून अन्यत्र स्थाईक झालेली ही सर्व व्यक्तिमत्व, आपल्या उपनगराचे वैभव आहेत. अन्यत्र स्थाईक झाल्यानंतर, यातल्या प्रत्येकाने त्यांच्या वास्तव्याच्या परिसरातील व्यक्ति आणि कुटुंबव्यवस्थेवर – संपूर्ण समाज जीवनावर – मूळ मराठी संस्कृती -- आचरण निष्ठांवर आणि व्यवसाय--उद्योग—साहित्य—वाङमय अशा विविध क्षेत्रांना, त्यांच्या कर्तुत्वाने दीर्घकाळ प्रभावित केले आहे. आपल्या निसर्गदत्त गुणवत्तेने आणि प्रयत्नाच्या सातत्याने, प्रचलित रुळलेल्या वाटा सोडून, या सर्वांनी आपले स्वतःचे नवे मार्ग आखले, ज्याची कालांतराने वहिवाट झाली.

अठराव्या शतकांत हैदराबादच्या निजामाच्या राज्याचा भाग असलेले **सेंट्रल प्रॉविन्स अँड बेरार** म्हणजे आत्ताची अमरावती-अकोला-यवतमाळ ही महाराष्ट्रातील विदर्भातील शहरे. वर्ष १९०३ मध्ये या प्रदेशावर ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाली. या सत्ता बदलाचा परिणाम म्हणजे ब्रिटिश राज्यकर्त्यांनी या प्रदेशात आधुनिक शिक्षण व्यवस्थेचा पाया रचला आणि रेल्वे मार्गाचे जाळे उभे केले. याच बदललेल्या शिक्षण व्यवस्थेत, परांजपे कुटुंबाच्या बुद्धिमत्तेचा वारसा लाभलेला, **श्री श्रीधर परांजपे** हा तरुण, तत्कालीन शालांत परीक्षेत, बेरारमधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला होता.

परांजपे यांचे आजोबा विदर्भातील नामवंत वकील होते. त्यांची आजी उत्तम कविता करत असत. असा ज्ञानसमृद्ध कुटुंबाचा वारसा घेऊन, अत्यंत बुद्धिमान **श्री श्रीधर परांजपे** पुढील शिक्षणासाठी मुंबईत दाखल झाले. त्यांना **व्हीजेटीआय** या शिक्षण संस्थेत प्रवेश मिळाला. पहिल्याच वर्षी झालेल्या परीक्षेत, **इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल** अशा इंजिनिअरिंगच्या दोन्ही विषयांत ते प्रथम क्रमांकाचे मानकरी झाले होते. देशाच्या स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या त्या काळांत उद्योग क्षेत्रांत वेगाने बदल घडत होते. परदेशी उद्योगांनी आपल्या व्यवसायांत नविन उत्पादनांची सुरुवात केली होती. शिक्षण पूर्ण झाल्यावर लगेचच

**श्रीधर परांजपे**,  **इंटरनॅशनल जनरल इलेक्ट्रिक कंपनी या अमेरिकन उद्योगात**, त्यांच्या पहिल्या नोकरीत रूजू झाले. यवतमाळच्या चि सुमती भट हिच्याशी विवाह झाला आणि हे दांपत्य अंधेरी या मुंबईच्या उपनगरात वस्तीला आले होते.

विलेपारल्यातील नागरी वस्तीची प्राथमिक शैक्षणिक आणि सांस्कृतिक जडणघडण आणि कालांतराने त्याचा नियमितपणे झालेला विस्तार, या प्रक्रियेला एक अनोखी शिस्त आहे. **श्री श्रीधर परांजपे** यांनी, श्री बाबुराव परांजपे यांच्या पारलेश्वर गृहनिर्माण संकुलात जागा घेतली होती. त्यांची मोठी मुलगी मंगलाचा जन्म वर्ष १९४९ मध्ये आणि दुसरी मुलगी माया हिचा जन्म वर्ष १९५४ मधला. याच वर्षी इमारत बांधून पूर्ण झाल्यावर, **श्री श्रीधर परांजपे** आपल्या कुटुंबासह, विलेपारल्याच्या पारलेश्वर गृहनिर्माण संकुलात रहायला आले होते. **सौ शालिनी आणि श्री श्रीधर परांजपे यांची मोठी मुलगी मंगला, अर्थात नामवंत लेखिका श्रीमती मंगला गोडबोले, आपल्या आजच्या लेखाची नायिका आहेत.**



**<** श्रीमती मंगला गोडबोले **>**



**काळ कुठलाही असो, आपल्या प्रत्येकाच्या भवतालांत घडणारे बदल, प्रचलित व्यवस्था – कायदे – नियम – मूल्य – प्रथा – परंपरा – भवताल – आचार विचार – शिक्षण व्यवस्था – आधुनिक तंत्रज्ञान अशा स्वरूपाचे असतात आणि तीच परिवर्तनाची सुरुवात असते.** असे सूक्ष्म किंवा स्थूल बदल प्रथम संवेदनशील व्यक्तीला जाणवतात आणि मग ते कुटुंब पातळीवर पोहोचतात. इथेच व्यक्तीच्या आकलनांत आणि अंतिमतः घेतलेल्या निर्णयात हे बदल प्रभावी ठरतात हे आपण पाहू शकतो. बुद्धिमान – चतुर – चाणाक्ष व्यवहारांची जाणीव आणि दूरदृष्टि असलेल्या **श्रीधर परांजपे** यांच्या वैयक्तिक आणि कुटुंबाच्या प्रगती संदर्भात असेच काही घडले होते. अमेरिकन कंपनीत नोकरी असल्याने अर्थातच त्यांच्या प्रागतिक

विचारांचा आणि व्यक्तिमत्वाचा प्रभाव, त्यांची मोठी मुलगी **मंगला** हिच्यावर निश्चितच होता. या बरोबरच मंगलाताईंच्या आजोळचा म्हणजे भट कुटुंबाच्या शब्दसमृद्धीचा वारसा सुद्धा खूप मोठा आहे. "दैनंदिन घरगुती व्यवहारांत मिश्किल आणि मार्मिक बोलणाऱ्या माझ्या आईचा प्रभाव माझ्यावर आहे" असा उल्लेख, **झुळूक** या **स्त्री** मासिकांतील विनोदी लेखमालेच्या पहिल्या संकलित पुस्तकाच्या सुरुवातीला त्यांनी केला आहे. मंगलाताईंचा एक मामा, त्याकाळांत **Illustrated Weekly** या टाइम्स ऑफ इंडियाच्या साप्ताहिकात इंग्लिश कथा आणि लेख लिहीत असे.




^ मंगलाताई गोडबोले

परांजपे आणि भट या दोन्ही कुटुंबाचा जन्मदत्त वारसा घेऊन आलेली मंगला, एल्फिन्स्टन कॉलेजातून बीए आणि मुंबई विद्यापीठात सुवर्णपदकासह एमए मराठीची पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झाली. त्यानंतर काहीच दिवसांत, **श्री श्रीनिवास गोडबोले** यांच्याशी, वर्ष १९७२ मध्ये मंगलाताईंचा विवाह झाला. **श्री गोडबोले** त्यावेळी, उद्योजक किर्लोस्करांच्या कराड मधील कारखान्यात नोकरीला होते. वर्ष १९६७ मध्ये झालेल्या कोयनानगर मधील भूकंपामुळे झालेल्या नुकसानीतून कराड शहर हळूहळू सावरत होते. याच काळांत वर्ष १९७२ ते १९८० अशी साधारण आठ वर्षे, गोडबोले दांपत्याचे वास्तव्य कराड मध्ये होते.

**घट्ट वीण असलेली कुटुंब सुरक्षा - सौख्याची उबदार चादर – उत्तम शिक्षक आणि मोठ्ठे मैदान असलेली घराजवळची शाळा – रहात असलेले निवासी संकुल आणि विलेपारले उपनगरातील पोषक समाज व्यवस्था या सर्वांचा अनुभव, मंगलाताईंनी**

**आपल्या बाल-किशोर-कुमार वयात नेमकेपणी टिपला असावा.** परांजपे कुटुंबांच्या समृद्ध भाषा - शुद्धलेखन - पाठांतर - शुद्ध उच्चार याचे संस्कार शालेय जीवनातच झाले होते. आपल्या नियोजित क्षेत्रांत शिखर गाठलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या यशात, **निसर्गदत्त गुणवत्ता (Natural talent)** आणि **नियमित सरावाने मिळवलेले कौशल्य (Acquired skills)** हे दोन घटक अत्यंत महत्वाचे असतात. **चाणाक्ष निरीक्षणशक्ति – विश्लेषक वृत्ती – संवेदनशील चित्त** ही मंगलाताईंची **निसर्गदत्त गुणवत्ता (Natural talent)** आहे. लेखन कारकिर्दीच्या अगदी सुरुवातीच्या काळांत, त्यांनी **नियमित सरावाने कौशल्य (Acquired skills)** कसे मिळवले..?.. त्यांच्या नियमित सरावांचे आणि नंतर मिळालेल्या यशाचे फार रंजक वर्णन, मंगलाताई स्वतःच नेमक्या शब्दांत करतात.


मंगलाताईंच्या दीर्घ लेखन कारकीर्दीचा परिचय करून देणाऱ्या आपल्या लेखाचे शीर्षक आहे...**एका अदृश्य समाज परिवर्तनाची साक्षीदार.** या नेमक्या सहा शब्दांत, खरे म्हणजे मंगलाताईंचा परिचय व्यक्त होतो. बदलणाऱ्या परिस्थितीला अनुसरून मनुष्य आपल्या सामाजिक संबंधांत जाणीवपूर्वक बदल करत असतो म्हणून सामाजिक परिवर्तन घडते. समाजाच्या सांस्कृतिक व्यवस्थेत सारखा बदल होत असल्याने सामाजिक परिवर्तन चालू रहाते. एका पिढीतील मूल्ये पुढच्या पिढीतील लोकांना मान्य होतातच असे नाही. परिवर्तन हे मानवी संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे. गेल्या चाळीस-पंचेचाळीस वर्षांत मंगलाताईंची साठ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. मात्र या आजच्या लेखांत त्यांच्या **कथा – संशोधन..अभ्यास – बालसाहित्य – चरित्र लेखन** अशा नेमक्या साहित्य निर्मितीचा **परिचय, आपण** करून घेणार आहोत. मंगलाताईंच्या या **सर्व साहित्यातून, स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या काळांतील शहरी आणि प्रसंगी ग्रामीण मराठी समाजातील स्त्री आणि तिच्या कुटुंबव्यवस्थेतील परिवर्तनाचे बहुरंगी दीर्घ शब्दचित्र, वाचकांसमोर दृश्यमान होते.** मंगलाताईंच्या संपूर्ण साहित्याच्या अभ्यासावर, सहा विद्यार्थ्यांनी **M Phil** पदवी प्राप्त केली असून सध्या दोन महिला विद्यार्थी **Ph D** पदवीसाठी त्यांच्या संपूर्ण साहित्याचा अभ्यास करत आहेत.





^ मंगलाताई गोडबोले

विवाहानंतर कराडमध्ये स्थाईक झाल्यानंतर, वर्ष १९७२ पासून गेली पन्नास वर्षे, **मंगलाताईंची शब्दकळा त्यांच्या कथांतून रसिकमान्य झाली**. विशेषतः सर्व वयोगटातील स्त्रीयांचे मनोव्यापार – दैनंदिन जीवनातील छोट्या मोठ्या समस्या – पारंपरिक भारतीय आणि मराठी समाजातील नितीमूल्यांची आणि नात्यांची जपणूक – सामान्य मध्यमवर्गी कुटुंबातील स्त्रीयांच्या जाणिवा – अपेक्षा – गरजा आणि संघर्ष अशा असंख्य संवेदनांना, मंगलाताईंच्या कथांमधील आशय स्पर्श करत राहिले. सकस कथाबीज – नेमक्या संवादात वाचकांपर्यंत सहज पोहोचणारा समृद्ध आशय यामुळे मंगलाताईंच्या कथा त्यातील नर्म विनोदाच्या स्पर्शाने, वाचकवर्गात खासकरून माहिला वाचकांमध्ये लोकप्रिय झाल्या. **भाषा आणि देश कुठलाही असो, प्रत्येक दर्जेदार साहित्य-वाङमय-चित्रपट-संगीत-चित्रकला-शिल्पकला-स्थापत्य हे निर्माण होते त्या त्या काळातील समाज जीवनाचे ते प्रतिबिंब असते हे सर्वमान्य आहे. म्हणूनच या कथाकार आणि लेखिका मंगलाताई, एका दीर्घकालीन अदृश्य समाज परिवर्तनाची प्रवाही नोंद घेत राहिलेल्या साक्षीदार आहेत.**









स्त्रियांना विनोद कळत नाही, आणि त्यांना विनोद करता येत नाही, अशी एक धारणा मराठी वाचकांमध्ये पूर्वापार आहे. काही निवडक मान्यवर पुरुष लेखकांनी या समजुतीला नियमित खतपाणी घातले. दुसरे म्हणजे संसारकथा लेखनाला मौलिक साहित्याचा दर्जा नाही असे विवाद मान्यवर पुरुष लेखकांनी नित्य प्रसारित केले. मंगलाताईंना मात्र आपल्या वाचक संमत सकस कथा लेखनाचा आणि स्त्रीसंदर्भातील सुसंस्कृत – सहज स्वीकृत विनोदी साहित्य लेखनशैलीचा अभिमान आहे. त्यांच्या निवडक कथांचा कानडी अनुवाद झाला आणि कालांतराने त्यांचा संग्रह प्रकाशित झाला. काही कथांचे हिंदी व इंग्रजी अनुवाद झाले.

सुरुवातीच्या काळांत सरावाने गवसलेल्या त्यांच्या खास विनोदी लेखन शैलीविषयी मंगलाताई म्हणतात....“तुमचा विश्वास बसणार नाही पण अगदी खरं सांगायचं तर चिंतनशील लिखणाकडे माझा कल जास्त आहे. मी लिहायचे त्या ६४ पानाच्या स्त्रीवादी **‘स्त्री’** मासिकात, साठ पाने स्त्रीचे गोडवे गाणारे लेख असत. पण उरलेल्या चार पानात एखादा पुरूष लेखक बाईच्या मूर्खपणाचे, वेंधळेपणाचे असे काही किस्से लिहायचा की विचारू नका..!..**त्या पुढच्या काळांत, स्त्रीचा विनोदासाठी असा सतत वापर करणे मला खटकायला लागले. सगळ्या स्त्रिया अशा पुरुषांना त्रासदायकच असतात का? आपण जर लेखन केले तर कदाचित याची दुसरी बाजू समर्थपणे उभी करू शकू असे मला वाटले.**











**'स्त्री'** मासिकात लेखन करणाऱ्यापैकी एखाद्या महिला सदस्यानेच हलकेफुलके लेखन असणारे एखादे सदर सुरू करावे असे त्याकाळी संपादक मंडळातील सदस्यांचे मत झाले. मग अनपेक्षितपणे ती जबाबदारी माझ्याकडे आली आणि त्यानंतर जवळजवळ दहा वर्षे मी **'झुळूक'** हे सदर चालवले. सुरुवातीच्या काही लेखात मी चाचपडत असले तरी पुढे मला माझी शैली गवसली आणि लेखनातही अधिक प्रगल्भता आली असे आता वाटते. थोडक्यात सांगायचे तर अशा अपघातानेच मी विनोदी लेखनाकडे वळले". **झुळूक, पुन्हा झुळूक, नवी झुळूक, सहवास हा सुखाचा, आडवळण, गुंडाबळी, जिथली वस्तू तिथे, पोटाचा प्रश्न** आणि **ब्रह्मवाक्य** असे एकाहून एक सरस विनोदी कथा – ललित लेखांचे संग्रह लिहिणाऱ्या मंगलाताई गोडबोले वाचकांमध्ये लोकप्रिय झाल्या. मंगलाताईंच्या कथा बिजाचा – विषयवस्तुचा परिचय त्यांनी नेमलेल्या पात्रांच्या संवादातून होतो. त्यावेळी संयम – विश्वास – असूया –स्वार्थ – आनंद – विषाद – हेवा – आपुलकी – प्रेम – द्वेष अशा भावना आणि धारणा व्यक्त करतांना अथवा घटना आणि प्रसंगांचे वर्णन करताना त्यांची भाषा आणि विनोदाचा चंदेरी वर्ख लावलेली विशेषणे अगदी नेमकी असतात. या अनोख्या विनोदी कथा लेखन शैलीने, लेखक म्हणून त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली.












संशोधन आणि अभ्यासपूर्ण लेखनात मंगलाताईंच्या **वयात येताना, दत्तक घेण्यापूर्वी, काय तुझ्या मनात, आई तुझ्याच ठायी, सती ते सरोगसी** आणि **वार्धक्यविचार** या सहा पुस्तकांचा परिचय करून घेणे आवश्यक आहे. एक-दीड वर्ष अभ्यास करून, तज्ज्ञांशी बोलून, वैद्यकशास्त्र- मानसशास्त्र- समाजशास्त्र यांची आंतर-विद्याशाखीय (इंटरडिसिप्लिनरी) सांगड घालून ही पुस्तकं लिहीली गेली आहेत. ललित लेखनापेक्षा पुस्तकांची मांडणी पूर्णपणे वेगळी आहे. कोणाच्याही दैनंदिन जीवनात, विशेषतः स्त्रीयांच्या मानसिक आरोग्याच्या संतुलनाच्या समस्या बनू शकतील असे, तिच्या मातृत्वासंदर्भात नवे विचार व्यक्त करणारे हे सहा संवेदनशील विषय, मंगलाताईंनी स्वतंत्र अभ्यासाने आणि अधिकाराने वाचकांसमोर मांडले. **जीवन आहे तोपर्यंत समस्या रहाणारच आहेत.** स्त्री-पुरूषांचे सहजीवन सुखकारक व्हावे, निरोगी शरीराइतकेच निरोगी मनही सोबतीला असावे अशा भूमिकेतून लिहिलेले **काय तुझ्या मनात** हे पुस्तक. स्त्रीची निराश मनस्थिति व्यक्त करणारे उद्गार ही त्यांची आत्मानुकंपा आहे की त्यांना जगण्याचा संघर्ष खरोखरच असह्य होत असावा..? आधुनिक–शहरी--व्यवसायिक स्त्रीच्या अशा समस्यांच्या अभ्यासावर विज्ञाननिष्ठ उपाय सुचविणारे हे पुस्तक.


**दत्तक घेण्यापूर्वी** या पुस्तकाची मांडणी करतांना असंख्य विषयांचा संदर्भ मंगलाताईंनी घेतलेला दिसतो. या विषयावरचे, अभ्यासाने लिहिलेले, मराठीतील हे पहिलेच पुस्तक आहे. एखाद्या दांपत्याला, विशेषतः त्यातील स्त्रीच्या अपत्य नसणे या समस्येला, भावनिक-कौटुंबिक-सामाजिक-सांस्कृतिक-आर्थिक असे अनेक पैलू आणि पदर असतात. अनुवांशिकता – डीएनए – वंध्यत्व – दत्तक कायदे – दत्तक मुले आणि त्यांच्या पालकांचे मानसशास्त्र आणि निराधार मुलांना आधार देणारी अनाथालये अशा दत्तक विषयक अनेक विषयांचे परस्पर आवलंबित्व, यांचे गंभीर विश्लेषण करणारे हे पुस्तक खूप गाजले. या पुस्तकाचा इंग्लिश अनुवाद झाला आहे. **सती ते सरोगसी: भारतातील महिला कायद्याची वाटचाल** हे पुस्तक लिहिताना मंगलाताईंनी एका तरुण वकील मैत्रिणीची मदत घेतली. मातृत्व हे स्त्रीचे निसर्गदत्त वरदानच. या विषयासंदर्भातील प्रचलित संस्कृति आणि आधुनिक कायद्याच्या परिवर्तनाचा वेध घेणारे हे पुस्तक विचारांना चालना देणारे आहे. आधुनिक काळांतील स्वतंत्र विचाराच्या – स्वतःची नोकरी-व्यवसायांतील कारकीर्द यशस्वी करणाऱ्या -- स्त्रीच्या मातृत्वाचा – मातृत्वाच्या जबाबदारीच्या कालावधीचा – मुलं स्वावलंबी झाल्यानंतरच्या तिच्या आई म्हणून तिच्या बांधीलकीचा वेगळा – स्पष्ट आणि परखड विचार


मांडणारे मंगलाताईंचे पुस्तक **आई तुझ्याच ठाई**. करियर वुमन गटांतील स्त्रीयांनी या पुस्तकातील परखड विचारांचे जोरदार स्वागत केले होते.

















स्त्री+पुरुष शरीर परिचय – शृंगार – लैंगिक संबंध अशा कुटुंबात मोकळेपणाने चर्चेला न येणाऱ्या विषयातील समज - गैरसमज – अंधश्रद्धा आणि त्यासाठी तरुण – तरुणींना विज्ञाननिष्ठ साक्षर मार्गदर्शन करणारे **वयात येताना** हे पुस्तक, मंगलाताईंनी नामवंत स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ वैजयंती खानविलकर यांच्या सहकार्याने लिहिले आहे. या पुस्तकाचा गुजराती अनुवाद झाला आहे. स्त्रीयांच्या समस्या – जाणिवा – धारणा यावर तीनशेच्या वर कथा लिहिणाऱ्या मंगलाताई, त्या प्रतिमेत कधीच अडकून राहिल्या नाहीत. **स्त्रीयांच्या समस्यांवर चर्चा आणि मार्गदर्शन करणारी ही अभ्यासपूर्ण पुस्तके म्हणजे मंगलाताईंच्या आधुनिक स्त्रीयांच्या समस्यांवरील चौफेर चिंतनाचे व्यक्त आणि दृश्य दस्तावेज आहेत.** यातले

**वार्धक्यविचार** हे पुस्तक **Simone De Beauvoir** यांच्या **ओल्ड एज** ह्या मूळ फ्रेंच (आणि नंतरचा इंग्लिश अनुवाद) या प्रसिद्ध पुस्तकावर आधारित मंगलाताईंनी केलेला भावार्थ अनुवाद आहे. **सतत पंचेचाळीस वर्षे, स्त्रीजीवनाचा ललित आणि वैचारिक लेखन शैलीत विस्ताराने परिचय करून देणाऱ्या मंगलाताई, म्हणूनच एका दीर्घकालीन अदृश्य समाज परिवर्तनाच्या साक्षीदार आहेत.**













**निरू आणि नेहा**. दोन भावंडांना नायकत्व बहाल करून, किशोर मासिकासाठी लिहिलेल्या कथांचे हे संकलित पुस्तक. बालसाहित्य या प्रकारात त्यांच्या खास नर्म विनोदी आणि चमकत्या कलाबुती शैलीच्या स्पर्शाने सजलेल्या आणि बालवाचकांच्याही पसंतीच्या या कथा. किशोर वयातील मोठी मुलगी नेहा, तिचा धाकटा भाऊ निरू अर्थात निरंजन आणि त्यांचे आई+बाबा अशा एका चौकोनी कुटुंबाच्या या गमतीच्या कथा. या किशोरवयीन दोन भावंडांच्या संवादातून आणि छोट्या छोट्या दैनंदिन प्रसंगातून, मंगलाताई मुलांच्या दैनंदिन घरगुती व्यवहारात समस्या निर्माण करतात. या समस्या, त्या किशोरवयातील आकलनाच्या आणि समजुतीच्या असल्याने निरुपद्रवी आहेत. मग आई+बाबांच्या संवादातून मंगलाताई त्या समस्यांचे निराकरण करतात आणि मुलांसाठी ती समस्यापूर्ती असते. या बालकथांमधील निरागस संवादातून उलगडत जाणारी विषयवस्तु आणि नंतरचे पालकांचे संवाद, दोन पातळ्यांवर होत राहिले. वाचकांना त्यातली रंजकता भावलीच. मात्र त्यांच्या नकळत, बालकांना पालकनितीचे आणि पालकांना बालकनितीचे धडे मिळत राहिले. बालकांच्या वागणूक विषयक **(Behavioural)** आणि मानसशास्त्र विषयक **(Psychological)** समस्यापूर्ती करणारे इतके ललित आणि रंजक लिखाण, मराठीत दुर्मिळच म्हणावे लागेल. बालसाहित्या मध्ये कादंबरी लिखाण फार कमी प्रमाणात झालेले दिसते. मंगलाताईंनी **अल्बम**

ही कादंबरी बालवाचकांसाठी लिहिली. **निरू आणि नेहा** आणि **अल्बम** या दोन्ही पुस्तकांना बालसाहित्य विभागांत सरकारी पुरस्काराने सन्मानित केले गेले.

कुमार-किशोर वयातील मुलांच्या वाढीसाठी पालकांना आवश्यक असणारे सुजाण पालकत्व नक्की कसे असावे, ही स्वानुभवावर लिहिलेली, **माझी पालकनीती** ही बालक-पालकांसाठी मार्गदर्शक ठरलेली मंगलाताईंची लेखमाला, नंतर संकलित पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध झाली. **ज्ञानप्रबोधिनीच्या छात्रप्रबोधिनी** या मुलांसाठीच्या नियतकालिकांत प्रकाशित झालेली **सही रे सही** ही लेखमाला नंतर याच नावाने संकलित पुस्तक स्वरूपात प्रकाशित झाली. मंगलाताईंचे **झुळूक, पुन्हा झुळूक, नवी झुळूक** आणि असे अनेक कथा संग्रह प्रथम लेखमाला स्वरूपात प्रकाशित झाले होते. नंतरच्या काळांत या लेखमाला संकलित पुस्तक स्वरूपात प्रकाशित झाल्या.









मंगलाताईंच्या चरित्र लेखनाचा हा वेगळा परिचय. मंगलाताईंनी लिहिलेली तीन चरित्र आजपर्यंत प्रकाशित झाली. त्यातले पहिले **दामले मामा** हे चरित्र**.** भारतीय चित्रपटाच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान असलेल्या प्रभात फिल्म कंपनीचे एक संस्थापक, स्वयंशिक्षित तंत्रज्ञ-व्यवस्थापक आणि प्रभातचे कुटुंबप्रमुख अशी ज्यांची ओळख होती अशा विष्णुपंत दामले यांचे हे चरित्र, मंगलाताईंनी, श्री विष्णुपंत तथा दामले मामांचा कार्यकाळ समाप्त झाल्यावर जवळ जवळ सत्तर वर्षांनी लिहिले. पुण्यातील नामवंत सुवर्णकार पु ना गाडगीळ या उद्योजक कुटुंबाचे अध्वर्यू माननीय श्री दाजीकाका गाडगीळ यांचे **सुवर्णमुद्रा** हे चरित्र. याच्या


चरित्रकार मंगलाताई आहेत. **सुनीताबाई** याच नावाने पुलंच्या सौभाग्यवती श्रीमती सुनीताबाई देशपांडे यांचे चरित्र मंगलाताईंनी लिहिले आहे.


मात्र माननीय श्री पु ल देशपांडे यांच्यावरील तीन ग्रंथ हे मंगलाताईंचे चरित्र लेखनातील सर्वात मोठे आणि प्रभावी काम आहे. त्यातील पहिला **अमृतसिद्धी (पु. ल. समग्रदर्शन) हा दोन खंडात प्रकाशित झालेला साडेसातशे पानांचा ग्रंथ.** हा ग्रंथ पुलंच्या अमृत महोत्सवानिमित्त ८ नोव्हेंबर १९९५ ला पुण्यामध्ये राजहंस प्रकाशनाने प्रसिद्ध केला. सातशेपन्नासहून जास्त पृष्ठांच्या या द्विखंडात्मक ग्रंथावर डॉ स ह देशपांडे यांच्या बरोबर सहलेखक म्हणून आपलं नाव आहे, याचा मंगलाताईंना सार्थ अभिमान आहे. योगायोग असा की ज्यांचे चरित्र लिहिले ते श्री पु ल देशपांडे, आणि या ग्रंथाचे सहलेखक डॉ स ह देशपांडे आणि श्रीमती मंगलाताई गोडबोले हे तिघेही माजी पारलेकर, कालांतराने पुण्यात स्थाईक झाले होते. मंगलाताई म्हणतात .. .. “पुलंच्या लिखाणातून प्रेरणा घेऊन माझ्यासारखी अनेक मुलं लिहिती झाली आणि याचं संपूर्ण श्रेय त्यांच्या अतिशय नितळ, निखळ, सात्त्विक अशा लिखाणालाच आहे, यात शंका नाही. जगण्यावर विलक्षण प्रेम असल्याशिवाय आणि माणूस म्हणून संपूर्ण विकास झाल्याशिवाय असं लिखाण कुणाच्या हातून लिहून होणार नाही”.

**अमृतसिद्धी (पु. ल. समग्रदर्शन) या ग्रंथाच्या अडीच वर्षांच्या निर्मिती प्रक्रियेच्या आठवणी सांगताना मंगलाताई रंगून जातात.** आयुष्याची सुरुवातीची २०-२२ वर्षे त्या विलेपारल्यात होत्या आणि तोच नेमका पुलंचा भरभराटीचा काळ होता. त्या काळांत मंगलाताईंवर पुलंचा कमालीचा प्रभाव होता. या प्रकल्पाचे प्रमुख डॉ स ह देशपांडे सर्वार्थाने बुजुर्ग होते. त्यांना साहाय्यक म्हणून माझं नाव सुचावं, पुलंनी माझ्या नावाला मान्यता द्यावी, हा माझ्या आयुष्यातला भाग्ययोगच म्हटला पाहिजे ही आठवण सांगतांना मंगलाताई भारावून जातात. सुनीताबाईंच्या संग्रहात असलेली, पुलंना वेळोवेळी आलेली सुमारे १०,००० पत्रं त्या अभ्यासात मंगलाताईंना वाचता आली. १९५० च्या आसपासच्या मराठी चित्रपटसृष्टीचा, त्यातल्या पुलंच्या कामगिरीचा वेध घेण्यासाठी कोल्हापूरला जाऊन तेव्हाच्या कलाकार – तंत्रज्ञांच्या भेटी आणि मुलाखती झाल्या. एका अर्थाने मंगलाताईंना, महाराष्ट्राचा सुमारे १९४० ते १९८० पर्यंतचा सांस्कृतिक इतिहासच तुकडय़ातुकडय़ाने ऐकायला मिळाला होता.

एक लेखक म्हणून पुलं यांनी जवळजवळ पन्नास वर्षे मराठी माणसाच्या मनावर राज्य केले यातच त्यांचे यश सामावले आहे. पण इथे मंगलाताई परखडपणे, पुलंच्या संदर्भात त्यांना खटकलेल्या एका गोष्टीचा स्पष्ट उल्लेख करतात. **त्या म्हणतात**.... "नेहमी मला **व्यक्ती आणि वल्ली** या पुस्तकाच्या संदर्भात खटकते ती गोष्ट म्हणजे त्यात एकही स्त्री व्यक्तिरेखा नाही. एकही दखलपात्र स्त्री व्यक्तिरेखा पुलं सारख्या प्रतिभावान लेखकाने रेखाटू नये का? किंवा समाजाची घडणच अशी होती की त्यांनीही स्त्रीकडे दुर्लक्ष केले?" या विचाराने त्या आजही अस्वस्थ होतात.






मंगलाताई सांगतात .. .. "त्या काळात पुलंची प्रकृती बरी नसे. त्यांच्या आणि स. हं. च्या तुलनेत मी बरीचशी 'कच्चं मडकं' ठरे. तरीही प्रत्येक क्षण, प्रत्येक व्यक्ती-घटना-प्रसंग मला काही ना काही शिकवून जात. वरकरणी देखण्या वाटणाऱ्या आपल्या कलाविश्वामधलं कुरूप, दचकवणारं वास्तवही अनेकदा समोर येई. नामवंतांचे मातीचे पाय आणि सामान्य कलाप्रेमींच्या डोंगराएवढ्या निष्ठा हे दोन्ही आलटून पालटून दिसे. लोकप्रियता हे प्रकरण किती लोभस-जाचक-निसरडं-शेफारवणारं-एकाच वेळी काहींमध्ये प्रेम आणि काहींमध्ये मत्सर जागवणारं असू शकतं याचा तो साक्षात्कार मला अंतर्बाह्य भिडून, बदलवून गेला".

पुलंच्या मृत्यूनंतर पुढे दहा दिवस, पुणे आकाशवाणीवर पुलंच्या आठवणी सांगणारा कार्यक्रम मंगलाताईंनी सादर केला. त्या कार्यक्रमातील सर्व व्याख्यानांच्या संकलित संहिता म्हणजे **पुरुषोत्तमाय नमः.** वर्ष २०१९ हे पुलंचे शताब्दी वर्ष. त्यानिमित्त **पु ल चांदणे स्मरणाचे** हा मंगलाताईंनी लिहिलेला पुलंचा चरित्र ग्रंथ प्रकाशित झाला. या आठवणी सांगताना मंगलाताई म्हणतात .. .. "पुलंचा अभ्यास करायला, कोणत्याही प्रकाराने त्यांच्याशी जोडलं जायला कित्येक साहित्यप्रेमी, गुणी माणसं एका पायावर तयार झाली असती. मी माझ्या सर्व शक्तीनिशी कामाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. सतत पुलं वाचणं, पुलंसंबंधी

वाचणं, संबंधितांना भेटणं, पुलंचे चित्रपट-नाटकं-एकपात्री प्रयोग यांतलं जे जे मिळेल ते बघणं, त्या त्या माध्यमतज्ज्ञांच्या मुलाखती घेणं, त्यानिमित्त प्रवास करणं आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे मिळालेली माहिती पुलंशी प्रत्यक्ष ताडून घेणं हे एक भलं मोठं चक्र झालं. आता विचार केला तरी दमायला होतं. भारतीय साहित्यातील यशस्वी लेखकांचा विचार केला तर असं लक्षात येतं की गुरुदेव टागोरांनंतर पुल हे एकमेव साहित्यिक आहेत यांच्या वाङमय निर्मितीवर इतक्या मोठ्या प्रमाणावर समीक्षा झाली आहे". **पुल म्हणजे मराठीतले टागोर** या श्री ग दि माडगूळकरांच्या विधानाला पुष्टी देत मंगलाताई पुढे म्हणतात .. .. "रविन्द्रनाथांनी बंगालीत साहित्यात जसा सर्वत्र संचार केला .. .. अगदी तसाच संचार पुलंनी मराठी साहित्य आणि कलाक्षेत्रात केलेला आपल्याला दिसतो. साहित्य-नाटक-संगीत-चित्रपट कथा आणि संवाद-अभिनय-वक्तृत्व अशा प्रत्येक क्षेत्रांत, वर्ष १९४० ते १९९० अशा पन्नास वर्षांच्या कालावधीत, मराठी जनमानसावर, पुलंचा प्रभाव विलक्षण आहे"...!

मंगलाताईंच्या या परिचय लेखाच्या निमित्ताने, त्यांच्याशी दीर्घ संवाद झाला. त्यांचे बोलणे नेहेमीच सौम्य स्वरांत असते. त्या स्पष्टवक्त्या आणि प्रसंगी परखड आहेत. त्यामुळे एखाद्या विषयावरची त्यांची मते पारदर्शक आणि निश्चित असतात. ज्या काळांत मराठी मासिकांचा उत्कर्षाचा काळ होता त्याकाळांतील, गेली तीस वर्षे, त्यांची संपादकीय कारकीर्द खूप प्रभावी झाली आहे. एक विनोदी कथालेखक या बरोबरच चरित्र लेखन – बालसाहित्य – स्त्री जीवनातील असंख्य विषयांचा अभ्यास आणि संशोधनपर लिखाण, या संदर्भातील मंगलाताईंचे काम फार मोठे आहे.



^ श्रीमती मंगलाताई, नातू चि अदित गोडबोले, नात चि रुचा रानडे आणि श्री श्रीनिवास गोडबोले

**आता मी पारल्यात रहात नाही** या लेखमालेत, मंगलाताईंचा परिचय विस्ताराने वाचकांना करून देता आला याचा एक पारलेकर म्हणून मला अभिमान आहे. या लेखाच्या निमित्ताने गेले तीन महीने मंगलाताईंच्या साहित्याचा नव्याने परिचय झाला आणि हे माझ्यासाठी वाचन समृद्धीचे दिवस होते. यासाठी लोकमान्य सेवा संघ, पारले या संस्थेच्या श्री वा फाटक ग्रंथसंग्रहालयाच्या ग्रंथपाल, माझ्या स्नेही श्रीमती मंजिरी जोशी वैद्य आणि त्यांच्या सहकार्यांची झालेली मदत मोलाची आहे. त्यासाठी त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

माननीय श्रीमती मंगलाताई, श्री श्रीनिवास गोडबोले यांच्यासह श्री सिद्धार्थ गोडबोले आणि श्रीमती मुग्धा गोडबोले रानडे या सर्व कुटुंबीयांना शतशत शुभेच्छा....!

--००--

**आता मी पारल्यात रहात नाही. लेख क्र १०**

# बंगलोर आयटी ते रोहा पोल्ट्री: एक भन्नाट प्रवास

**आता मी पारल्यात रहात नाही** या लेखमालेतील आपल्या आधीच्या नायक – नायिकांसारखाच, हा आजच्या लेखाचा नायक. अगदी तसाच.. .. सर्वसामान्य सुशिक्षित मध्यमवर्गी कुटुंबाची याचीही पार्श्वभूमी अगदी तशीच. मात्र आधीच्या लेखांतील सर्वच नायक – नायिकांचा परिचय लेख लिहितांना, त्यांच्या वयाची पन्नाशी आणि साठी उलटून गेली होती. ते सर्व महानुभाव, तीस – चाळीस वर्षांच्या अनुभव संपदेने यशस्वी झाले होते. शिक्षण आणि नोकरीची यशस्वी कारकीर्द ज्या विषयात झाली त्या पेक्षा पूर्ण भिन्न विषय आणि व्यवसायात, तरुण वयात केलेले धाडस, हे आपल्या आजच्या लेखातील नायकाचे दुसरे वैशिष्टय आहे.

आजच्या लेखातील आपला नायक सर्वांत तरुण, अगदी नुकतीच चाळीशी पार केलेला आहे. किशोर – कुमार वयातील याच्या शिक्षण कारकीर्दीचे वैविध्य मात्र सगळ्यांपेक्षा वेगळे आहे. तेजपाल स्कीम गल्ली नंबर एकमधील सिद्धनिवास मध्ये याचे कुटुंब रहात असे. आठवी पर्यन्त विलेपारल्याच्या इंग्लिश माध्यम शाळेत, तिथून कुटुंब पुण्यात स्थाईक झाल्यानंतर शालांत परीक्षा एम आय टि मधून आणि मग १९९७ – ९९ ज्युनियर कॉलेजची दोन वर्षे गरवारे कॉलेज, असा शिक्षण कारकीर्दीचा एक टप्पा पार झाला होता. **यापुढच्या प्रत्येक टप्प्यावर बाह्य परिस्थितिमुळे किंवा कुटुंबाच्या थोड्याशा आर्थिक तणावाच्या परिस्थितिमुळे विलंब होत राहिला – धक्के मिळत राहिले.** त्याकाळांत या परिस्थितीचे तणाव त्याच्या कुटुंबाने नक्कीच निभावले असतील. आपल्या नायकाची थोडीशी उत्कंठा नक्की वाढली असेल मात्र आपल्या जेमतेम वीस वर्षाच्या तरुण नायकाने अशा विपरीत परिस्थिति तणाव म्हणून घेतल्या नासाव्या याला कारण त्याचा जन्मदत्त स्थिरचित्त स्वभावधर्म. मात्र आज मागे वळून पहातांना, **हे अनुभव मला समृद्ध करणारे होते** असं आपला नायक प्रांजळपणे सांगून टाकतो.

१९९९ या वर्षी कॉलेजच्या केंद्रीकृत (सेंट्रलाइज्ड) प्रवेश प्रक्रियेची सुरुवात झाली होती. या स्थित्यंतरामुळे कॉलेजच्या पहिल्या वर्षीच्या प्रवेशाला त्यावर्षी चार महीने विलंब झाला होता. आता बी सी एस (कॉम्प्युटर विज्ञान) हा पदवी परीक्षेचा प्रवास आता

नाशिकपर्यन्त पोहोचला होता. सुरुवातीला एक महिना ओझर मधील कॉलेज आणि नंतर नाशिक मधील प्रसिद्ध के टी एच एम कॉलेजमधून पुढची दोन वर्षे शिक्षण झाले होते तरी पदवी परीक्षेचे शेवटचे वर्ष बाकी होते... .. **ईधर स्टोरीमे थोडासा ट्विस्ट आ गया**..!

नाशिकच्या कॉलेजात दुसऱ्या वर्षांत शिकत असतांना नोकरी करण्याची निकड निर्माण झाली आणि योगायोगाने काही काम करण्याची संधि अनायासे समोर आली. वर्ष २००० – २००१ या काळांत **एडिट कॉम्प्युटर ट्रेनिंग इंस्टिट्यूटची** एक शाखा, वडिलांचा धाकटा भाऊ, डोंबिवलीचा बाळूकाका चालवत होता. त्याच्या मदतीने नाशिकमधे या इंस्टिट्यूटची शाखा सुरू झाली. वीस वर्षांपूर्वीच्या त्याकाळांत, फोटो शॉप – कोरल ड्रॉ – ॲनिमेशन असे नव्याने उपलब्ध झालेले कॉम्प्युटर तंत्रज्ञान, या इंस्टिट्यूटमधे शिकवले जात असे. पुढील काळांत, ज्या विषयात आणि क्षेत्रांत शिक्षण आणि कौशल्य प्राप्त करून कारकीर्द घडणार होती, त्या विषय आणि क्षेत्रात आपल्या नायकाचा प्राथमिक प्रवेश असा झाला होता. या इंस्टिट्यूटची शाखा सुरुवात करण्यापासून, दिवसाचे बारा – चवदा तास काम करतांना, त्याचवेळी कॉलेजचे दुसरे वर्ष पूर्ण झाले होते. मात्र यावर्षात अभ्यासाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे दहापैकी सहा विषयांत गुण कमी मिळाले आणि तिसऱ्या वर्षांतला प्रवेश हुकला होता.

नाशिक मधील वास्तव्यात, आईचा आतेभाऊ श्रीकांतमामाकडे आपला नायक रहात होता. वडिलांचा मोठा भाऊ वसंतकाका यांनी कॉलेजच्या पहिल्या वर्षाची आणि धाकटा भाऊ बाळूकाकाने कॉलेजच्या दुसऱ्या वर्षांच्या फीची व्यवस्था केली होती. दुर्दैवाने साहिलची नव्या व्यवसायातली प्रगती पहायला आज दोघेही हयात नाहीत. या दोघांसह, त्याकाळांत खंबीरपणे आपल्याला पाठिंबा देणाऱ्या, श्रीकांतमामा-सौ लतामामी आणि अर्थात आई-वडील या सर्व, ममत्वाच्या-आपुलकीच्या धाग्यांच्या घट्ट विणीच्या नात्यांनी बांधलेल्या कुटुंबियांप्रति, आपला तरुण नायक **साहिल गणपुले** कृतज्ञता व्यक्त करतो.



^ श्री साहिल गणपुले

कॉलेजचे दुसरे वर्ष संपताना नेमके याच वेळी साहिलला हार्नियाची व्याधी निर्माण झाली आणि त्या ऑपरेशनसाठी नाशिकहून परत पुण्याला घरी परतावे लागले होते. ऑपरेशन नंतर दोन महीने सक्त विश्रांती झाली खरी मात्र घरी बसून वडिलांच्या व्यवसायांत काही मदत करता आली होती. त्या वर्षांत कमी गुण मिळालेल्या विषयांच्या परिक्षाही दिल्या होत्या. सुदैवाने कॉलेजच्या तिसऱ्या आणि शेवटच्या वर्षासाठी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधे प्रवेश मिळाला आणि नियमित अभ्यास करून वर्ष २००३ मध्ये पदवी परीक्षेत अपेक्षित यश मिळाले होते.

पदवी परीक्षेनंतर मात्र विलंब आणि उत्कंठेचा तो कालखंड संपला आहे असे वाटत होते. प्रत्यक्षात तिसऱ्या वर्षांचा निकाल लागण्या आधीच हिंजवडीच्या विप्रो कॉल सेंटरचे कॉल लेटर हातात आले होते. पुढे एम सी एस च्या मास्टर्स डिग्रीचा अभ्यास करायचं होता. त्यासाठी एक वर्ष नोकरी करून वर्षाची फी आणि प्रवासासाठी मोटर सायकल घ्यायची असा मनसुबा झाला होता. या विप्रो कॉल सेंटरच्या संधीचा फायदा मात्र मिळाला नाही कारण पुण्यातच अन्य नोकरीची संधि उपलब्ध झाली होती, ती स्वीकारली होती. सहा महिन्यातच हे कॉल सेंटर बंद झाले, तीन महिन्यांचा पगारही मिळाला नाही. मात्र या दरम्यान **CCNA CISCO Certified Network Associate course** हा हार्डवेअर तंत्रज्ञानाचा चार महिन्याचा कोर्स त्याने यशस्वीपणे पूर्ण केला होता. यामुळे कॉम्प्युटर तंत्रज्ञानाच्या सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर दोन्ही विषयात त्याचा वावर सहज झाला होता.

मात्र या सुरुवातीच्या काळातही बाह्य परिस्थितिमुळे चुकलेल्या निर्णयांवर मार्ग काढत साहिल पहिल्या नोकरीत स्थिरावला होता. अजूनही एम सी एस च्या मास्टर्स डिग्रीचा अभ्यास करायचा होता आणि त्यासाठी एक वर्षभर तात्पुरती नोकरी करायची असे मनांत होते. औंध मधील **कनव्हरजिस** नावाच्या कंपनीत त्यावेळी वयाच्या तेवीस – चोवीसाव्या वर्षी साहिल दाखल झाला होता. बंद पडलेल्या आधीच्या कंपनीच्या अनुभवातून **कम्युनिकेशन स्किल** शिकता आली होती हा पगाराव्यतिरिक्त झालेला फायदा होता.



**^** श्री साहिल गणपुले

**कनव्हरजिस** या कंपनीत, पुढील सहा वर्षांच्या काळांत, कंपनीच्या नावातील गर्भित **Converge** या क्रियापदाचा आणि **Convergence** या नामाचा प्रत्यक्ष अनुभव, साहिलने घेतला होता. त्या तरुण वयात घेतलेल्या अनुभवांनी, त्याला विवेक आणि संयम शिकवला होता. कारकिर्दीच्या प्रगतीसाठी निर्णय घेतांना, चौफेर विचार करण्याचे कसब आणि व्यवहार चातुर्य साहिलने आत्मसात केले होते. **कनव्हरजिस** या कंपनीत पुढील काळांत, **टेक सपोर्ट इंजिनियर पासून दोन वर्षांत टेक सपोर्ट मॅनेजर अशी प्रगती झाली होती.** स्वतःच्या चित्त-वृत्ती कामावर केंद्रित (**Converge**) झाल्या होत्या आणि अर्थातच टीम लीडर म्हणून बाकीच्या सहाकाऱ्यांशी अभिसरण (**Convergence**) सुरू झाले होते. वर्ष २०१० पर्यन्त त्यांची खूप प्रगती झाली होती. शिक्षण पूर्ण झालेल्या पहिल्या टप्पानंतर, वयाच्या तिसाव्या वर्षी, दूसरा टप्पा ओलांडून, साहिल आता कारकीर्दीच्या तिसऱ्या टप्प्यावर जाण्याच्या तयारीत होता.

वर्ष २०१० च्या आसपासच्या काळांत जागतिक स्तरावर आय टि इंडस्ट्रीचा प्रभाव – प्रगती फार वेगाने झाली होती. आऊटसोर्सिंगसाठी भारतीय आय टि इंडस्ट्रीला प्राधान्य दिले जात होत आणि परदेशी आय टि कंपन्यांची कामे, मोठ्याप्रमाणात भारतात येत होती. मुंबईसह पुणे, दिल्ली, हैदराबाद, बंगलोर, गुरगाव अशा शहरांत भारतीय आणि परदेशी आय टि कंपन्यांचा व्यवसाय विस्तार झाला होता.

उत्तम लोकसंग्रह – नियमित जनसंपर्क – आपल्या व्यवसायातील बदलांची नेमकी जाणीव –संवाद चातुर्य – सर्व भाषेवरचे प्रभुत्व हे नैसर्गिक कौशल्य यासह शिक्षण आणि अनुभवाने प्राप्त झालेली आय टि विषयातली स्वतःची गुणवत्ता आणि त्यातले कच्चे विषय याची नेमकी जाणीव असलेला चाणाक्ष साहिल गणपुले, आता कारकिर्दीच्या तिसऱ्या टप्प्यावर पोहोचला होता. वर्ष २०१० मध्ये डेल ई एम सी या बंगलोर मधील मोठ्या परदेशी आय टि कंपनीत त्याने नोकरी स्वीकारली होती.



^ आर्किटेक्ट सौ नुपुर आणि श्री साहिल गणपुले

खूप तरुण वयांत परिस्थितीचे उतार – चढाव यांचे असंख्य अनुभव, आई-वाडिलांसह कुटुंबाचा भक्कम पाठिंबा, भविष्यातील कारकिर्दीची साक्षर – चतुर आखणी अशा भांडवलावर, साहिल वर्षभरात बंगलोर या नविन शहरामध्ये नोकरी आणि घर यांत स्थिर झाला. ऑगस्ट २०११ मध्ये आर्किटेक्ट चि नुपुर रिसबुड हिच्याशी विवाह झाला आणि दोघांचा संसार सुरू झाला होता. साहिलची आई सौ शीलाताई जरी मराठी कुटुंबातील असल्या तरी त्यांचे माहेर कर्नाटकातील आहे. यामुळे मराठी बरोबरच कन्नड ही त्यांची दुसरी

मातृभाषा आहे. यामुळे साहिलला कन्नड बोली भाषेचा थोडासा परिचय होताच. बंगलोर मधील वास्तव्यात स्थानिक भाषेत संवाद करता आल्यामुळे नव्या वातावरणामध्ये त्याचा वावर सहज झाला होता.

बंगलोरमधील आठ वर्षांच्या सहजिवनात सौ नुपर आणि साहिल यांची आठवड्यातील पांच दिवस नोकरी आणि व्यवसायांत आपले लक्ष पूर्ण केंद्रित करून दैनंदिन प्रगतीकडे वाटचाल सुरू झाली होती. मात्र दोघांच्या सामाजिक बांधीलकीच्या जाणिवा जागृत होत्या. **Think Globally – Act Locally – Respond Personally** या सूत्रातला नेमकेपणा दोघांना नक्की समजला असावा. तलाव सफाई, वृक्ष संवर्धन अभियान, आजारी मुक्या प्राण्यांवर उपचार, पर्जन्यजल संधारण उपक्रम अशा स्थानिक पातळीवरील अनेक उपक्रमांत त्यांचा नियमित सहभाग सुरू झाला होता. साहिलच्या ऑफीसमधील **CSR** प्रकल्पांची जबाबदारी त्याने घेतली होती. त्या माध्यमातून शाळा आणि विद्यार्थ्यांना शिक्षण उपक्रमांसाठी आर्थिक मदत दिली जात होती. असा **Purpose of Life** चा अनुभव घेतानाच, मुंबई – पुणे – बंगलोर शहरांत रहाणे खरंच आनंदाचे आहे का याचा पुनर्विचार दोघांनी सुरू केला होता.

**आता मी पारल्यात रहात नाही** या लेखमालेतील आजच्या लेखांत, सौ नुपुर आणि श्री साहिल गणपुले या **धाडसी दांपत्याचा** परिचय करून देण्यामागे एक निश्चित धोरण आणि धारणा आहे. यांच्यासाठी **धाडसी** हे संबोधन जाणीवपूर्वक वापरले आहे कारण हे दोघे वर्ष १९८० नंतर जन्मलेल्या एका पिढीचे प्रतिनिधि आहेत. आत्ता साठी – सत्तरी पार केलेल्या माझ्या पिढीतील महिला आणि पुरुषांना, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी, निवृत्त होईपर्यन्त काम करून, वयाची साठी गाठावी लागत होती. यानंतरच आपल्या आवडीचा छंद अथवा काम करायला यांना संधि मिळते. आज चाळीशीत असलेल्या या उच्चशिक्षित तरुण-तरुणी, खूप तरुण वयांत आर्थिक यश मिळवतात आणि **Purpose of Life** कडे वळतात. आपल्याला नक्की काय आवडते आहे – काय करायचे आहे याचा सर्वार्थाने अभ्यास करतात, विचार करतात, योग्य निर्णय घेतात आणि मग विलक्षण आत्मविश्वासाने नव्या ठिकाणी – नव्या उपक्रमाचे धाडस करतात.

साहिलची सहचारिणी सौ नुपुर, ग्रीन बिल्डिंग आर्किटेक्चरची सल्लागार आहे. शिक्षण – व्यवसाय – वैयक्तिक आवड यामुळे निसर्गाची तिची जाणीव साक्षर होती. नोकरी – व्यवसायातून निवृत्त झाल्यानंतर तिचे आई – वडील, रोहा या शहरांत स्थाईक झाले होते. सौ

नुपुरचे प्राथमिक शिक्षण तिथेच पूर्ण झाले होते. नंतर गुजरात मधील महाविद्यालयातून तिने आर्किटेक्चरची पदवी प्राप्त केली होती. गेल्या तीन – चार दशकांपासून रोहा हे शहर उद्योग व्यवसायांच्या मोठ्या कारखान्यांचे मुख्य केंद्र होते. त्यामुळे कोकणाचे प्रवेशद्वार असलेले हे शहर संपूर्ण महाराष्ट्राशी महामार्ग आणि रेल्वे मार्गाने जोडलेले आहे. यासर्व उपलब्धीमुळे, अलीकडच्या काही वर्षांत रोहा शहराबाहेरच्या परिसरात, कुक्कुट पालन व्यवसाय झपाट्याने विस्तारला होता. जागेची उपलब्धता – तंत्रज्ञान – व्यवसाय कौशल्य शिक्षित आणि अर्धशिक्षित स्थानिक मनुष्यबळ – विक्री व्यवस्था – वाहतूक व्यवस्था या कुक्कुट पालन व्यवसायाला पूरक सोयी – सुविधा, स्थानिक पातळीवर सहज उपलब्ध होत्या.

वर्ष २०१० पासून बंगलोर मध्ये नोकरी करत असताना, त्याचवेळी भविष्यातील उपक्रमांचा विचार होत होताच. वर्ष २०१८ मधे तो महत्वाचा निर्णय झाला आणि प्रथम साहिल बंगलोर मधून रोहा शहरांत वास्तव्यासाठी आला. साहिलचा उत्तम जनसंपर्क आणि लोकसंग्रह यामुळे डेल ई एम सी या कंपनीतील वरिष्ठांशी सल्ला मसलत करून, आपल्या जबाबदाऱ्या थोड्याशा कमी करून, रोह्यात राहून **Work from Home** ची सवलत घेतली आणि त्याचे काम सुरू राहिले. आता सहा आठ – तास घरी बसून नोकरी करतानाच, **ब्रॉईलर पोल्ट्री फार्म** या व्यवसायाच्या प्राथमिक बांधणीची तयारी सुरू झाली. यावेळी सौ नुपुर बंगलोरमधे एकटी रहात होती आणि तिची नोकरी करत होती.



**^** श्री साहिल गणपुले



**^** ब्रॉयलर पोल्ट्री फार्म – रोहा

या दांपत्याचे दुसरे धाडस असे की या नव्या व्यवसायासाठी आवश्यक आर्थिक गुंतवणूक स्वतःच्या कमाइतून केली आहे. आवश्यक शेड आणि पूरक सोयी यांचे बांधकाम

पूर्ण होऊन, वर्ष २०१९ च्या मध्यावर, पोल्ट्री फार्मच्या व्यवसायाची सुरुवात झाली. त्यासाठी आवश्यक तंत्राचा अभ्यास साहिलने एक वर्षभर केला होता. या ब्रॉईलर पोल्ट्री फार्ममध्ये दीड ते दोन महीने पक्षांची म्हणजे कोंबड्यांची पैदास केली जाते. ठराविक वय आणि वजन या निकषावर या पक्षांची विक्री केली जाते. पिंजऱ्यांची स्वच्छता करून पुन्हा पैदास सुरू होते. पक्षांचे खाणे – पाणी – स्वच्छता आणि आरोग्य याची दैनंदिन दक्षता घेणे आवश्यक असते. वर्ष २०१९ मध्ये सुरू झालेल्या व्यवसायाला, वर्ष २०२० मार्च पासून कोरोना महामारीचा धक्का सहन करावा लागला. सप्टेंबर २०२१ पर्यन्त या धक्क्यातून आता व्यवसाय सावरला आहे.




^ नुपुर + साहिलचे नवे घर

पोल्ट्री फार्मची प्राथमिक तयारी आणि व्यवसायाची सुरुवात झाल्यानंतर साहिलने आपले **Work from Home** थांबवले आणि नोकरीचा राजीनामा दिला. ऑगस्ट २०२० मध्ये सौ नुपुर बंगलोर सोडून रोह्याला आली आणि त्यांच्या निसर्ग संपन्न जमिनीवर दोघांच्या देखरेखीखाली नव्या घराचे बांधकाम सुरू झाले. सौ नुपुर, ग्रीन बिल्डिंग आर्किटेक्चरची सल्लागार आहे. नुपुर आणि साहिलच्या या साधारण १८०० चौरस फुट घराचे डिझाईन – रचना – बांधकाम, दोन **Metal Container – काँक्रीट** आणि **विटांचे बांधकाम** अशा **Composite** स्वरूपाचे आहे. या **ग्रीन हाऊस** घरासाठी ऐंशी टक्के वीजपुरवठा सौर्यऊर्जा माध्यमांतून होतो. दोन टाक्यांमधे पावसाचे पाणी साठवले आणि वापरले जाते. शौचालये सोडू, रोजच्या वापरलेल्या अन्य पाण्याचा पुनर्वापर, पिण्याशिवाय अन्य कामासाठी योग्य पद्धतीने केला जातो. घराच्या चारीबाजूच्या भिंतींजवळ वाफे करून गोकर्णाचे वेल लावले आहेत. येत्या डिसेंबर महिन्यापर्यन्त हे वेल थेट घराच्या छापरांपर्यंत पोहोचतील आणि घराच्या भिंतींचे अंतर्गत वातानुकूलन नैसर्गिक पद्धतीने, वीज खर्च न करता होईल. पारंपरिक

आणि आधुनिक अशा **Renewable Energy संकल्पनांचा योग्य वापर करून बांधलेले** नुपुर+साहिलचे हे **ग्रीन हाऊस,** आता जवळपासच्या परिसरात मोठे आकर्षण झाले आहे.

घराच्या बाजूच्या तलावात मत्स्य शेती करण्याची तयारी सुरू आहे. आता सौ नुपुरने आपले लक्ष भात आणि भाज्यांच्या शेतीवर केंद्रित केले आहे. भाताच्या शेतीजवळ थोड्या जमिनीवर तुरीची लागवड प्रथमच केली आहे. त्याच्याच बाजूला मिरीची दीडशे झाडे – बांबूची लागवड केली आहे. याची निगराणी फक्त सेंद्रिय खताच्या वापराने केले जाते.. मधमाशी पालनाचे दोनशे बॉक्स, पंजाब – हरियाणा – हिमाचल प्रदेशातील शेतकऱ्यांकडे ठेवले असून त्यातून अकासिआ – जांभूळ – तुळस – विविध फुलांचे एकत्र असा महिन्याला शंभर सव्वाशे किलो **raw honey** सध्या नियमित रोह्याला घरपोच पाठवला जातो आहे. त्यावर प्राथमिक प्रक्रिया करून, असा वेगवेगळ्या प्रतीचा मध घाऊक ग्राहकांना पाठवला जातो.

आता ब्रॉयलर पोल्ट्रीचा व्यवसाय हवा तसा प्रगत होतो आहे. या बरोबरच व्यवसाय विस्तारच्या नव्या संकल्पनांची आखणी सुरू आहे. ब्रॉयलर पोल्ट्रीचा एकच व्यवसाय खूप मोठा करणे किंवा पहिल्या व्यवसायाला जोड देत अन्य व्यवसायांचे नियोजन करणे, आता साहिल समोर असे दोन पर्याय आहेत. देशी जातीच्या कोंबड्यांच्या अंड्यांची पैदास करण्यासाठी सुरुवातीला शंभर कोंबड्यांच्या लेयर पोल्ट्रीच्या व्यवसायाचा विचार सुरू करावा असा विचार चालू आहे. कोकणाच्या हवेला उपयुक्त गायी घेऊन त्यांच्या दुधापासून तूप बनवायची आखणी होते आहे. यातला दुसरा फायदा असा की गायींच्या शेणापासून बायोगॅसची निर्मिती करता येईल आणि स्वतःच्या शेतीला आवश्यक सेंद्रिय खताची गरज भागेल. थोड्या नंतरच्या काळांत, आपल्याच पाणस्थळ जागेचा वापर करून ॲग्रो टुरिझम संकल्पनांचे स्वप्न सौ नुपुर आणि श्री साहिल गणपुले पहात आहेत. त्यांची सर्व स्वप्न नक्की साकार होतील याची खात्री आहे.



**^ डावीकडे साहिलचे वडील श्री चंद्रकांत गणपुले आणि मागे – आई सौ शीलाताई – मधे सौ नुपुरचे वडील श्री रिसबुड आणि मागे सौ रिसबुड उजवीकड श्री साहिल गणपुले आणि मागे सौ नुपुर गणपुले**

सौ नुपुर – श्री साहिल – आई सौ शीलाताई – वडील श्री चंद्रकांत या गणपुले कुटुंबासह सौ नुपुरच्या रिसबुड कुटुंबीयांना शतशत शुभेच्छा...!!

--००--

**आता मी पारल्यात रहात नाही. लेख क्र ११**

# ब्रिलीयन्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स

**आता मी पारल्यात रहात नाही....!..**हे विधान आनंदाचे आहे – अभिमानाचे आहे – उत्साहाचे आहे – प्रगतीचे आहे – उद्यमतेचे आहे – धाडसी आणि खंबीर निर्णयाचे आहे – परिश्रमाचे आहे आणि अर्थातच सिंहावलोकनाचे आहे..!..**आता मी पारल्यात रहात नाही,** असं म्हणणाऱ्या प्रत्येकाच्या, इथल्या आठवणींच्या नाजुक रंगीत रेशमी लडिंचा एकेक धागा आजही तितकाच नाजुक रेशमी आणि रंगीत आहे. मात्र या विधानाच्या पुढे, आपल्या लेखमालेतील प्रत्येक नायक आणि नायिकेने....एक अदृश्य वाक्य आपल्या कर्तुत्वाने जोडले आहे....**आता मी पारल्यात रहात नाही मात्र मी रहाते तिथे – मी रहातो तिथे दुसरे पारले मी वसवले आहे.** उद्यमशीलता – अथक परिश्रम – धाडसी निर्णय – चातुर्य – विवेक – विश्वास – प्रामाणिक स्वच्छ पारदर्शक व्यवहार – समजाप्रती बांधिलकी – आपुलकी –उत्तम जनसंपर्क – विशाल लोकसंग्रह – प्रखर राष्ट्राभिमान....असा आपल्या लेखमालेतील प्रत्येक माजी पारलेकर....आमचा अभिमान आहे..!

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून, या विलेपारले उपनगरात वास्तव्याला आलेले नागरिक, या सकस – उपजाऊ भूमीवर रूजले. दूरदृष्टि आणि सामाजिक बांधिलकी अशा गुणवत्तेने समृद्ध असलेले हे नागरिक प्रज्ञावंत होते. शिक्षण व्यवस्था आणि शाळा – दर्जेदार सहकारी गृहनिर्माण संकुलांची निर्मिती – सामाजिक संस्थांची समजाभिमुख कामे – संगीत, नाटक अशा सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल अशी विलेपारल्यातिल समाजाची परिपूर्ण बांधणी यांनी सुरू केली होती. दूरदृष्टिने – विश्वसाने – काही निश्चित ध्येय-धोरणे समोर ठेऊन आपले कार्य संपन्न करणारी अनेक व्यक्तिमत्व, एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर विलेपारल्यात स्थायिक झाली होती. या उपनगराच्या झालेल्या प्रगतीचे श्रेय, या सर्वांना द्यायला हवे.

भारतीय स्वातंत्र्यानंतर म्हणजे वर्ष १९४७ नंतर जन्माला आलेल्या पिढ्यांना, विलेपारल्याच्या या प्रगतिशील समाजरचनेचा मोठाच फायदा झाला. विलेपारल्यातील मुला – मुलींना शालांत परीक्षेत मिळणारे यश – नाट्य-चित्रपट-संगीत-साहित्य या सर्व क्षेत्रांत

स्थानिक रहिवासी नागरिकांची दीप्तिमान कामगिरी – महिला संघ-उत्कर्ष मंडळ-स्वातंत्र्यवीर सावरकर सेवा केंद्र अशा राष्ट्रीय बाण्याच्या शिक्षण संस्था आणि सामाजिक संस्थांची निर्मिती – विलेपारल्यातील समृद्ध भाजी आणि फळबाजार यांचा विकास, अशा या प्रगतीच्या पूरक – सूचक अनेक घटना विसाव्या शतकाच्या याच मध्यापासून नियमित होत राहिल्या. विलेपारल्यात रहात्या इमारती – शाळा – समजोपयोगी संस्थांची बांधणी झाली, अगदी तशीच उत्तुंग-शतपैलू व्यक्तिमत्व घडवली गेली – समाजोपयोगी कामांचे सिद्धांत निर्माण झाले – ध्येय धोरणे आखली गेली – त्या नितीतून अनेक समाजसेवी प्रकल्प यशस्वी झाले आणि मागून येणाऱ्या पिढीसाठी आदर्शवत म्हणून स्वीकृत झाले.

आजच्या आपल्या लेखाचा नायक याच वर्ष १९५० नंतर जन्मलेल्या पिढीतला आहे.

**Digital Transformation** आणि **Artificial Intelligence (AI)** या माहिती – तंत्रज्ञान उद्योगविश्वातील आधुनिक काळांत विकसित झालेल्या दोन तंत्रविज्ञानात मिळवलेले व्यावसायिक यश, यासाठी तो अमेरिकेतील आघाडीचा उद्योजक आहे. मात्र **Social Ventures** असेही एक संबोधन, त्याने त्याच्या परिचयात वापरलेले आहे. संबोधनाने निर्देशित झालेली त्यांची लोकोपयोगी – समाजाभिमुख कामे पुण्यामध्ये संपन्न झालेली आहेत. या सर्व प्रगतीचा विस्तारीत परिचय करून घेण्याआधी, आपल्या नायकाला कुटुंबवारशानेच मिळालेल्या उद्योजक वृत्तीचा आणि निरपेक्षवृत्तीने स्थापन केलेल्या आणि त्यांच्या पश्चात दीर्घकाळ कार्यरत असलेल्या लोकोपयोगी कार्याचा परिचय प्रथम करून घेऊया.



**<** श्री अरुण श्रीधर जोशी

**आपल्या आजच्या लेखाचा नायक आहे श्री अरुण श्रीधर जोशी.** त्यांचे आजोबा श्री केशव बळवंत जोशी विसाव्या शतकाच्या सुरवतीच्या दशकांतील एक यशस्वी व्यावसायिक होते. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस, श्री केशवराव जोशी, ग्रँटरोडच्या विल्सन महाविद्यालयातून पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले आणि तत्कालीन ब्रिटिश सेक्रेटरीएटमधे त्यांना नोकरी मिळाली. नोकरी करत असतानाच स्वतंत्र व्यवसायाचा विचार प्रभावी होता. वर्ष १९१० मधे त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला आणि स्वतंत्र व्यवसाय सुरू केला आणि समाजसेवेचे कामही सुरू केले. वर्ष १८८२ मधे, मुंबईतील क्रॉफर्ड मार्केटमध्ये विजेच्या दिव्यांची आरास तत्कालीन मुंबईकरांनी  प्रथम पाहिली आणि मुंबईत विजेचे आगमन झाले. १९०५ मधे **Bombay Electric Supply & Tramway Company** म्हणजेच **BEST** ने ट्रॅमवेसाठी इलेक्ट्रिसिटी जनरेशन स्टेशन बांधले. हळूहळू मुंबई शहरांत घरगुती कामासाठी विजेचा वापर सुरू झाला होता.




^ के बी जोशी आयटी कॉलेज, पुणे

ब्रिटिशांच्या राज्यात सेक्रेटरीएट् मध्ये काही काळ नोकरी केलेल्या, पदवीधर श्री केशवराव जोशी यांनी यातिल संधि हेरली आणि वर्ष १९१३ मधे अमेरिकेतील मायर्स इलेक्ट्रिक कंपनीच्या पाण्याच्या पंपाची आयात सुरू करून, भारतातील त्याचा वितरण व्यवस्था व्यवसाय सुरू केला. काहीच वर्षांत तत्कालीन अखंड भारतातील कराचीसह सहा

शहरांत त्यांची कार्यालये स्थापन झाली. त्या काळांत त्यांना **King of Pumps** या संबोधनाने व्यवसाय जगतात गौरवले गेले होते. १७ सप्टेंबर १९२७ रोजी स्थापन झालेल्या **Maharashtra Chamber of Commerce** चे ते सहसंस्थापक आहेत. याबरोबरच त्यांनी काही व्यावसायिक संघटनांची उभारणी केली होती. आपला नायक श्री अरुण जोशी यांनी आपल्या आजोबांच्या स्मरणार्थ **K B Joshi IT Collage** ची स्थापना पुण्यामध्ये वर्ष २००० मधे केली.

अरुणचे वडील श्री श्रीधर केशव जोशी म्हणजे राजाभाऊ हे त्यांच्या काळांत विलेपारल्यातिल क्रियाशील नागरिक होते. वर्ष १९६९ मधे स्थापन झालेली **उत्कर्ष मंडळ** ही संस्था आणि **सोबती** ही जेष्ठ नागरिक संघटना, विलेपारल्याची विशेष ओळख बनल्या आहेत. उत्कर्ष मंडळाचे ते संस्थापक सदस्य होते. राजाभाऊ अमेरिकेत अरुणकडे गेलेले असताना, तिथल्या वरिष्ठ नागरिकांची काळजी घेणाऱ्या संघटनांच्या अनुभवावरून त्यांना **सोबती** या संघटनेची संकल्पना सुचली. त्यांच्या पुढाकाराने सोबती ही जेष्ठ नागरिक संघटना विलेपारल्यात स्थापन झाली.



^अरुणच्या मातोश्री श्रीमती सुधाताई आणि वडील श्री श्रीधर केशव जोशी

वर्ष १९८० च्या दरम्यान, के ई एम आणि सायन हॉस्पिटल यांच्या सहकार्याने, जनकल्याण समितीच्या माध्यमातून राजाभाऊंनी रक्तदान शिबिरांचे आयोजन सुरू केले होते. रजेच्या दिवशी अनेक शाळांतून अशी शिबिरे आयोजित केली गेली होती. पुढच्या दहा वर्षांत राजाभाऊंच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनाने अशी एक हजार रक्तदान शिबिरे यशस्वी झाली. रक्तदानाचे महत्व आणि नागरिकांच्या सहभागासाठी प्रचार आणि प्रसार करणारे अनेक लेख

त्यांनी वर्तमानपत्रात लिहिले. राजाभाऊंच्या या रक्तदान प्रसार कार्यातील अविरत निस्वार्थ समाजसेवेसाठी, त्यांना भारताच्या राष्ट्रपतींच्या पदकाने सन्मानित करण्यात आले.

अरुणच्या मातोश्री श्रीमती सुधाताई, त्याच्यासाठी उत्साह आणि ऊर्जेच्या स्त्रोत होत्या. आपण शिक्षक व्हावे अशी त्यांची तीव्र इच्छा होती. त्यासाठी, पूर्णवेळ नोकरी करत असतांनाही नियमित अभ्यासाने आणि चिकाटीने त्यांनी **BA, B Ed, M Ed** या सर्व परीक्षांत उत्तम यश मिळवले. परीक्षेच्या दोन पेपरांमधील वेळेत, आईचा जेवणाचा डबा सांभाळत परीक्षा केंद्रात वाट पहाण्याच्या त्या क्षणांच्या आठवणी, आजही अरुणच्या मनांत ताज्या आहेत.

आजोबा – आई – वडील यांची अशी प्रभावी व्यक्तिमत्व आणि त्यांच्या उद्यमतेचे – सामाजिक बांधीलकीचे – अभ्यासूवृत्तीचे संस्कार अरुणवर होत होते आणि त्यातूनच त्याचे व्यक्तिमत्व घडत होते. वडिलांच्या सामाजिक कार्यातील प्रत्येक उपक्रमात, अरुणचा सहभाग निश्चित होता. वर्ष १९७७ मधे तो **VJTI** मधून प्रोडक्शन मेकॅनिकल इंजिनीअरिंगची पदवी घेऊन नुकताच गोदरेज कंपनीत नोकरीला लागला होता. तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी राष्ट्रपति श्री फकरुद्दीन अली अहमद यांच्या आध्यादेशाने, २५ जून १९७५ ते २१ मार्च १९७७ या एकवीस महिन्यांच्या काळांत राष्ट्रीय आणीबाणी जाहीर केली होती. आणीबाणीच्या विरोधात अनेक संघटना रस्त्यावर उतरल्या होत्या, अनेक विरोधकांच्या अटकेचे सत्र सुरू होते. रस्त्यावर केलेली निदर्शने, आणीबाणी विरोधात जनजागृती साठी घराघरांत पत्रके वाटणे, तुरुंगात गेलेल्या कार्यकर्त्यांच्या कुटुंबियांसाठी निधीसंकलन असा, गोदरेज कंपनीतील नोकरीची वेळ संपल्यानंतर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्कारांत वाढलेला अरुण, या विरोध आंदोलनात सहभागी झाला होता.

अरुणच्या कुटुंबाचा - त्याच्या विलेपारल्यातील भवतालाचा - त्याच्या शाळेचा आणि त्याच्या रहात्या पारलेश्वर सोसायटीचा परिसर या सर्वाचा परिचय करून घेणे आवश्यक आहे. अरुण विलेपारल्यात रहात होता तोपर्यंत याच भवतालाचा दृश्य – अदृश्य प्रभाव त्याच्यावर निश्चितच होता. शाळेत असतांना अरुण नेहेमीच हुशार विद्यार्थी म्हणून परिचित होता. पारले टिळक विद्यालय या त्याच्या शाळेतील आठवणी सांगतांना अरुण अगदी रंगून जातो. वर्गातील विद्यार्थ्यांमधील निकोप-निरोगी स्पर्धा आणि काही नवीन करण्यासाठी शिक्षकांनी सतत दिलेले प्रोत्साहन, या शाळेतील अनुभवांचे महत्व त्याला नक्कीच माहीत आहे. त्याच्या कुटुंबाचे वास्तव्य पारलेश्वर सोसायटीमधे होते. अनेक इमारतींचे हे संकुल विलेपारल्यातले

एक सांस्कृतिक बेट आहे. समोरच्या इमारतीत रहाणारी, आपल्याच वर्गात शिकणारी एक विद्यार्थिनी, तिच्या घरासमोरच्या कॉमन गॅलरीत फेऱ्या मारत नियमित अभ्यास करत असे. याचा आजही अरुण कौतुकाने उल्लेख करतो. तिचे फेऱ्या मारत अभ्यास करणे मला त्यावेळी प्रेरणा देत होते असे अरुण प्रांजळपणे सांगून टाकतो. बालवयातही दोन-चार मित्र मिळून, मोठ्यांच्या सोबतीशिवाय घरापासून शाळेत चालत जाण्याइतके, विलेपारले त्याकाळांत सुरक्षित होते. उत्तम नागरिक घडवण्यासाठी हे वातावरण पूरक होते. या पारलेश्वर सोसायटीत रहाणारे अनेक रहिवासी, उद्योग-व्यवसाय-साहित्य-शेतकी अशा विविध क्षेत्रांत खूप यशस्वी झाले, असे कौतुकाने सांगावेसे वाटते. त्यातल्या श्रीमती मंगलाताई गोडबोले आणि श्री सचिन पटवर्धन, या दोघांचा परिचय, याच लेखमालेत आपण करून घेतला आहे.

अरुणचा आणि त्याच्या व्यवसाय – उद्योगातील प्रगतीचा - यशाचा परिचय, कुठल्याही वयोगटांतील वाचकासाठी निश्चितच प्रबोधक आणि उद्बोधक आहे. शालांत परीक्षेनंतर अरुण **VJTI** या नामवंत इन्स्टिटट्यूट मधे प्रोडक्शन मेकॅनिकल इंजिनियरिंग पदवी अभ्यासक्रमात दाखल झाला. वडाळ्याला कॉलेजच्या वसतीगृहांत रहात असतांना अरुणने मित्राच्या साथीने जवळच्या परिसरात, नीरा विक्री केंद्र सुरू केली. या छोट्या व्यवसायांत कॉलेजच्या चार वर्षांत थोड्या पैशांची बचत झाली होती. वर्ष १९७६ मधे कॉलेजची वर्ष संपल्यानंतर, त्या केंद्रांवर काम करणाऱ्या नागरिकांच्या नावाने ती केंद्र करून दिली होती. नंतरच्या काळांत अमेरिकेत शिक्षणासाठी गेल्यावर आणि कालांतराने मोठे व्यवसाय उभे करण्याची ती पहिली पायरी होती. कॉलेजनंतर त्याला गोदरेज कंपनीत नोकरी लागली. त्या काही महिन्यांच्या काळांत त्याला शॉपफ्लोअर वरील प्रक्रियांमधे सुधारणा करण्याची संधि मिळाली, त्यासाठी श्री जमशेदजी गोदरेज यांनी पाठीवर कौतुकाची थाप दिली. इथेच त्याला स्वतःच्या नेतृत्वगुणांचा परिचय झाला.

गोदरेजमधील नोकरीनंतर अरुण, वर्ष १९७८ मधे अमेरिकेतील कॅन्सास युनिव्हर्सिटीमध्ये मास्टर्स पदवीचा अभ्यास करण्यासाठी दाखल झाला. त्यावेळी जॉर्जियामधील व्हालदोस्ता परिसरात तो अडीच महीने रहात होता. तिथे राहून त्याने एनसायक्लोपीडिया विक्रेता म्हणून दोन महीने नोकरी केली. याचे खूप फायदे झाले. खांद्यावर पुस्तकांचे जड संच घेऊन उन्हातान्हात व्हालदोस्ता परिसरात फिरतांना, घराघरांत एनसायक्लोपीडिया संच विकता आले आणि काही मित्र जोडता आले. मुख्य म्हणजे दहा

हजार डॉलर किमतीचे संच विकून मिळालेल्या मानधनात, पाचशे डॉलर किमतीची जुनी कार विकत घेता आली. अरुणच्या मते, त्याकाळांत घराघरांतून भेटलेल्या विविध ज्ञाती-पंथांच्या नागरिकांकडून खऱ्या अमेरिकन नागरिकांचा आणि अमेरिकेचा परिचय झाला.

कॅन्सास युनिव्हर्सिटीमधील मास्टर्स पदवी नंतर लगेचच, कॅम्पस इंटरव्ह्यू मधून निवड होऊन अरुण वर्ष १९८० मधे **Intel Corporation** मधे नोकरीसाठी पोर्टलँड फॅसिलिटी मधे दाखल झाला. इथल्या चौदा वर्षांच्या काळांत खूप वेगाने प्रगती करत तो जनरल मॅनेजर अशा अधिकारावर पोहोचला. नोकरीच्या काळांत अनेक देशांमध्ये त्याचा प्रवास झाला. पोर्टोरिको – आयर्लंड – सिंगापूर अशी **Intel** ची तीन ऑफिसेस स्थापन करण्यात त्याचा महत्वाचा सहभाग होता. आयटी क्षेत्रातील जागतिक बाजारपेठेचा अनुभव आणि खूप मोठ्या प्रकल्पांसाठी मनुष्यबळ विकास - व्यवस्थापन - दैनंदिन ऑफिस व्यवहारातील शिस्त....असे अनुभव **Intel** मधील नोकरीच्या काळांत त्याला मिळाले, जे नंतरच्या स्वतंत्र व्यवसायाच्या काळांत त्याला फायदेशीर ठरले. अरुणच्या सिंहावलोकनानुसार, **Intel** चे संस्थापक श्री अँडी ग्रोव यांच्याशी झालेल्या परिचयातूनच, नंतरच्या काळातील स्वतंत्र व्यवसायची उद्योगनीती त्याला आखता आली आहे.

वडाळ्यातील नीरा विक्री केंद्र चालक आणि जॉर्जियामधील एनसायक्लोपीडिया विक्रेता, पोर्टलँड येथेही शांत बसलेला नव्हता. इथल्या स्थानिक भारतीय नागरिकांच्या गरजा त्याला नेमक्या उमजल्या होत्या. **Intel** मधील नोकरीच्या काळांत, पोर्टलँडमधे, वर्ष १९८६ मधे स्वतःचे **India Emporium** हे स्टोअर त्याने स्थापन केले होते. सर्व प्रकारच्या भारतीय वाण सामानाची, किरकोळ आणि घाऊक विक्री त्याने या स्टोअरमधे सुरू केली. याच वर्षापासून अरुण भारतातून बासमती तांदूळ आयात करत होता. हा तांदूळ मोठ्या ट्रकमधून सुपरमार्केटना पाठवला जात असे. ऐंशी – नव्वद या दशकांत त्याने भारतीय भाषातील सिनेमाच्या विडियो कॅसेट या स्टोअर मधे उपलब्ध केल्या. भारतीयांसाठी खास गाण्यांचे कार्यक्रम सादर केले. हे **India Emporium,** स्थानिक भारतीयांना एकत्र भेटण्याचे सांस्कृतिक केंद्रच झाले होते. या स्टोअरमधे त्याने कामाला माणसे ठेवली होती. वर्ष २००१ मधे त्याने हे स्टोअर बंद केले. पुढे वर्ष २०१२ पर्यन्त साधारण सहवीस वर्षे, अरुणने बासमती तांदूळाची आयात केली. आयटी क्षेत्रातील मोठ्या व्यवसायाच्या स्थापने नंतर त्याने हा

आयात व्यापार बंद केला. पोर्टलँडमधील वास्तव्यात बारा मराठी कुटुंबांना एकत्र करून अरुणने मराठी मंडळाची स्थापना केली.



***With Shri. Yashwant Deo 1986***




***With Shri. Yashwant Deo, 2016, Rasiya***

**Intel** मधील नोकरीनंतर साधरण वर्ष १९९५ च्या दरम्यान अरुणने स्वतंत्र उद्योगाचे पाऊल टाकले. आयटी क्षेत्रातील **Software outsourcing & Building large software product platforms** असे या व्यवसायाचे स्वरूप होते. वीस कर्मचाऱ्यांसह सुरू झालेला हा उद्योग अल्पावधीत वेगाने प्रगत झाला आणि कर्मचाऱ्यांची संख्या २५० पर्यन्त वाढली. ओरेगॉन स्टेटच्या प्रमुख उद्योजक संघटनेच्या संचालक मंडळाचा नियुक्त झालेला, अरुण पोर्टलँड मधील पहीला भारतीय उद्योजक सदस्य आहे. वर्ष २००८ मधे त्याने **TiE** म्हणजे **The Indus Entrepreneurs** या अमेरिकेतील भारतीय उद्योजकांच्या संघटनेची **ओरेगॉन स्टेट** शाखा स्थापन केली. **Portland Angle Network** च्या माध्यमातून त्याने ओरेगॉन स्टेट मधील दहा स्टार्ट अप व्यवसायांमधे गुंतवणूक केली. आज अरुण, काही व्यावसायिक आणि ना-नफा तत्वावर कार्य करणाऱ्या संघटनांचा सल्लागार आणि विश्वस्त आहे.



^अमेरिकेचे माजी अध्यक्ष श्री क्लींटन यांच्या पत्नी,

राष्ट्राध्यक्ष निवडणुकीतील उमेदवार श्रीमती हिलरी क्लींटन यांचा समवेत.

आजच्या घडीला स्वतःचे तीन स्टार्ट अप यशस्वी करणाऱ्या अरुणला, स्टार्ट अपचा द्रष्टा संकल्पक म्हणून ओळखले जाते. **VISULON** या आयटी उद्योगाने गेल्या चार वर्षांत खूप मोठी प्रगती केली आहे. **Digital Transformations of the product release and internal sales processes for large consumer brands** असा या उद्योगाचा

थोडक्यात परिचय आहे.



^ बावधन, पुणे येथील **Visulon** ऑफिस बिल्डिंग

**Visulon pioneered Visual Assortment Planning, Data-driven Financial planning, and customer-specific merchandising exclusively for Apparel and Footwear manufacturers to improve sales and marketing efficiencies.** अरुणच्या या आयटी उद्योगाच्या वेबसाईटवर उल्लेख केलेल्या या छोट्या वाक्यात आणि त्याच्या क्लायंट लिस्ट वरुन या उद्योगाचा विस्तार आणि सर्वव्यापी उपस्थितीची गंभीर जाणीव होते. वरच्या फोटोत दिसणाऱ्या ब्रॅंडसह, फॅशन ॲपरल क्लोदिंग, फॅशन ॲकसेसरी आणि फूटवेअर बनवणाऱ्या, जगभर व्यवसाय विस्तार असलेल्या अनेक मोठ्या कंपन्या अरुणच्या **Visulon Solution** चा वापर करत आहेत.


माहिती – तंत्रज्ञान उद्योगाच्या नवनवीन संकल्पनांमुळे, आपल्या दैनंदिन जीवन व्यवहारांचा वेग खूप वाढला आहे. **Big Data, Analytics, Algorithms -** अशा साधनांची वापर, आपल्या व्यवसाय व्यवस्थापनासाठी आणि वृद्धीसाठी, मोठ्या उद्योगांची गरज बनली आहे यांचा नेमका अंदाज आपल्या या प्रज्ञावान उद्योजकाने घेतला. जागतिक आयटी उद्योगात सातत्याने नवीन संकल्पना यशस्वी करणाऱ्या या कीर्तीवंत – यशवंत पारलेकराच्या **Social Ventures** अशा संबोधनाने निर्देशित झालेली त्यांची लोकोपयोगी – समाजाभिमुख

कामे यांचा विचार करतांना या उन्नती – उत्कर्षामागे, आधी विस्ताराने उल्लेख केलेल्या त्याच्या कुटुंब वारशाचा प्रभाव नक्कीच आहे. चाळीस - पन्नास वर्षांपूर्वी अरुणच्या वडिलांनी स्थापन केलेल्या संस्था आणि संघटना यातली त्यांची निरपेक्ष – निगर्वी – समाज संवेदनांची निश्चित जाणीव....या सर्व गुणवत्ता, नेमकेपणाने अरुणच्या **Social Ventures** मधे परावर्तित झालेल्या दिसतात. औदार्य – दातृत्व – प्रखर राष्ट्राभिमान – इतिहास संशोधनाचे महत्व यांची नक्की जाणीव – अत्यंत संवेदनशील चित्त आणि कामसू वृत्ती – निरपेक्ष वृत्तीने समाजासाठी दीर्घकाळ काम करणाऱ्या संस्थांचा नेमका परिचय – निगर्वी मन आणि निस्वार्थ बुद्धी .. .. प्रज्ञावंत अरुणचे व्यक्तिमत्व असे पैलूदार आहे.

तैत्तरिय उपनिषदामधे वैशंपायन ऋषी आणि त्यांचा शिष्य याद्न्यवल्क्य यांच्या संवादात, **कुशाग्रबुद्धी** आणि **तैलबुद्धी** अशा मानवी बुद्धिमत्तेच्या क्षमतेच्या दोन प्रकारांचे वर्णन केले आहे. बुद्धीच्या पातळ कपड्यासारख्या एका पटलाची कल्पना करा. या पटलावर कोट्यावधी सूक्ष्म ज्ञानपेशीमद्धे आपल्या प्रत्येक अभ्यास आणि अनुभवाची नोंद झालेली असते. या पटलाला खालून एका टांचणी सारख्या तीक्ष्ण कुशाचा म्हणजे काट्याचा स्पर्श केल्यावर ते पटल हलकेसे उचलले जाते. त्या सूक्ष्म उंचवट्यावरील ज्ञानपेशींतिल एखाद्या ज्ञानशाखेतील सूक्ष्म संदर्भ ती व्यक्ति सहज शोधू शकते. बुद्धीच्या या क्षमतेला, व्यक्तीची **कुशाग्रबुद्धी** असे संबोधित केले जाते. आता कल्पना करा की पाण्यावर तेलाचा एक छोटासा थेंब पडला तर तो पाण्याच्या संपूर्ण पृष्ठभागावर पटकन पसरतो. अगदी तसाच एखाद्या व्यक्तीचा अभ्यास आणि अनुभव यांचा ज्ञानसंचय, तेलाच्या थेंबासारखा त्याच्या बुद्धीच्या पटलावर व्यापलेला असतो. असंख्य ज्ञानशाखांचा पूर्ण स्थूल अभ्यास, या बुद्धीच्या क्षमतेला, व्यक्तीची **तैलबुद्धी** असे संबोधित केले जाते.

बुद्धिमत्तेच्या या दोन प्रकारांचे वर्णन, श्री अरुण जोशींच्या परिचयात करण्याचे काही निश्चित प्रयोजन आहे. शैक्षणिक कारकीर्द आणि आयटी उद्योगातील अनुभवाचे वैविध्य यांचा स्थूल अभ्यास आणि त्याच वेळी त्याच्या समाजोपयोगी प्रकल्पांतील नावीन्य आणि वैविध्य, ही अरुणची **तैलबुद्धी** क्षमता आहे. या स्थूल अभ्यासातून त्याने नेमकेपणाने शोधलेली आयटी **Solutions** आणि त्याचे यश या बरोबरच, समाजोपयोगी प्रकल्पांतील कामांची योग्य निवड आणि त्याच्या सूक्ष्म तपशीलाची मांडणी आणि निर्मिती, ही अरुणची **कुशाग्रबुद्धी** क्षमता आहे.




^ के बी जोशी कॉलेज कॅम्पस सभागृह आणि ताम्रपट

वर्ष २००० मधे अरुणने, महर्षि कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेसाठी, के बी जोशी आयटी कॉलेज स्थापन केले. आपल्या आजोबांच्या स्मरणार्थ केलेली ही निव्वळ चेकबूक चॅरिटी नव्हती. अमेरिकेतील आयटी क्षेत्राचा आणि शिक्षण संस्थांचा विशाल अनुभव, यामुळे अरुणने या कॉलेजची नेमकी संकल्पना स्वतः आखली. इमारतीच्या दीर्घकालीन **Utility Value** चा दूरदृष्टिने विचार करून, अनुभवी आर्किटेक्टकडून प्रथम स्वतःच्या यापेक्षेप्रमाणे डिझाईन बनवून घेतले. कॉलेजची इमारत स्वतः बांधून त्यातील ३५ कॉम्प्युटर आणि सर्व लायसेन्स .. आणि २०० आसनांच ऑडिटोरियम अशा आणि अन्य प्राथमिक, आधुनिक सोयी – सुविधा पूर्ण केल्या आणि मगच ही इमारत, महर्षि कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या स्वाधीन केली. यासाठी अरुणची पुण्यात रहाणारी धाकटी बहीण सौ स्मिता सुदामे हिचे खूप सहकार्य मिळाले होते. आता अरुण या कॉलेजचा सल्लागार-मार्गदर्शक असला तरी संचालक संस्था पूर्ण स्वतंत्र आणि स्वायत्त आहे. **हा जनसेवेचा शैक्षणिक प्रकल्प आणि त्याची पूर्तता, अरुणच्या कुशाग्र आणि तैलबुद्धीचा निर्देशक आहे.**

रक्तदान चळवळीत अरुणच्या वडिलांचे योगदान फार मोठे होते. वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्याने, पुण्यातील **जनकल्याण रक्तपेढी या संस्थेला, सीरम आणि प्लाझमा अनॅलिसिस आणि सेपरेशन** यासाठी आर्थिक मदत केली आहे. अशा अन्य दोन समाजोपयोगी प्रकल्पांना अरुणने आर्थिक मदत केली आहे.




^ भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, सन्मान, विजयादशमी, १५ ऑक्टोबर, २०२१

यावर्षीच्या विजयादशमीच्या मुहूर्तावर, पुण्यातील **भारत इतिहास संशोधक मंडळ** या ११५ वर्ष जुन्या नामवंत संस्थेच्या, इतिहासाचार्य राजवाडे सभागृहाच्या नूतनीकरणाच्या कामाचा, पद्मविभूषण महाराष्ट्रभूषण माननीय श्री बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते शुभारंभ झाला. ही **Heritage Structure** किंवा पुरातन वारसा इमारत असल्याने याचे नूतनीकरण एका विशेष पद्धतीने होणार आहे. जवळपास गेली दोन वर्षे मंडळाच्या संचलकां बरोबर याविषयी अरुणची चर्चा होत होती. या प्रकल्पासाठी अरुणने स्वयंसिद्ध तत्वावर (एकट्याने) पूर्ण आर्थिक देणगी दिली आहे. व्यवसायानिमित्ताने अरुणने आज पर्यन्त साधारण चाळीस देशांमधे प्रवास केला आहे. या प्रत्येक देशांतील म्युझियमना त्याने आग्रहाने भेटी दिल्या आहेत. त्याती निरीक्षणावरून आणि संस्थेच्या कामातील आस्थेमुळे, अरुणने, अनुभवी आर्किटेक्टच्या सल्याने, या **Social Venture** ची तपशीलवार मांडणी केली आहे.




< भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, सन्मान, विजयादशमी, १५ ऑक्टोबर, २०२१

या सर्व समाजोपयोगी प्रकल्पांसाठी अरुणने दिलेल्या देणग्या फार मोठ्या रकमांच्या आहेत. त्या देणग्यांचे मूल्य किती याचा उल्लेख या लेखांत जाणीवपूर्वक टाळला आहे. या प्रत्येक प्रकल्पातील अरुणची आस्था आणि बांधिलकी कशी आणि किती आहे याची जाणीव वाचकांना निश्चितपणे झाली असेल. मायदेश फाउंडेशन या त्याच्या **Non-profit making Company** च्या माध्यमातून अरुण या लोकोपयोगी प्रकल्पांना आर्थिक मदत करत असतो.

मुंबईतील तरुणाईच्या दिवासात, त्यानंतर अमेरिकेतील वास्तव्यात, अरुणचे सामाजिक सांस्कृतिक उपक्रम नियमित होत होते. त्याचा लोकसंग्रह मोठा आणि अर्थातच नियमित जनसंपर्क हे अरुणच्या व्यक्तिमत्वाचे एकखास वैशिष्ट्य आहे. दोन तीन वर्षांपूर्वी अरुणने, श्री सुबोध भावे आणि श्री मोहन जोशी अभिनीत, **पुष्पक विमान** आणि **आटपाडी नाईट्स** या दोन चित्रपटांची निर्मिती केली होती. पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्यावरील चरित्रपटाचा पुढचं प्रकल्प आता आकार घेतो आहे. शास्त्रीय – उपशास्त्रीय – भावगीते – अभंग हे अरुणचे संगीतातले विशेष आवडीचे प्रकार आहेत. **RagaNXT** या शास्त्रीय संगीत संवर्धन प्रकल्पात, नवे गायक – नवे वादक – नवे गीतकार यांना घेऊन शंभर अल्बम बनविण्याचा अरुणचा संकल्प आहे. अगदी अलीकडे यातिल चाळीस अल्बम प्रकाशित झाले आहेत. कै नरेंद्र भिडे आणि पंडित हेमंत पेंडसे या नामवंत संगीतकाराच्या संगीत दिग्दर्शनाने उपशास्त्रीय संगीतातील अठरा नव्या गायक कलावंतांसह **रसिया** या स्टेज शोची निर्मिती वर्ष २०१६ मधे आणि कृष्णांजली या स्टेज शोची निर्मिती वर्ष २०१८ मधे झाली आहे. डॉ सलिल कुलकर्णी या नामवंत संगीतकाराचचे दोन अल्बम प्रकाशित झाले आहेत. शरयू दाते, प्रथमेश लघाटे, राधिका ताम्हनकर या नव्या पिढीतील तरुण गुणी गायकांचे नवे अल्बम काहीच काळांत

प्रकाशित होतील. हे सर्व **Social Venture** स्वरूपाचे उपक्रम, निरपेक्ष धारणेने भारतीय संगीताच्या आस्था आणि प्रेमा पोटी होत आहेत. **RagaNXT** च्या वेबसाइटवर सर्व अल्बम उपलब्ध आहेत.



< वेळास कासव महोत्सव

कोकणातील मंडणगड तालुक्यातील **वेळास** हे अरुणच्या जोशी कुटुंबाचे मूळ गांव. या गावातील समुद्रकिनाऱ्यावरचा कासव महोत्सव लोकप्रिय आहे. इथल्या पर्यटन व्यवसायाच्या वृद्धीसाठी अरुण प्रयत्नशील आहे. संगीताच्या कार्यक्रमासाठी पुण्यात एक मर्यादित आसनांचे सभागृह असावे असे उद्दिष्ट अरुणसमोर आहे. आपल्या समाजाचे ऋण अल्पप्रमाणात फेडण्याची अरुणची कार्यशैली अनुकरणीय आहे.




^ श्री अरुण श्रीधर जोशी एका व्याखानात

अरुणची मोठी मुलगी शिल्पा, हारवर्ड युनिव्हार्सिटीमधे **Public Policy** या विषयात मास्टर्स डिग्रीचा अभ्यास करते आहे. ओरेगॉन स्टेट मधे, खूप तरुण वयात तिने गेली सहा वर्षे **Deteriorating Climate & Environment** या संदर्भात पुढाकार घेऊन, समाजात जाणीव जागृतीचे काम केले आहे. अरुणची धाकटी मुलगी लिना, हिने गेल्या वर्षी **Berkeley University** मधून आपला मास्टर्स डिग्रीचा अभ्यास पूर्ण केला आहे. साहित्य आणि दृकश्राव्य चित्रीकरण या विषयात सध्या लिना कार्यरत आहे.

उद्योग – व्यवसायातील व्यस्त दिनक्रमात सर्व व्यवधाने सांभाळून, वर्ष २००२ – ०४ मधे अरुणने **Berkeley University** मधून **Executive MBA** पदवी प्राप्त केली. सध्या **University of Pennsylvania** मधे, **Advance Analytics & Artificial Intelligence** या विषयात एक वर्षाचा **Post Graduate** अभ्यासक्रम तो पूर्ण करतो आहे. सतत नव्याचा अभ्यास, ही या प्रज्ञावंतांची नियमित गरज आहे.

**आता मी पारल्यात रहात नाही** या लेखमालेसाठी, श्री अरुण जोशी यांच्या कर्तुत्व आणि कारकीर्दीचा विस्तारीत परिचय, **गर्जे मराठीचे** श्री आनंद गानु यांनी मला प्रथम पाठवला होता. **चिंता करतो विश्वाची अशा श्री आनंद गानु यांचा** आणि **गर्जे मराठी वैश्विक उपक्रमाचा** परिचय आपण या लेखमालेत करून घेतला आहे. **गर्जे मराठी या वैश्विक उपक्रमात श्री अरुण जोशी यांचा, सल्लागार आणि मार्गदर्शक म्हणून फार मोठा सहभाग आहे.**

**या प्रज्ञावंत – कीर्तीवंत – यशवंत पारलेकराला आणि सर्व कुटुंबीयांना, भविष्यातील उद्योगांसह दीपावलीच्या शतशत शुभेच्छा...!**

--००--

**आता मी पारल्यात रहात नाही. लेख क्र १२**

# पारल्यातली स्कॉलर ते कॅनडातली सायंटिस्ट एमेरिटस्

**आता मी पारल्यात रहात नाही .. ..** या लेखमालेतला हा शेवटचा लेख. आता पारला सोडून, देश-परदेशात अन्य ठिकाणी स्थाईक झालेल्या, मूळ विलेपारल्याचे रहिवासी असलेल्या यशस्वी नागरिकांचा परिचय, जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२१ अशा बारा महिन्यांतील बारा लेखांमध्ये आपण करून घेतला. हॉटेल – रेस्टॉरंट - कॉफी शॉप - आइसक्रीम पार्लर - बेकरीउत्पादने - केटरिंग सर्व्हिसेस – इलेक्ट्रोप्लेटिंग - पाण्याच्या मोठ्या प्लॅस्टिक टाक्या – यंत्रनिर्मिती - शेतकी सल्लागार आणि शेतकी व्यवसाय – साहित्य – वाङ्मय – रंगभूमि - बांधकाम व्यवसाय – कुक्कुटपालन - आंतरराष्ट्रीय आय टीउद्योग - जेनेटिक म्युटेशन आणि कॅन्सर संशोधन अशा विविध क्षेत्रांत शिक्षण घेऊन प्रगती करणारे, यशवंत – कीर्तीवंत झालेले हे सगळे आपले पारलेकर आहेत. यातल्या प्रत्येकाचे आपापल्या क्षेत्रातील कार्य, आकाशाला गवसणी घालणारे आहे. त्यांचे यश दिमाखदार आहे आणि अनेक सन्मानांनि अलंकृत आहे. उद्योग –व्यवसाय करू पहाणाऱ्या तरुण पिढीतील प्रत्येकाने यांचे आदर्श धारण करावे, इतके हे कार्य आणि यश दोन्हीही पथदर्शक आहे.

प्रखर बुद्धी आणि अभ्यासू वृत्ती – शिस्तबद्ध, नियमित, वक्तशीर, प्रामाणिक व्यवहार – निश्चित ध्येय धारणा – नाविन्याची उत्सुकता – घट्ट वीण असलेली कुटुंब व्यवस्था आणि राष्ट्रनिष्ठा .. .. आपल्या लेखमालेतील नायक-नायिकांच्या व्यक्तिमत्वाच्या या समानधर्मी गुणवत्ता आहेत. सामाजिक बांधिलकी - औदार्य – वाचनाची आवड – राजकीय आणि सांस्कृतिक घडामोडींची निश्चित जाणीव.. .. या समृद्ध समाज जीवनामुळे प्राप्त झालेल्या प्रत्येक पारलेकराच्या अंगभूत गुणवत्ता .. .. यामुळे घडलेली यांची समृद्ध व्यक्तिमत्व, यातल्या प्रत्येकाच्या यशामधून प्रतीत होत रहातात.

पारले टिळक विद्यालयातली वर्ष १९७२ मधे शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेली चि भारती आपटे, विवाहपश्चात डॉ भारती बापट, ही आजच्या आपल्या लेखाची नायिका अगदी अशीच पारलेकर आहे. तिची दीर्घ आणि वैविध्यपूर्ण शैक्षणिक कारकीर्द – विवाहानंतर कॅनडात स्थायीक झाल्यानंतर, तिथल्या निसर्गाच्या प्रेमात पडलेल्या तिची, ऊर्जा आणि कामाप्रति

उत्सुकता, नव्या समाजाशी आणि नव्या सहकाऱ्यांशी जुळवून घेऊन त्यातलीच एक होण्याचे तिचे अथक प्रयत्न आणि तिच्या क्षेत्रांत कॅनडा या देशाचे प्रतिनिधित्व करतांना तिला मिळालेली कीर्ती.. ..हे सगळंच यश कौतुकास्पद आहे, अचंबित करणारं आहे.



**^** भारतीचे वडील श्री विश्वनाथ आपटे आणि आई सौ प्रभावती

जगप्रसिद्ध **पारले जी** ही बिस्किटे अगदी सुरुवातीला जिथे बनत असंत त्या परिसराला आजही, **बिस्किट फॅक्टरी** अशा नावाने आम्ही पारलेकर ओळखतो. अगदी अलिकडेपर्यंत, या बिस्किट फॅक्टरीत आठवड्यातील दोन किंवा तीन दिवस, **पारले जी** ही बिस्किटे बनवली जात असंत. त्या दिवशी या बिस्किटांचा हवाहवासा स्वाद आणि सुगंध, आम्हा पारलेकरांचे पर्यावरण भारून टाकत असे. नव्याने पारल्यात आलेल्या पाहुण्यानां हा बिस्किटांचा स्वाद आणि सुगंध, अनोखा अनुभव असे. याच **पारले जी बिस्किट फॅक्टरीच्या** अगदी शेजारी असलेल्या विष्णुप्रसाद सोसायटीत डॉ भारतीचे कुटुंब रहात असे. **पारले जी** हे उदाहरण अशासाठी की डॉ भारतीच्या **जेनेटिक म्युटेशन आणि कॅन्सर संशोधन** क्षेत्रातिल कार्याचा आणि यशाचा परिचय असाच पाची खंडात दरवळतो आहे.



< कु भारती आपटे

मागे पुढे मोठे अंगण असलेल्या या निवासी संकुलातील चार इमारतीत, खूप साऱ्या समवयस्क सवंगड्यासोबत लगोरी – लपंडाव खेळताना सहजिवनाचा अनुभव घेत घेत, भारतीचे भावविश्व संपन्न झाले होते. चवथी इयत्ता – सातवी इयत्ता आणि शालांत परीक्षेनंतर नॅशनल स्कॉलरशिप अशा सर्व शिष्यवृत्त्या मिळवणारी, शाळेत एक हुशार विद्यार्थिनी म्हणून शिक्षकांची लाडकी असलेली भारती, सबनीस सर आणि सहस्रबुद्धे सर या दोन शिक्षकांच्या आठवणी सांगताना परत भूतकाळात रमते. शाळेतील त्या आठवणी सांगताना तिने अनुभवलेली शिक्षकांच्या मनातील विद्यार्थ्यांप्रति असलेली आपुलकी – जिव्हाळा आणि तिचे हरखून जाणे असा कुमार – किशोर वयांतील विलेपारल्यातील वास्तव्यतील तिचा भवताल असा समृद्ध होता.

एक मोठी बहीण आणि दोन भाऊ या भावंडातली भारती सर्वात लहान. आईच्या प्रोत्साहनामुळे पहिल्या इयत्तेतच तिची कथक नृत्याची तालिम सुरू झाली होती. शाळेतल्या सर्व सांस्कृतिक कार्यक्रमात आणि वक्तृत्व स्पर्धांमध्ये भारतीचा नियमित सहभाग असे. वर्ष १९७२ मधे शालांत परीक्षा (त्यावेळची अकरावी) उत्तीर्ण झाल्यानंतर भारती कॉलेजमधे दाखल झाली. मायक्रोबायालॉजि विषय घेऊन ती बी एससी पदवी परीक्षा, वर्ष १९७६ मध्ये प्रथम वर्गात उत्तीर्ण झाली. आता पुढील शिक्षणाची तयारी आणि त्यासाठी विचारमंथन सुरू झाले.

डॉ जगन्नाथ गोविंद काणे हे विद्वान गृहस्थ त्याकाळात **UDCT** या नामवंत शिक्षण संस्थेत प्राध्यापक आणि डायरेक्टर होते. परदेशी विद्यापीठात शिकून **Ph D** प्राप्त झालेले डॉ काणे हे आपल्या भारतीचे मामा. मामांच्या ज्ञानसाधनेचा – प्रखर बुद्धिमत्तेचा – विद्यार्थीप्रिय शिक्षक आणि देवमाणूस या त्यांच्या प्रतिमेचा, सौम्य व्यक्तिमत्वाचा आणि शास्त्रज्ञ म्हणून परिचित असले तरी त्यांच्या साध्या दैनंदिन जीवनशैलीचा प्रभाव, अगदी बालवयातच भारतीला आदर्शवत वाटत होता. डॉ काणे यांना आणि भारतीच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती. या दोघांच्या प्रभावाने तिला वाचनाची गोडी लागली आणि पारल्यातील लोकमान्य सेवा संघाच्या श्री वा फाटक ग्रंथसंग्रहलयाने तिची वाचन संस्कृति, संपन्न आणि समृद्ध केली. या ग्रंथसंग्रहालयाच्या बालवयातील आठवणीने, चाळीस – पंचेचाळीस वर्षानंतर सुद्धा डॉ भारती प्रसन्न होते. विलेपारल्यातील सांस्कृतिक जीवन, वाङमय – साहित्य – संगीत – नाटके – व्याख्याने अशा नियमित होणाऱ्या कार्यक्रमांनी समृद्ध होते. भारती म्हणते .... **"किशोर – कुमार– तरुण वयातिल माझ्या या अनुभवांनी माझे व्यक्तिमत्व घडवले आहे. विलेपारल्यात झालेली अशी सांस्कृतिक जडण – घडण, हा जणू माझा नकळत मिळालेला निसर्गदत्त वारसाच असे म्हणायला हवे".**



**<** कु भारती आपटे

**UDCT** चे (आताचे **ICT: Institute of Chemical Technology**) वरिष्ठ संचालक असलेले डॉ काणे, **Soap and Oil** या विषयातिल शास्त्रज्ञ होते आणि त्या काळांत उद्योग जगतातील अनेक नामवंत आंतरराष्ट्रीय उद्योगांचे सल्लागार होते. आजही डॉ काणे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ वार्षिक व्याख्यानाचे आयोजन **UDCT** तर्फे केले जाते. मामांच्या व्यक्तिमत्वाचा जसा प्रभाव होता तसाच त्यांच्या शैक्षणिक पार्श्वभूमीचा आणि शिक्षणक्षेत्रातील कार्याचाही मोठा

प्रभाव भारतीवर होताच. मामांसारखंच आपल्याला खूप शिकायचं आहे आणि जगभर प्रवास करायचा आहे अशी दोन स्वप्न भारती पहात होती. पुढील शिक्षणासाठी भारतीने **UDCT** मधे प्रवेश घेतला. प्रोफेसर डी व्ही ताम्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली **Foods and Fermentation Technology** या विषयात ती **Masters Degree** परीक्षा उत्तीर्ण झाली. **UDCT**मधील शिक्षणाच्या काळांत, सामाजिक विषयांवर जाणीव – जागृती करणाऱ्या मित्र – मैत्रिणींच्या संस्थेमधे पथनाट्य सादर करण्यात तिचा विशेष सहभाग असे. नंतरच्या काळातील परदेशातील दीर्घ वास्तव्यात, भारतीच्या या जाणिवा आणि हे अनुभव यामुळे, समाजाप्रति तिचा दृष्टिकोन संवेदनशील राहिला. घरातून स्वावलंबनाचे धडे मिळाल्यामुळे या काळांत भारतीने सायन्स आणि मॅथ्स या विषयात शालेय विद्यार्थ्यांसाठी शिकवण्याही घेतल्या. कॅनडातील वास्तव्यात काही काळ शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी एकटे रहावे लागले होते. त्यावेळी या स्वावलंबनाचा खूप फायदा झाला.

< UDCT अर्थात आताची ICT

एम् एस्सी पर्यंतचा शिक्षणाचा प्रवास, सूक्ष्मजीवशास्त्र म्हणजेच **Microbiology** या मुख्य विषयांत झाला होता. यांच पायावर आता तिला पुढचे शिक्षण घ्यायचे होते. **Reproductive Biology** चा **PhD** चा अभ्यास करण्यासाठी तिने **Institute for Research and Reproduction**, या मुंबई विद्यापीठाच्या शाखेत प्रवेश घेतला. **Post implantation changes using animal models** हा भारतीच्या **Ph D** च्या अभ्यासाचा मुख्य विषय होता. **Ph D** चा अभ्यास सुरू असतानाच, वर्ष सप्टेंबर १९८२ मधे श्री विनीत बापट यांच्याशी भारतीचा विवाह झाला आणि व्हीसाचे उपचार पूर्ण झाल्यावर, वर्ष १९८३ च्या एप्रिल महिन्यात भारती कॅनडाला आपल्या सासरी गेली. प्रॅक्टिकल पूर्ण झाली असली तरी कॅनडामध्ये गेल्यानंतरही तिचा थिसिस अपूर्ण होता. तिचे गाईड डॉ ए आर शेठ यांच्या

सल्यानुसार, कॅनडात आल्यावर तिने तिचा थिसिस पूर्ण केला. वर्ष १९८४ – ८५ मधे भारतात आली असताना तिची व्हायवा मुलाखत झाली आणि तिला **Ph D** पदवीने सन्मानित केले गेले. आता ती **डॉ भारती बापट** झाली होती.

पारल्यातील निवासी संकुलातील सवंगड्यांसह बाळपणीचे लगोरी-लपंडाव असोत, परदेशी स्थायीक झाल्यानंतर तिथल्या समाजातील जगभरातून आलेले परिचित – अपरिचित नागरिक असोत, सण-समारंभ असोत, रोज नव्याने दिसणारा पण रंग बदलणारा तोच निसर्ग असो, नव्या पाककृती आणि नव्या आहार संस्कृतीतील रसना कौशल्य असो, देशविदेशातील नव्या ठिकाणांना भेटी असोत .. ..अशा प्रत्येक अनुभवात आणि कार्यक्रमात मनापासून सहभागी व्हायचे आणि प्रत्येक ठिकाणी आनंदाची देवाण घेवाण करायची हा डॉ भारतीचा स्थायी भाव आहे.



**<** सौ भारती आणि श्री विनीत बापट.

डॉ भारतीचे पती श्री विनीत बापट यांचा जन्म दक्षिणपूर्व आफ्रिकेतील मलावी या देशात झाला. त्यांचे वडील डॉक्टर होते आणि भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या काळांत ते आफ्रिकेत स्थायीक झाले होते. श्री विनीत यांचे पूर्ण शिक्षण भारताबाहेर इंग्लिश माध्यमात झाले होते तरी मराठी लिहिण्याचा आणि बोलण्याचा त्यांना सराव आहे. भारती कॅनडात आल्यानंतर तिथल्या समाजाचा, स्थानिक संस्कृतीचा, परिधान, आहार, रसना संस्कृतीचा आणि हवामानाचा परिचय श्री विनीत यांनी करून दिला. आजही त्या सर्व आठवणींचे ती भरभरून कौतुक करते.

विवाहानंतर डॉ भारती न्यू ब्रुनस्वीक विभागातील मंक्टन या छोट्याशा गावात रहायला आली. या गावात काही भारतीय कुटुंब रहात होती. उत्साही भारती या समाजाच्या आनंदात सहभागी झाली आणि तिने नृत्य – नाट्य यावर आधारित अनेक भारतीय सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. कॅनडातील स्थायीक अन्य भारतीय नागरिकांच्या संस्थांकडून असे कार्यक्रम सादर करण्यासाठी तिच्या मंडळाला आमंत्रित केले जात असे. बघताबघता डॉ भारती, कॅनडियन समाजाची आणि यथावकाश आंतरराष्ट्रीय जेनेटिक आणि कर्करोग या विषयांत संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञ गटाची अग्रणी सदस्य झाली.

डॉ भारतीने प्रगत अभ्यासासाठी निवडलेल्या **Reproductive Biology** या ज्ञानशाखे संदर्भात काही उल्लेख करणे आवश्यक आहे. याच काळांत, **मानव आणि अन्य सजीवांची कृत्रिम गर्भधारणा** याचा अभ्यास करण्यासाठी विविध प्रकारचे संशोधन, जगभरात सुरू झाले होते. अगदी प्राथमिक संशोधनात या प्रयोगासाठी प्राण्यांचा वापर केला गेला होता. इंग्लंडमधे **In vitro fertilization** म्हणजे **Assisted reproductive Biology** अर्थात कृत्रिम गर्भधारणेचे प्रयोग यशस्वी झाले होते. २५ जुलै, १९७८ या दिवशी लुईस जॉय ब्राऊन या पहिल्या टेस्ट ट्यूब बेबीचा जन्म इंग्लंडमधे झाला होता. मात्र विरोधाभास असा की अगदी याच काळांत भारतामध्ये **हम दो हमारे दो** या सरकारी धोरणानुसार, संततिनियमन आणि गर्भनिरोधक उपाययोजना करण्यासाठी प्रसिद्धी तंत्राचा वापर जनजागृती केली गेली होती. या सर्व जागतिक संशोधन पर्वाची आणि त्यातील स्थित्यंतराची, डॉ भारती साक्षीदार आहे आणि नंतरच्या काळांत ती यात सहभागी झाली आहे.

**^ The Human Genome Project Logo**

**Ph D** चा अभ्यास पूर्ण होऊन पदवी प्राप्त झाल्यानंतर, कॅनडातील नोव्हा स्कॉशिया येथील डलहौसी युनिव्हार्सिटी मधे बायोकेमिस्ट्री विभागात डॉ भारतीने **Post Doctoral** अभ्यासक्रम पूर्ण केला. **The role of Anti-Estrogen Binding sites in the anti tumor drug Tamoxifen treatment** हा तिच्या संशोधनाचा विषय होता.

साधारण वर्ष १९८५ – ८६ मधे, श्री विनीत यांनी वेगळी नोकरी घेताली आणि डॉ भारतीसह ते कॅनडामधील टोरांटो शहरात, रहायला आले. इथे तिला **Hospital for Sick Children** या लहान मुलांच्या व्याधी आणि असाध्य रोगांवर उपचार करणाऱ्या जगप्रसिद्ध हॉस्पिटल मधे दुसरी **Post Doctoral Fellowship** करण्याची संधी मिळाली. **Genetic** आणि **Metabolic** या दोन विषयांत, **Tay-sachs and Sandhoff** या लहान मुलांत आढळणाऱ्या दोन अनुवंशिक रोगांवर संशोधन करणाऱ्या लॅबोरेटरी मधे तिचा अभ्यास सुरू झाला. **कॅन्सर व्याधीचा प्रादुर्भाव करू शकणाऱ्या DNA Marker चे संशोधन आणि विश्लेषण हा या अभ्यासक्रमातील तिचा मुख्य विषय होता.** याचवेळी कॅनडियन सरकारतर्फे **Molecular Genetics** या विषयांत **Post Doctoral Training Fellowship Award** यात तिला प्रवेश मिळाला. इथेच डॉ भारतीच्या **Genetic Research** आणि **Cancer Research** या दोन अभ्यासाच्या दोन विषयांची सांगड घातली गेली. पुढची दोन वर्षे **Molecular Genetics Diagnostic Laboratory** मध्ये तिने हा **Training Programme** पूर्ण केला. याच दरम्यान वर्ष १९८९ मधे त्यांची मुलगी चि कविताचा जन्म झाला. बाळंतपणातील ती चार – सहा महिन्यांची रजा संपल्यानंतर, तिने उर्वरित **Training Programme** पूर्ण केला. या अभ्यासक्रमात तिला संशोधनासाठी स्वतःचा विषय निवडीचे स्वातंत्र्य होते. तिने **Cancer Genetics** हा विषय निवडला होता. हा **Post Doctoral Fellowship Training Programme** यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर, वर्ष १९९० पासून डॉ भारतीच्या संशोधन कार्याला निश्चित दिशा मिळाली.

हा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर डॉ भारती, माऊंट साईनाय **(Mount Sinai)** या हॉस्पिटलमधे क्लिनिशियन सायंटिस्ट आणि लेक्चरर म्हणून दाखल झाली. इथे डॉ भारतीच्या संशोधनाचा विषय होता **अनुवंशिक कोलोन कॅन्सर** म्हणजे **पोटाचा कर्करोग**. कॅनडासह पाश्चिमात्य देशांत या दुर्मिळ कर्करोगाचे रुग्ण आहेत. पालकांच्या **DNA** मधून

अथवा धूम्रपानाचे व्यसन आणि कुपोषण अशा कारणानेही पोटाचा कर्करोग होऊ शकतो. या व्याधीवरील डॉ भारतीच्या संशोधनाचे महत्व असे की अशा अनुवंशिक व्याधीग्रस्त रुग्णाच्या अन्य नातेवाईकांचे **Predictive Genetic or Diagnostic test** या स्वरूपाची परीक्षा करून, एखाद्या व्यक्तीच्या अगदी दहाव्या आणि बाराव्या वर्षी, त्याच्या आरोग्याला भविष्यात होणाऱ्या व्याधीची कल्पना येऊ शकते. यामुळे **Early Intervention** स्वरूपाचे उपचार, या पोटाच्या कर्करोगाचा भविष्यातील प्रादुर्भाव टाळण्यासाठी करता येतात. जगभरातिल या व्याधीने ग्रस्त रुग्णांची नोंद अनेक देशांत घेतली जात होती आणि या नोंदीची संघटित स्वरूपांत एका कॉन्सोर्टियमतर्फे  देवाण घेवाण सुरू झाली होती. या कॉन्सोर्टियमच्या माध्यमातून डॉ भारतीने आपले संशोधन रुग्णांना उपलब्ध करून दिले. या **Molecular Genetics** विषयातिल अनेक आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात कॅनडा देशाचे प्रतिनिधित्व केले.

डॉ भारतीच्या कॅनडामधील संशोधन कार्यकाळात **The Human Genome Project** या जागतिक पातळीवरील संशोधन प्रकल्पाची सुरुवात वर्ष १९९० मधे झाली होती. **National Institute of Health** आणि **United States Department of Energy** या अमेरिकन सरकारच्या विभागातर्फे सुरू झालेल्या प्रकल्पात, अनेक देश सहभागी झाले होते. डॉ भारतीने या विषयातील अनेक चर्चासत्रात, कॅनडा देशाचे प्रतिनिधित्व केले आहे. वर्ष २००३ पर्यंत सुरू असलेल्या या आंतरराष्ट्रीय प्रकल्पाची प्रगती – विकास – उपयोगिता – जगभरातील नामवंत संस्थांचा वाढता सहभाग,  याची डॉ भारती सहभागी साक्षीदार आहे.

लेक्चरर – असिस्टंट प्रोफेसर – असोसिएट प्रोफेसर अशा चढत्या क्रमाने वर्ष २००७ मधे डॉ भारती टोरांटो युनिव्हार्सिटि मधे प्रोफेसर झाली. याकाळांत स्वतःच्या लॅबोरेटरीमधे या विषयांत अभ्यास करणारे विद्यार्थी स्वीकारायला सुरुवात केली.  हे सर्व विद्यार्थी **Masters degree and Doctoral degree students, post-doctoral fellows, Medical resident trainees** अशा पदवीप्राप्तीनंतर, डॉ भारतीच्या मार्गदर्शनाखाली,  प्रगत अभ्यास करणारे विद्यार्थी होते. डॉ भारतीच्या संशोधनाची सुरुवातीची साधरण पंधरा वर्षे, **Cancer Genetics with special Focus on Inherited Colon Cancer** या विषयावर केंद्रित झाली होती. या विषयांत डॉ भारती आता जागतिक स्तरावर अधिकारी संशोधक शास्त्रज्ञ म्हणून सर्वमान्य झाली होती. याचवेळी तिने माऊंट साईनाय हॉस्पिटल मधे, **Genetic**

**Testing Programme for Colon Cancer** हा कर्करोग निदान करणारा कार्यक्रम निर्माण केला. याबद्दल डॉ भारती म्हणते **Human Genome Project मधील माझ्या अनुभवाचा आणि अभ्यासाचा फायदा सामान्य रुग्णापर्यन्त मला पोहोचवता आला, हा माझ्यासाठी सगळ्यात मोठा आनंदाचा क्षण होता.**

कॅन्सरचा प्रादुर्भाव होण्यासाठी, मानवी **DNA** मधील एपिजेनेटिक गुणसुत्रांचा प्रभाव निश्चित परिणाम करतो, याचा अभ्यास हे कॅन्सर संशोधनामधील नवीन क्षेत्र आहे. जागतिक संदर्भाने पाहिले तर या क्षेत्रात संशोधन करणाऱ्या महिला शास्त्रज्ञ फार कमी आहेत. डॉ भारती या क्षेत्रातील अग्रणि महिला शास्त्रज्ञ म्हणून जागतिक पातळीवर कीर्तिमान झाली आहे. या बरोबरच **कोलोन कॅन्सर** आणि **प्रोस्टेट कॅन्सर** या दोन व्याधींच्या संशोधनातील आघाडीची **जेनेटिक रिसर्चर सायंटिस्ट** म्हणून कॅनडा देशात ख्यातकीर्त आहे.



**<** डॉ भारती बापट

**Prostate Cancer** म्हणजे मूत्राशयचा कर्करोग ही पुरुष रुग्णांना होणारी एक व्याधी. याला अपायकारक असणाऱ्या जेनेटिक अथवा एपिजेनेटिक गुणसुत्रांवर संशोधन झाले नव्हते. डॉ भारतीचे या विषयातील संशोधन, पथदर्शक स्वरूपाचे आहे. तिच्या अभ्यासानुसार या व्याधीने ग्रस्त रुग्ण दोन प्रकारचे असतात. खूप गंभीर पातळीवरील ग्रस्त रुग्णांना केमोथेरपी आणि शस्त्रक्रिया अशा तितक्याच आक्रमाक उपचारांची आवश्यकता असते. प्राथमिक स्वरूपाच्या व्याधीग्रस्त रुग्णांना दर सहा महिन्यांनी उपचारांची आवश्यकता असते. डॉ भारती आणि तिच्या सहकऱ्यांच्या, पुरुष रुग्णांच्या मूत्रातील बायोमार्करच्या संशोधनानुसार, मूत्राशयच्या कर्करोगाचे निदान करता येते. रुग्णाच्या मूत्राच्या डॉ भारतीने केलेल्या जेनेटिक विश्लेषणावरून रुग्णांचा डॉक्टर आता त्याच्या आजाराच्या गांभीर्याचे नेमके निदान करू शकतो आणि आवश्यक ती उपाय योजना सुचवू शकतो. या मानवी **DNA** मधील गुणसुत्रांचा बिघाड का होतो आणि त्याचा प्रभाव किती असतो यांचा अभ्यास म्हणजे

**Epigenetic** चे संशोधन. मूत्राशयचा कर्करोग यावर योग्य उपाय करण्यासाठी डॉ भारतीने केलेले **Epigenetic** चे प्राथमिक संशोधन, तिच्या कारकीर्दीचा कळसाध्याय आहे.

पुरुषांचा मूत्राशयाचा कर्करोग – अंडकोषाचा कर्करोग या संदर्भात पुरुषांमध्ये जागृती करणारी **Movember** ही नवी दिशा देणारी संघटित चळवळ, वर्ष २००३ मधे ऑस्ट्रेलियात सुरू झाली. पुरूषांचे आरोग्यपूर्ण दीर्घायुष्य आणि आनंदी जीवन यासाठी ही चळवळ जागतिक स्तरावर निधी उभारणीचे काम करते. यातूनच या कर्करोग ग्रस्त रुग्णांवर उपचार केले जातात. ऑस्ट्रेलिया – कॅनडा – अमेरिका – युरोप अशा सर्व देशांत ही चळवळ वेगाने विकसित झाली. दर वर्षी **नोव्हेंबर माहिन्यात** यांचे निधी उभारणी कार्यक्रम जगभर होतात. पुरुषांच्या मिशीचा म्हणजे **Moustache** चा **M** लावला म्हणून याला **Movember Movement** म्हटले गेले आहे. सामाजिक बांधीलकी जपणाऱ्या डॉ भारतीने, दीर्घकाळ या चळवळीची आणि याच विषयांत काम करणाऱ्या **Prostate Cancer, Canada** या संघटनेची प्रवक्ता आणि विशेषज्ञ म्हणून मोठे योगदान दिले आहे.




**^ विद्यार्थ्यांसह मध्यभागी पांढऱ्या जॅकेटमधे डॉ भारती बापट**

नंतरच्या काळांत झालेल्या प्रगतीमधे, डॉ भारतीच्या मार्गदर्शनाखाली लॅबोरेटरीतिल तिचे सहकारी **Genome Profiling** चा अभ्यास करतात. यासाठी **DNA Genetic Marker** चे ऑपरेशन झालेल्या रुग्णाच्या गुणसुत्रांचा परिचय करून घेऊन त्यांचे विश्लेषण करतात. या संशोधनातून रुग्णाच्या गुणसुत्रांत होणारे जैविक – आण्विक स्वरूपाचे सूक्ष्म बदल आणि होणारे विविध फरक यांचे विश्लेषण आणि नोंद केली जाते. या विश्लेषण आणि नोंदीचा फायदा, जगभरातील कॅन्सर व्याधीग्रस्त रुग्णांच्या उपचारासाठी होतो. अमेरिका आणि ऑस्ट्रेलियासह अन्य देशांच्या सहभाग आणि सहकऱ्याने हे संशोधन होत असल्याने, डॉ भारतीचे हे संशोधन वैश्विक पातळीवर पोहोचले आहे. **डॉ भारतीच्या लॅबोरेटरीचे नांव BAPAT Laboratory असे आहे.** याचा प्रत्येक भारतीयाला निश्चित अभिमान आहे. इथे शिकलेले अनेक विद्यार्थी, विशेषतः विद्यार्थिनी, आज या संशोधन क्षेत्रांत महत्वाचे योगदान देत आहेत. डॉ भारतीच्या लॅबोरेटरी मधे तिच्या मार्गदर्शनाखाली, अनेक संशोधन उपक्रम यशस्वी झाले आणि नवीन शोध लावले गेले. यासर्व संशोधन उपक्रम आणि त्यातील शोध या संदर्भात तिच्या रिसर्च टीमने, आजपर्यन्त १८० सायंटिफिक आर्टिकल आणि पेपर प्रकाशित केले आहेत.



**^ डॉ भारती बापट + सौ कविता बापट मॉरिस + श्री विनीत बापट**


डॉ भारतीचा आणि तिच्या संशोधन कार्याचा विस्ताराने परिचय करून देणारा हा लेख प्रकाशित होईल तोपर्यंत नोव्हेंबर २०२१ मधे तिने निवृत्ती स्वीकारली असेल. सॅम्युअल


लुनफील्ड रीसर्च इंस्टीट्यूट या संस्थेशी डॉ भारती संलग्न आहे. याच इन्स्टिटट्यूटच्या लॅबोरेटरीत, गेली ३० वर्षे तिचे संशोधन संपन्न झाले आहे. या इन्स्टिटट्यूटने तिच्या दीर्घकालीन यशस्वी संशोधन कार्याची विशेष नोंद घेताना, डॉ भारतीला **Scientist Emeritus** हा सर्वोच्च सन्मान देऊन अलंकृत केले आहे. विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून टोरांटो युनिव्हार्सिटिमधे तिची दीर्घकालीन कारकीर्द कीर्तिमान झाली. **Professor Emeritus** हा सर्वोच्च किताब देऊन युनिव्हार्सिटीने तिच्या कारकीर्दीचा गौरव केला आहे. आम्हा पारलेकरांसह सर्व भारतीयांना, आमची पारलेकर भारती आपटे, अर्थात डॉ भारती बापट या शास्त्रज्ञ विदूषीचा खूप अभिमान आहे...!..निवृत्तीनंतर काय करायचे याची आखणी झालेलीच आहे. श्री विनीत बापट, सौ कवितासह सर्व आपटे आणि बापट कुटुंबीय यासह डॉ भारतीला शतशत शुभेच्छा..!


--००--


**श्री. अरुण फडके यांची ई साहित्यवरील पुस्तके**

**कव्हरवर क्लिक करताच ते ते पुस्तक उघडेल.**



**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.**
**श्री. अरूण फडके यांचे ई साहित्यवर हे पाचवे पुस्तक.**

श्री. अरूण फडके हे एक अनेक पैलू असलेले लेखक, कलाकार, सामाजिक कार्यकर्ते आहेत. चिन्हे व प्राचीन भारतीय संस्कृती हा त्यांच्या सखोल अभ्यासाचा विषय. मराठी भाषेचे सौंदर्य वाढवणाऱ्या म्हणी, पुरातन इमारतींचे संवर्धन, भव्य कार्यक्रमांचे सौंदर्यशास्त्रीय आयोजन असे त्यांचे अभ्यासाचे विषय आहेत आणि या प्रत्येक विषयाच्या मुळापर्यंत जाण्याची वृत्ती व अचुक आणि नेमके लिहीण्यासाठी कष्ट घेण्याची तयारी यामुळे त्यांना साहित्यिक वर्तुळांत मानाचे स्थान आहे. सध्याच्या whatsapp युनिव्हर्सिटीच्या काळात त्यांचे मौलिक लेखन ही एक मोठीच बौद्धिक मेजवानी असते.

श्री. अरूण फडके यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपले पुस्तक ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर ई साहित्यवर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३४), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे

(७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (११), अंकुश शिंगाडे(१७), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(५) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(४) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(४), श्याम कुलकर्णी(२), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर,असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।